


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, गुरुवार ३० एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## बंगालमध्ये दुस-या टप्प्यात 92% मतदान

### उत्तर २४ परगण्यात TMC-भाजप कार्यकर्त्यांत हिंसा; दावा-हावडात CRPF च्या मारहाणीत वृद्धाचा मृत्यू

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमधील १४२ जागांसाठीच्या दुस-या टप्प्यातील मतदान पूर्ण झाले आहे. सायंकाळी ६ वाजेपर्यंत नोंदवल्या गेलेल्या आकडेवारीनुसार, मतदानाचे प्रमाण ९१.७९% इतके राहिले. ही आकडेवारी आणखी वाढण्याची शक्यता आहे. मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान, अनेक ठिकाणी हिंसाचार, हाणामारी, लाठीमार आणि ईव्हीएममध्ये फेरफार करण्याच्या घटनांची नोंद झाली.उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील 'अरबिंद' भागात एका रॅलीदरम्यान टीएमसी आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये हिंसक संघर्ष उफाळून आला. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांचा पाठलाग करत, लाथा-बुक्क्यांनी आणि काठ्यांनी एकमेकांवर हल्ले केले. सुरक्षा दलांची मोठी कुमक तैनात असूनही, परिस्थिती हाताबाहेर





हावडा येथे EVM मध्ये बिघाड झाल्याच्या मुद्द्यावरून गोंधळ घालणा-या २ लोकांना CRPF ने ताब्यात घेतले.

गेल्याचे चित्र दिसून आले. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सीआरपीएफवर टीएमसीचे समर्थक आणि मतदारांना मारहाण केल्याचा आरोप केला. सीआरपीएफने आपल्या पक्षाच्या अनेक सदस्यांना अटक केल्याचे ममता यांनी सांगितले. मतदार आणि केंद्रीय निरीक्षकांनाही मारहाण केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला; तसेच महिला आणि मुलांनाही सोडले गेले नसल्याचे त्यांनी नमूद केले.हावडा जिल्ह्यातील उदय नारायणपूर येथे सीआरपीएफने केलेल्या मारहाणीमुळे एका वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाल्याचा आरोप टीएमसीने केला. सदर वृद्ध व्यक्ती आपल्या मुलासोबत मतदान करण्यासाठी गेली होती, असा दावा टीएमसीचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी केला. केंद्रीय सुरक्षा दलांनी त्या व्यक्तीला धक्के दिले आणि मारहाण केली, असा आरोप त्यांनी केला. त्या वृद्ध व्यक्तीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## ममता बॅनर्जी यांचा 20 हजार मतांनी पराभव होणार!

### सुवेंदू अधिकारी यांचा दावा

**कोलकाता/वृत्तसंस्था :** मतदानानंतर प्रतिक्रिया देताना सुवेंदू अधिकारी म्हणाले, 'राज्यातील जनतेने परिवर्तनासाठी मतदान केले आहे. हिंदू मतदारांनी पहिल्यांदाच उघडपणे बाहेर पडत मतदान केले आणि आपला मतदानाचा हक्क बजावला. ममता बॅनर्जी यांनी दिवसभर केंद्रीय सुरक्षा दलांना घाबरवण्याचा प्रयत्न केला. गुजराती-मारवाडी वस्तीत गुंडांच्या मदतीने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला.' एवढेच नाही तर, 'भवानीपूरमध्ये आपण २० हजार मतांनी जिंकत आहोत ८ पैकी ७ वार्डांत आपली आघाडी असेल आणि भाजप १८० पेक्षा जास्त जागा जिंकून सरकार स्थापन करेल,' असे भाकितही त्यांनी केले. पश्चिम बंगाल निवडणुकीसंदर्भात बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य म्हणाले, 'बंगालच्या जनतेने अशी निवडणूक कधीच बघितली नाही. ते अतिशय उत्साहाने या निवडणुकीत सहभागी झाले होते. ही निवडणूक कुणाला मुख्यमंत्री बनवण्यासाठी, कुण्या पक्षाला सत्तेबाहेर करण्यासाठी अथवा कुण्या पक्षाला सत्तेवर आणण्यासाठी नव्हती, तर ही निवडणूक बंगालला 'पश्चिम बांगलादेश' होण्यापासून रोखण्यासाठी होती. हा हिंदू बंगाली आणि राष्ट्रवादी मुस्लिमांच्या अस्तित्वाचा लढा होता.' तसेच, 'निवडणूक संपुष्टात आली आहे. अद्याप कसल्याही प्रकारच्या जीवीत अथवा वित्त हाणीचे वृत्त नाही. अशा प्रकारे निवडणूक पार पडणे, आमच्यासाठी एक मोठा मुद्दा आहे. तृणमूल काँग्रेस सत्तेबार जाणे निश्चित आहे,' असेही भट्टाचार्य यांनी म्हटले आहे.



सीबीआयचे अपयश

## शरद कळसकरला हायकोर्टाकडून जामीन मंजूर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष दिवंगत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणात सीबीआयच्या विशेष न्यायालयाने दोषी ठरवलेल्या आरोपी शरद कळसकर याला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.या प्रकरणात सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. दोघांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला होता. यापैकी वीरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे या तीन आरोपींना सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले होते.आता कळसकरला जामीन मंजूर झाला आहे. शरद कळसकर याने विशेष न्यायालयाच्या दोषसिद्धी व शिक्षेविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. अपीलावर अंतिम निर्णय होईपर्यंत जामीन देण्याची मागणी त्याच्या वकिलांनी केली होती. या अर्जावर सुनावणी झाल्यानंतर उच्च न्यायालयाने शरद कळसकर याला ५० हजार रुपयांच्या व्यक्तिगत हमीवर जामीन मंजूर केला आहे. सीबीआयने या प्रकरणात कट रचण्याचा मुख्य आरोप वीरेंद्र तावडे यांच्यावर लावला होता, मात्र न्यायालयाने त्यांना पुराव्याअभावी निर्दोष ठरवले. तिघांच्या निर्दोष मुक्तीला सीबीआयचे अपयश मानले जात आहे. शरद कळसकर याला जामीन मिळाल्याने दाभोलकर हत्याकांडातील एक महत्त्वाचा आरोपी तात्पुरता बाहेर येणार आहे. या प्रकरणातील अपीलाची पुढील सुनावणी आता उच्च न्यायालयात होणार आहे.

नरेंद्र दाभोलकर हत्याकांडा

## अकोल्यात भोंदू बाबाचा प्रकार उघड

**अकोला / प्रतिनिधी-** महाराष्ट्राची ओळख पुरोगामी राज्य म्हणून असली, तरी अंधश्रद्धेच्या घटना अद्यापही समाजात खोलवर रुजलेल्या असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील पोही गावात एका भोंदू बाबाचा प्रकार उघडकीस आला असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रामभाउ नामदेव भड उर्फ चंदनशेष किंवा चंदनमुरारी बाबा असे स्वतःला संबोधणा-या व्यक्तीवर अंधश्रद्धा पसरवण्याचा आरोप करण्यात आला आहे. या बाबाच्या अंगात दर सोमवारी आणि पौर्णिमेला सवारी येते, असा दावा केला जातो. यासंदर्भातील एक व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हा प्रकार चर्चेत आला आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, दर पौर्णिमेला आणि सोमवारी रात्री उशिरा या ठिकाणी दरबार भरवला जातो. रात्री १ वाजल्यापासून सकाळपर्यंत भजन-कीर्तनाचा कार्यक्रम चालतो. मध्यरात्री बाबाच्या अंगात सवारी येते आणि ती सकाळपर्यंत टिकते, असा दावा भक्तांकडून केला जातो. या दरम्यान, बाबा भक्तांना विविध प्रकारचे उपाय सांगतो, जसे की लिंबू पिळणे, धागे-दोरे देणे, तसेच तुला मूल होईल किंवा तू मला काय देणार? अशा प्रकारच्या गोष्टी सांगितल्या जात असल्याचे आरोप आहेत. यासाठी भक्तांकडून पैसे घेतले जात असून, ५० रुपयांच्या पावत्याही दिल्या जात असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही या बाबाविरोधात तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, तरीही हा प्रकार सुरूच असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गावक-यांनी अकोल्याच्या पोलिस अधीक्षकांकडे निवेदन देत या भोंदू बाबावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, या ठिकाणी सुरू असलेला अंधश्रद्धेचा बाजार बंद करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, व्हायरल झालेला व्हीडीओ नेमका कधीचा आहे, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. मात्र, या घटनेमुळे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या उपाययोजनांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देउन योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## अभिनेते भरत कपूर यांचे निधन

**मुंबइ/प्रतिनिधी-** दिग्गज अभिनेते भरत कपूर यांचे आज निधन झाले. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आज दुपारी साडेतीन वाजता मुंबईतील सायन रुग्णालयात त्यांचे निधन झाले. सायंकाळी साडेसहा वाजता कुटुंब आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. भावूक झालेल्या अवतार गिल यांनी सांगितले की, आज सायंकाळी साडेसहा वाजता भरत कपूर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. गेल्या तीन दिवसांपासून अभिनेत्याची प्रकृती ठीक नव्हती आणि त्यांचे अनेक अवयव निकामी होउ लागले होते. ३० एप्रिल रोजी अभिनेत्यासाठी प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या निधनाची बातमी पसरताच इंटरनेटवर दुःखाची लाट पसरली. चाहत्यांच्या मते, भरत यांचे निधन हे मनोरंजन विश्वासाठी एक मोठे नुकसान आहे. चाहते त्यांच्या आत्म्यास शांती लाभो यासाठी प्रार्थना करत आहेत. भरत कपूर हिंदी चित्रपटसृष्टीतील एक सुप्रसिद्ध चेहरा होते. त्यांनी १९७०, ८० आणि ९० च्या दशकात उत्कृष्ट काम केले. आपल्या चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या भूमिका साकारल्या.



## आंघोळीचा साबण खाल्ल्याने 20 वर्षीय तरुणाचा मृत्यू

**नाशिक/प्रतिनिधी-** बिर्याणीनंतर कलिंगड खाउन मुंबईत चौघांचा मृत्यू झाला असल्याची बातमी ताजी असतानाच, नाशिकमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका २० वर्षीय मुलाने आंघोळीचा साबण खाल्ला असल्याची माहिती समोर आली आहे. हादरवणारी बाब म्हणजे साबण खाल्ल्याने या मुलाचा मृत्यू झाला आहे. या घटनेने मुलाच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून शवविच्छेदन अहवाल समोर आल्यावर नेमके कारण स्पष्ट होईल. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अथर्व द्विवेदी असे मृत तरुणाचे नाव आहे. अथर्वने नकळतपणे आंघोळीचा साबण खाल्ल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर त्याची प्रकृती अचानक बिघडली. कुटुंबीयांनी तात्काळ त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अथर्व हा स्पेशल चाईल्ड असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ही घटना अधिकच संवेदनशील ठरत असून, त्याने साबण का खाल्ला? यामागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. या प्रकरणी इंदिरानगर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला असून, नेमकी घटना कशी घडली याचा शोध घेतला जात आहे. तसेच, वैद्यकीय अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या घटनेमुळे अथर्वच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## निव्वळ आमदारकीसाठी जाणार नाही-कडू

**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषद निवडणुकीसाठी शिंदेसेनेकडून बच्चू कडू यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. तसेच आमदारकीसाठी पक्षाचं शिंदेसेनेत विलिनीकरण करण्याची अट शिंदेसेनेकडून बच्चू कडू यांच्यासमोर ठेवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली. विधान परिषदेची आमदारकी मला मिळणार असल्याचे मी प्रसारमाध्यमांमधून ऐकलं आहे. पण मला शिंदेंकडून चर्चेसाठी बोलावणं आलेलं नाही. मात्र शेतकरी दिव्यांगांसाठी शिंदेसोबत जायला हरकत काय, असे म्हणत बच्चू कडू यांनी विधान परिषदेच्या आमदारकीबाबतचा सस्पेन्स कायम ठेवला आहे. या संदर्भात प्रसारमाध्यमांशी बोतलाना बच्चू कडू म्हणाले की, आम्ही मुद्द्याची लढाई लढणारी माणसं आहोत. आमचे काही मुद्दे आहेत. आम्ही आमदारकीसाठी अजिबात जाणार नाही. दिव्यांगांचे जे प्रलंबित प्रश्न आहेत. त्यांची त्वरित पूर्तता झाली पाहिजे. कर्जमाफी, पगारवाढ यासह इतर काही महत्त्वाचे मुद्दे आहेत. शेतक-यांचे प्रश्न आहेत, हमिभावाचा प्रश्न आहे. हमिभावासाठी एकनाथ शिंदे यांनी आमचा विचार केला. आमचाही प्रस्ताव आहे. आम्ही पदसाठी युती करणारे लोक नाही. पदासाठी, निवडणुकीसाठी युती करणारा बच्चू कडू नाही आहे. बच्चू कडूची युती ही मुद्द्यावर आधारित असेल. मुद्दा असेल तर आम्ही पुढे पाउल टाकू, असेही बच्चू कडू यांनी यावेळी सांगितले.



ते पुढे म्हणाले की, निव्वळ आमदारकीसाठी जावं एवढा बच्चू कडू नालायक नाही. त्यामुळे या मुद्द्यावर चर्चा होईल. तसेच प्रहार ही किमान एक लाख सदस्य असलेली संघटना आहे. सुमारे ५ ते १० लाख दिव्यांग बांधव आमच्यासोबत आहेत. कार्यकर्त्यांच्या प्रचंड कष्टातून प्रहार ही संघटना निर्माण झालेही आहे. विलिनिकरणाच्या बातम्या वाचल्या तेव्हा दुःख वाटलं. तसा मी जुना शिवसैनिकच होतो. शिवसेनेतील बंडखोरीतून प्रहारची निर्मिती झाली. शिवसेनेतून बाहेर पडून कुठल्या पक्षात न जाता २५ वर्षे लढणारा बच्चू कडू हा एकमेव असेल. कुठल्याही पक्षाचा पाठिंबा आम्ही घेतलेला नाही. २ जागा आणि एक खासदारकी द्या म्हणून आम्ही एकनाथ शिंदेंसोबत युती करू शकलो असतो, पण ते आम्ही केलं नाही, असेही बच्चू कडू म्हणाले. मी नुकताच हिमालयातून पायी चालत आलो आहे. त्यानंतर प्रसारमाध्यमांमधून मला आमदारकीबाबत माहिती समजली. तसेच त्यानंतर माझं उदय सामंत यांच्यासोबत बोलणं झालं होतं. विधान परिषद उमेदवारीबाबत एकनाथ शिंदे यांच्यापक्षाकडून कुठलाही फोन अथवा संदेश अद्याप आपल्याला मिळालेला नाही, असे कडूंनी सांगितले. तसेच विधान परिषधेच्या उमेदवारीबाबत विचारले असता तो किंतू परंतूचा विषय आहे. याबाबात चर्चा झाला पाहिजे. फक्त आमदार व्हायचं असतं, तर मी आताही हो म्हटलं असतं. एकनाथ शिंदे यांनी विधान परिषद दिली, तर आम्ही त्यांचे पाईक बनून राहू. मेहनतीने लढू खूप काम, शिवसेना वाढवण्यासाठी प्रयत्न करू. मात्र आमदारकी असो वा विलिनीकरण असो त्याबाबत चर्चेशिवाय काही बोलू शकत नाही, असेही कडू यांनी सांगितले.

## धीरेंद्र शास्त्रींनी १०० दिवस व्हेंटिलेटरवर असलेल्या मुलाचा जीव वाचवला

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या रामकथेचा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमात त्यांनी दिव्य दरबार म्हणजेच असाध्य रोगांवर चमत्काराने उपचार केल्याचा दावा केला आहे. एका लहान मुलावर शंभर दिवस व्हेंटिलेटरवर असताना उपचार केल्याचाही दावा त्यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकारानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आक्षेप घेतला आहे. या मुलावर डॉक्टरांनी उपचार केले असताना हा चमत्कार कसा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर धीरेंद्र शास्त्री यांनी कथेदरम्यान सांगितले की, बालाची भक्ती केल्याने आणि हनुमानजी यांचा आशिर्वाद मिळाल्याने मुलाचा जीव वाचला आहे.

धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा दिव्य दरबार बागेश्वर धाम (छतरपूर, मध्य प्रदेश) येथे भरतो. जिथे ते भक्तांच्या विनंत्या (समस्या) ऐकतात आणि भगवान हनुमानाच्या आशीर्वादाने त्यावर उपाय देण्याचा दावा करतात. हा दरबार अनेकदा चर्चा आणि वादांमध्ये गुंतलेला असतो, ज्यामध्ये अनेकदा चिठ्ठ्यांद्वारे वैयक्तिक माहिती देणे आणि भविष्यातील भाकिते करणे यांसारख्या गोष्टींचा समावेश असतो. त्यांची राम कथा नागपूरमध्ये सुरू आहे. या



कथेमध्येही त्यांचा दरबार भरत असतो. यावेळी भक्तांकडून अर्ज घेउन त्यावर माहिती दिली जाते. यावेळी अनेक आजारांवर उपचार केल्याचा दावा केला जातो.

**नागपूरमधील प्रकरण काय?**

धीरेंद्र शास्त्री यांच्या रामकथेच्या पहिल्या दिवशी काही लोकांना व्यासपीठावर बोलावण्यात आले. ज्यांना दरबारामध्ये फायदा झाला अशा लोकांना मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यता आली. यावेळी एका पालकांनी सांगितले की, त्यांचा मुलगा बारा वर्षांचा आहे. त्याला कोट्यवधी लोकांमध्ये एखाद्याला होईल असा आजार झाला होता. शंभर दिवस तो व्हेंटीलेटरवर होता. या उपचारादरम्यान त्याला अनेकदा त्रास झाला. एक दिवस ५ मिनीटासाठी ऑक्सीजनही बंद झाले होते. डॉक्टरांनी सांगितले की, आता काहीच होउ शकत नाही. जेव्हा डॉक्टरही हार मनतात तेव्हा सर्वांना देव आठवतो. सात महिने पाय उचलण्याची शक्ती ज्या मुलामध्ये नव्हती तो नरेंद्र शास्त्री यांच्या आशिर्वादाने आता पायावर उभा झाला आहे.

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रा. श्याम मानव यांनी यावर आक्षेप घेतला आहे. धीरेंद्र शास्त्री यांच्या दाव्यानंतर यावर आता अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. ज्या व्यक्तीने सांगितले की हा माझा मुलगा शंभर दिवस व्हेंटीलेटरवर होता. आणि पाच मिनीटे प्राणवायू बंद होउनही तो जिवंत राहिला आहे. तर या सर्व गोष्टींचा वैद्यकीय दृष्टीने तपासणी आवश्यक आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यभर सकाळी आठ वाजता शासकीय समारंभ

### मुख्य समारंभात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत राज्यपाल यांच्या हस्ते ध्वजवंदन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिन १ मे २०२६ रोजी राज्यभर उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. मुख्य शासकीय ध्वजवंदन समारंभ सकाळी आठ वाजता एकाच वेळी आयोजित करण्यात येणार आहे. मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथे राज्यपालांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन होणार आहे.

राजशिष्टाचार विभागाने काढलेल्या परिपत्रकानुसार विभागीय व जिल्हा मुख्यालयांवर संबंधित पालकमंत्री, मंत्री किंवा राज्यमंत्री यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल. त्यानुसार ठाणे येथे उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, बीड - सुनेत्रा अजित पवार, नागपूर - चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अहिल्यानगर- राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे-पाटील, नंदुरबार - हसन सकिना मियालाल मुश्रीफ, सांगली- चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चु पाटील, नाशिक- गिरीश गिता दत्तात्रय महाजन, पालघर- गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक, जळगाव- गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील, अमरावती- बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील, यवतमाळ- संजय प्रमीला दुलीचंद राठोड, मुंबई शहर- मंगलप्रभात प्रेमकंवर गुमनमल लोढा, रत्नागिरी- उदय स्वरुपा रविंद्र सामंत, धुळे- जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, जालना- पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, नांदेड- अतुल लिलावती मोरेश्वर सावे, चंद्रपूर- डॉ.अशोक जनाबाई रामाजी वुईके, सातारा- शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई, मुंबई उपनगर- ॲड.आशिष मिनल बाबाजी शेलार, वाशिम- दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे, रायगड- आदिती वरदा सुनिल तटकरे, लातूर- शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले, सोलापूर- जयकुमार कमल भगवानराव गोरे, हिंगोली- नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ, गोंदिया- संजय सुशिला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर- संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव- प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, बुलढाणा- मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील), सिंधुदुर्ग- नितेश निलम नारायण राणे, अकोला- आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर, कोल्हापूर- प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर, पुणे- माधुरी मिरा सतिश मिसाळ, गडचिरोली- ॲड.आशिष उमादेवी नंदकुमार जयस्वाल, भंडारा- योगेश ज्योती रामदास कदम, वर्धा- डॉ.पंकज कांचन राजेश भोयर आणि परभणी येथे मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर ध्वज फडकावतील.



मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे, यासाठी सकाळी ७.१५ ते ९ या वेळेत इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय ध्वजवंदन कार्यक्रम आयोजित करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा व विभागीय मुख्यालयांबरोबरच पोलीस, गृहरक्षक दले, नागरी संरक्षण दले आणि अग्निशमन दलांचे संचलन आयोजित करण्यात येणार असून शासकीय इमारतींवर विद्युत रोषणाई केली जाणार आहे.

ध्वजवंदनावेळी वंदे मातरम, राष्ट्रगीत आणि राज्यगीत सादर करण्यात येईल. या समारंभप्रसंगी राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंर्त्यसैनिक, शहीद जवानांच्या कुटुंबियांना सन्मानाने निमंत्रित करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत. महाराष्ट्र दिनानिमित्त वृक्षारोपण, वक्तृत्व, निबंध, प्रश्नमंजुषा स्पर्धा, प्रभात फे-या, सांस्कृतिक कार्यक्रम आणि देशभक्तीपर उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन शासनाने केले आहे.

## आता प्रगतिपुस्तकासोबत पाल्याच्या उत्तरपत्रिकाही पालकांना दाखवणे अनिवार्य

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा निकाल येत्या १ मे रोजी जाहीर होणार असून, यंदा शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हा निर्णय जाहीर करतानाच एक क्रांतिकारी म्हटल्या जाउ शकणारा निर्णय पण शिक्षण संचालनालयाने घेतला आहे. या दिवशी विद्यार्थी व पालक यांना प्रगतिपुस्तक देण्यात येते. त्यावरून पालकांस आपल्या पाल्याची गुणवत्ता निदर्शनास येते. वर्षभर आपला मुलगा शाळेत जे काही शिकला, त्याचे मोघम मूल्यमापन होते.शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल १ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २ मे २०२६ पासून राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या शाळांना अधिकृतपणे उन्हाळी सुटी सुरू होईल. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये सुसंगती आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याच दिवशी एक महत्त्वाची घडामोड पण घडणार आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षक व पालकांचे संयुक्त कर्तव्य आहे. त्यादृष्टीने एक पाउल टाकण्यात आले आहे. निकाल देताना आता केवळ प्रगतिपुस्तक न देता विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका पालकांना दाखविणे अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षण आयुक्तांनी असे आदेश दिले आहेत. पालकांच्या निदर्शनास आणल्यामुळे पालकांना आपल्या पाल्याची संकल्पनात्मक समज, उत्तर लिहिण्याचे कौशल्य आणि नेमक्या चुका कोठे होत आहेत, याचे अचूक निदान करता येईल. केवळ गुणांवर लक्ष केंद्रित न करता, मुलांच्या कौशल्यांवर आधारित प्रगती मोजणे यामुळे शक्य होणार आहे. शिक्षण संचालनालयाने या निर्णयाचे विविध फायदे स्पष्ट केले आहेत. विद्यार्थ्यांच्या कच्च्या दुव्यांवर पालकांच्या मदतीने घरच्या घरी उपाययोजना करणे सोपे होईल. पाल्याच्या अभ्यासाच्या सवयी, वाचन आणि लेखनाबाबत पालक अधिक सजग व जबाबदार होतील. मूल्यमापन प्रक्रियेबाबत पालकांचा विश्वास वाढेल आणि विद्यार्थ्याच्या प्रगतीचे वस्तुनिष्ठ चित्र समोर येईल.

**शाळांना नियम पाळणे बंधनकारक**

या संदर्भातील आदेश शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले असून, राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांना हे नियम पाळणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे आता पालकांना आपल्या मुलांच्या उत्तरपत्रिका प्रत्यक्ष पाहता येणार आहेत आणि शिक्षकांनी केलेले मूल्यमापनही समजून घेता येणार आहे. शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मध्यरात्री गाडी अडवून चालकाचे अपहरण; नगरसेवकासह पाच जणांवर गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा रोडवरील समथर्वाडी परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास बोलेरो पिकअप चालकाला अडवून मारहाण करत जबरदस्तीने नेल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगरसेवकासह पाच जणांविरुद्ध बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अलीम नगर येथील रहिवासी मो. साजिद मो. रफीक (वय ३२) हे आपल्या बोलेरो पिकअपमधून कपाशीचे बियाणे घेऊन बडनेऱ्याकडे जात होते. २८ एप्रिल रोजी रात्री १२.१५ वाजताच्या सुमारास गोविंद महाराज मंदिराजवळ त्यांच्या वाहनास तीन मोटारसायकलींवर आलेल्या पाच जणांनी अडवले.

यामध्ये ताज नगर येथील नगरसेवक मोहम्मद रेहान उर्फ बल्ला यांचा समावेश असल्याचे तक्रारदाराने ओळखले असून इतर चार आरोपी अज्ञात आहेत. आरोपींनी चालकाला गाडीतून खाली उतरवून मालाबाबत चौकशी केली आणि त्यानंतर लोखंडी पाइप व हाताने मारहाण सुरू केली.

यानंतर 'गाडी तपासायची आहे' असे सांगत आरोपींनी तक्रारदाराला जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून नेले, तर दुसऱ्या आरोपीने त्यांची बोलेरो चालवत पुढे नेली. नवाथे परिसरात पोहोचल्यानंतर पुन्हा मारहाण करण्यात आली. मात्र, संधी साधून तक्रारदाराने तेथून पळ काढला.

घटनेनंतर त्यांनी घरी जाऊन नातेवाईकांना माहिती दिली व दुसऱ्या दिवशी इर्विन रुग्णालयात उपचार घेतले. भीतीमुळे तक्रार उशिरा दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके कार्यरत असून प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी १० मेपर्यंत मुदतवाढ

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. १० मेपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, बारावी, तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रांतील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे. कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटी पूर्तता केलेली नाही, ज्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.

विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहील. तसेच दि. २९ एप्रिल ते १० मे २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत स्वत: उपस्थित राहून त्रुटी पूर्तता करून घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

# कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य

## -२० मेपर्यंत नोंदणीचे आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः-

राज्यात दि. १४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, दि. १५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या शेतकरी बांधव-भगिनींनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही, त्यांनी दि. २० मेपर्यंत नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यात एकूण १.७१ कोटी खातेदार असून त्यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी पूर्ण केली आहे.

उर्वरित शेतकऱ्यांनी २० मे २०२६ पूर्वी आपला फार्मर आयडी तयार करून घ्यावे. शेतकरी नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर जाऊन अथवा स्वतः ॲग्रीस्टॅक पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करू शकतात. यापुढे कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच बियाणे, खते, औषधे आदी कृषी निविष्ठा प्राप्त करण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक राहणार आहे.

फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात काही अडचण आल्यास संबंधित विभागाच्या हेल्पडेस्कशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अमरावती विभागासाठी आजितकुमार गेजगे (९६५७१०९८०९), पुणे विभाग करिता संगीता ननावरे (७५८८५०९४९२), कोकण विभागसाठी सोनाली वाडेकर (९४०४९५३५१८), छत्रपती संभाजीनगर विभाग शीतल कांदरे (९१७२३१९६३७), नागपूर विभाग अजितकुमार गेजगे (९६५७१०९८०९) व नाशिक विभाग सोनाली वाडेकर (९४०४९५३५१८) यावर संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाव्दारे करण्यात आले आहे.

# एएसआय अब्दुल कलाम हत्या प्रकरण : आणखी एक आरोपी जेरबंद

अमरावती/प्रतिनिधीः-

एएसआय अब्दुल कलाम यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणात पोलिसांनी आणखी एका आरोपीला अटक केली आहे. गाडगेनगर पोलिसांनी अकोला येथे ही कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव गुलाम अली (वय ३९, रा. अकोला) असे आहे. या प्रकरणात वापरण्यात आलेले शस्त्र उपलब्ध करून दिल्याचा गंभीर आरोप त्याच्यावर आहे.

या कारवाईमुळे प्रकरणाच्या तपासाला गती मिळाली असून, हल्ल्यामागील संपूर्ण कट उलगडण्याच्या दृष्टीने पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# महात्मा फुले ब्रिगेडचे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात निवेदन

अचलपूर/प्रतिनिधीः-महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य च्या वतीने अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्या संदर्भात निवेदन देण्यात आले.यावेळी महात्मा फुले आणि ब्रिगेड चे संस्थापक अध्यक्ष स्वप्निल बोबडे यांचे नेतृत्वात निवेदन देण्यात आले .या निवेदनात प्रमुख मागणी म्हणून नमूद करण्यात आहे की,मुख्यमंत्री बळीराजा पांदन मंजूर रस्त्याचे कामे तात्काळ सुरू करणे ,कीटकनाशके व रासायनिक खते त्यांच्यावरील जीएसटी रद्द करणे तसेच सन २०१९ नंतर शेत खरेदी केले त्यांचे पीएम किसान योजनेचा निधी बंद केला त

## १ व १० वरिल उर्वरित

### सोलर नोंदणीसाठी लाचखोरी

एसीबीने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे इझाटे याने १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्याला रंगेहात पकडले. तपासात उपकार्यकारी अभियंता खंडारे यांनीही या व्यवहारास संमती दिल्याचे समोर आले.

कारवाईदरम्यान आरोपींकडून मोबाईल, संबंधित कागदपत्रे आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही मोहीम पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

### तरुणीला शरीर सुखाची मागणी

करण्यासाठी ती दररोज जिल्हा स्टेडियमवर जात होती. यामुळे तिची ओळख आरोपी सागर पांडे सोबत होती. एका मित्राच्या ओळखीने ती सागर पांडे सोबत बोलत होती. सागरने आपल्या मोबाईलमध्ये तिच्यासोबत फोटो काढले होते. नेहमी तो तरुणी सोबत जवळीक वाढण्याचा प्रयत्न करत होता. पण पिडितेने त्याला भाव दिला नाही. त्यामुळे सागरने तिला धमकावले आणि म्हटले की दुसऱ्या कोणासोबत तुझे लग्न होऊ देणार नाही. तुझे लग्न कुठे जुळले तर तोडेल. पिडितेचे लग्न निश्चित झाल्यावर तिच्या होणाऱ्या नवऱ्याला खोटे मेसेज पाठवून प्रेम संबंध असल्याचे त्याने सांगीतले. त्यामुळे पिडितेचे लग्नही मोडले. आरोपी नेहमी तिचा पाठलाग करत होता. मंगळवारी सकाळी ११.३० वाजता पिडिता जेव्हा प्रेसचे कपडे आणण्यासाठी गेली होती. त्यावेळी आरोपी सागर तिथे पोहोचला. त्याने तिचा हात पकडला आणि सोबत असलेले फोटो फेसबुकवर आणि व्हॉट्सअप वर वायरल करण्याची धमकी देत शरीर सुखाची मागणी केली. यामुळे घाबरलेली पिडिचा घरी आली आणि तिने आई आणि भावाला वस्तुस्थिती सांगितली. त्यानंतर त्यांनी आरोपी विरुद्ध राजापेठ ठाण्यात तक्रार दिली.

### माधुरी ठाकरे, स्वाती कुलकर्णी,

जाधव यांची निवड करण्यात आली. या निवडणुकीत पीठासिन अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी काम पाहिले. पीठासिन अधिकारी आशिष येरेकर यांनी नवनियुक्त सभापती यांचे पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन केले.

झोन क्रमांक १ सभापतीपदी माधुरी सुहास ठाकरे, झोन क्रमांक २ सभापतीपदी स्वाती चंद्रशेखर कुलकर्णी, झोन क्रमांक ३ सभापतीपदी ईस्माईल कासम लालुवाले, झोन क्रमांक ४ सभापतीपदी किशोर चंद्रशेखर जाधव यांची निवड झाल्याबद्दल उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता नाना आमले, विधी समिती सभापती स्नेहा आशिष लुल्ला, उपसभापती डॉ.मधुरा मिलींद काहाळे, महिला व बाल कल्याण समिती सभापती ममता संदिप आवारे, उपसभापती लता रावसाहेब देशमुख, शहर सुधार समिती उपसभापती सुमती विजय ढोके तसेच नगरसेवक व नगरसेविका यांनी अभिनंदन केले.

### विदर्भात उष्णतेची लाट;

पार्श्वभूमीवर महावितरणच्या ३३/११ केव्ही उपकेंद्रांमध्ये पॉवर ट्रान्सफॉर्मरला कुलरच्या साहाय्याने ट्रान्सफॉर्मरच्या बाह्य पृष्ठभागावर थंड हवा पुरवून त्यांचे तापमान नियंत्रितान ठेवून संभाव्य बिघाड टाळण्याचे प्रयत्न महावितरणकडून करण्यात येत आहे. शिवाय पॉवर ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाला तर, याचा मोठा फटका हजारो ग्राहकांना आणि जास्त कालावधी साठी पडू शकतो, त्यामुळे पॉवर ट्रॉन्सफॉर्मरला वाचविण्याच्या प्रयत्नात महावितरणची दमछाक होत आहे.

दरम्यान, वाढत्या तापमानाबरोबरच विजेच्या मागणीतही मोठी वाढ झाल्याने संपूर्ण वीज वितरण यंत्रणेवर ताण वाढला आहे. अशा परिस्थितीत महावितरणचे कर्मचारी उष्णतेची पर्वा न करता खंडित वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यामुळे या काळात सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

### विज प्रश्नावरून नगरसेवकांचा

करण्यात आला.

या वेळी नेहा शिवाजी देशमुख, वंदना विठ्ठलसिंग सोलंकी, कविता दिलीप गवई, मंदा दादाराव इंगळे, वर्षा विनोद बोरेकर, मुनिफा बेग यांच्यासह इतर नगरसेविका-नगरसेवक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सर्वांनी मिळून अधिकाऱ्यांना निवेदन सादर करत तात्काळ विजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही नगरसेवकांनी दिला आहे. यापूर्वी सुद्धा विठ्ठल सिंह सोलंकी यांनी विद्युत वितरण कार्यालयाला अनेक वेळा तक्रारी नोंदवल्या तसेच वृत्तपत्रांमध्ये वृत्त सुद्धा प्रकाशित केले होते. तरी कुठलेही नियोजन झाले नसल्याचे यावेळी बोलले गेले.

गेल्या उन्हाळाभरात दर्यापूर शहरांमध्ये विजेचा लपंडाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे अतोनात हाल होत असून महावितरण कार्यालयाने नागरिकांच्या जिवाशी खेळ करू नये. विद्युत पुरवठा नियमित सुरू ठेवावा अन्यथा आम्ही यापेक्षाही तीव्र आंदोलन करू.

**-वंदना सोलंकी,नगरसेविका**

सध्या उन्हाचा तीव्र तडाखा वाढलेला असून पुढील दोन ते तीन आठवडे ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महावितरणला सहकार्य करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या घरातील किंवा व्यावसायिक ठिकाणांमधील कचरा डीपीजवळ किंवा विद्युत तारांच्या खाली जाळणे टाळावे. अशा कृतीमुळे विद्युत पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ शकतात व तात्पुरता विजपुरवठा खंडित करावा लागू शकतो. महावितरणचे कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेऊन विजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांनी जबाबदारीने वागून सहकार्य करावे.

**-सारंग गजभिये,सहाय्यक अभियंता अर्बन १ दर्यापूर**

### भीषण अपघात; विवाहितेचा

वाहनाचे चाक गेल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी समीक्षा यांना मृत घोषित केले. नितीन व नीलेश यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे. या अपघातामुळे मोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### न्यायासाठी प्रवीण सावळे

करण्याचा इशारा बुधवार २९ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिला आहे. त्यांनी सांगितले की आमच्या संस्थेने कंपनीला किराणा धान्य, भाजीपाला, फळे इत्यादी पुरवला. ७३ लाख ८६ हजार ७६४ रूपयेचे बिल कंपनीला दिले होते. त्यानंतर ६८ लाख ८९ हजार ८५५ रुपये कंपनीने बँक खात्यात जमा केले.४ लाख ९६ हजार ९०९ अजून पर्यंत दिले नाही.या पैशांसाठी वारंवार तगादा लावला पण त्यांनी पैसे नाही दिले. उलट जीवे मारण्याची धमकी दिली. शेवटी यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजापेठ येथे तक्रार केली पण त्यांनीही याकडे लक्ष नाही दिले. विचारपूस केली असता त्यांनी, सांगितले की वरिष्ठांकडून दबाव असल्यामुळे आम्ही कोणतीही कार्यवाही करू शकत नाही. त्यामुळे मागील सहा महिन्यापासून कोणतीही कार्यवाही नाही झाली. लेखी तक्रारीवरही कारवाई करण्यात आली नाही. पुण्याच्या कंपनीचे विरोध तक्रार देऊनही कोणती कार्यवाही न झाल्याने शेवटी न्यायासाठी सावळे यांनी १ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचे निश्चित केले आहे. माझ्या मृत्यूला स्मार्ट सर्विसेस प्रा लिमिटेड चे सर्व पदाधिकारी आणि पोलीस विभाग जबाबदार राहतील असे त्यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे.

### तिवसा येथे आ.गायकवाड आणि

त्यांनी समाजात तेढ निर्माण करणारे वक्तव्य केले आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला.तर धीरेंद्र शास्त्री यांनी सातत्याने महाराष्ट्राच्या आराध्य दैवताचा अपमान करण्याचे धाडस केले आहे. शिवरायांची तुलना इतर कोणाशीही होऊ शकत नाही, हे विसरून त्यांनी केलेले आवाहन सहन केले जाणार नाही, असा इशारा काँग्रेसने दिला आहे.

याप्रसंगी बोलताना तालुकाध्यक्ष वैभव वानखडे म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण राष्ट्राचे प्रेरणास्थान आहेत, त्यांच्याबद्दल चुकीची विधाने करणाऱ्यांना काँग्रेस पक्ष कधीही माफी देणार नाही. सरकारने अशा व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा ईशारा देण्यात आला.' या आंदोलनात तालुका काँग्रेसचे अध्यक्ष नगरसेवक वैभव वानखडे, शहर अध्यक्ष सेतू देशमूख, महिला काँग्रेस अध्यक्ष रुपाली काळे, खरेदी विक्री संघ अध्यक्ष सुरेश मेटकर, सभापती बाजार समिती रवी राऊत, नगरसेवक किसन मुंदाणे, युका अध्यक्ष धिरज ठाकरे, नरेंद्र विघ्ने, सुनिल बाखडे, लुकेश केणे, प्रविण साबळे, प्रमोद वानखडे, अतुल खुळे, दीपक पावडे, प्रणव गौरखेडे, संजय चौधरी, विनोद मसलदि, गजानन भोंबे, श्रीकांत माहोरे, देवेंद्र घाटोळ, विजय कुरळकर, तुलसीदास खोंडे , वैभव ढवळे, उमेश राऊत, ज्ञानेश्वर मोहतुरे, अमोल पन्नासे, मंगेश राऊत, जानराव मरसकोल्हे, यश चौधरी, अनंत माहोरे, विशाल शेंडे, सर्जा वाघमारे, राज बावणे, अनिकेत तालन, तुषार लेवटे, अजय बाखडे, गौरव चौधरी, आकाश मकेश्वर, पंकज हिवराळे, प्रसाद लाजूरकर, केशव चौधरी, यश करडे व विविध सेलचे अध्यक्ष, महिला काँग्रेस कार्यकर्त्या आणि मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक सहभागी झाले होते.

### सार्वजनिक ठिकाणी दारू

जवळ,सिंधी चौक, चवरे नगर, गर्ल्स हायस्कूल चौक, ऑर्बिट पॉइंट इत्यादी सार्वजनिक ठिकाणी ही कारवाईची मोहिम राबविण्यात आली.

सार्वजनिक ठिकाणी दारू पिणाऱ्यांच्या वाढत्या संख्येमुळे सामान्य नागरिक, विशेषतः महिला आणि विद्यार्थिनींना रस्त्यावरून चालताना नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत होता. अनेक ठिकाणी असभ्य वर्तनाचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर, शहराचे सामाजिक स्वास्थ्य राखण्यासाठी पोलीसांनी ही कारवाई केली.

केवळ दारू पिणाऱ्यांवरच नाही, तर त्यांना पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देणारे खाद्यपदार्थांचे हातगाडी चालक आणि किरकोळ दुकानदार यांच्यावरही आता कारवाईची टांगती तलवार आहे. दारूबंदी कायद्यानुसार तळीरामांना बसण्यासाठी जागा देणे हा गुन्हा असून, अशा दुकानदारांवरही गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेला

विजय लोहकरे यांनी नगरपरिषदेच्या कामकाजा बाबत सविस्तर माहिती समितीच्या सदस्य गणासमोर मांडली.

नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी शहरातील पाणी पुरवठा बाबत येणाऱ्या अडचणी व प्रशासनातील अडचणींची समीतीचे सदस्य किशोर पाटील यांच्या समोर माहिती दिली. विधानसभा अंदाज समितीच्या पथकाने मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून काम मार्गी लागण्याची नगराध्यक्षांना हमी दिली. विधानसभा अंदाज समितीच्या पथकाने नगरपरिषद कार्यालयातील विविध विभाग प्रमुखांशी प्रशासकीय कामकाजातील सखोल चर्चा केली असून विभाग प्रमुखांनी समिती सदस्यांना समाधानकारक उत्तरे दिल्याने विधानसभा अंदाज समितीच्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी नगरपरिषदेचे नगरसेवकांसह सर्व विभागांचे सभापती, अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हा स्त्री रुग्णालयातील

रिक्त पदाच्या भरतीसाठी परवानगी देण्यात आली होती, मात्र आता प्रशासकीय कारणास्तव ही प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. तरी संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राने प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### वरुड येथे आज कौशल्य

होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांसह उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९, ८६०५६५४०२५ किंवा amravatirojgar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त यांनी केले आहे.

### घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार

आरोपीने बनडेरा पोलीस ठाणे हद्दीत २, गाडगे नगर क्षेत्रात २ असे एकूण चार गुन्हयाची कबुली दिली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहायक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक गजानन सोनोंने,अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, संदीप खंडारे, नईम बेग, विकास गुडधे, योगेश पवार, चेतन गुंल्हाणे, प्रभात पोकळे यांनी केली.

अकोट नगर परिषद, अकोट
जिल्हा - अकोला (महाराष्ट्र)
Email : akotmc@gmail.com

**ई-निविदा सूचना**

**नगर परिषद, अकोट बांधकाम विभाग अंतर्गत मुख्याधिकारी यांचे लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत TENDER ID :- 2026_DMA_1299084_1 सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत 2026_DMA_1299067_1 या कामांची ई-निविदा दिनांक ३०.०४.२०२६ नुसार ऑनलाईन पध्दतीने प्रपत्रामध्ये निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३०.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दिनांक ०७.०५.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भरता येईल. तसेच शक्य झाल्यास दिनांक ०८.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालय, नगर परिषद, अकोट मध्ये उघडण्यात येईल.**

निविदा सूचना

**अकोट नगर परिषद, अकोट जि.अकोला चे वतीने मुख्याधिकारी, नगर परिषद, अकोट बांधकाम विभागाकडे नगर परिषद निधीमधून वार्षिक निविदा योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदारांकडून कोऱ्या निविदा द्विलिफाफा पध्दतीने दर मागवित आहेत.**

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म प्रपत्राची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | विविध योजने अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करीता लाईटची व रोशनाईची व्यवस्था, लाऊडस्पिकर साऊंड सिस्टम इ. साहित्याचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे | १०,००,००० | १०,००० | १५०० | ३१ मार्च २०२७ |
| २. | गणेशोत्सव, नवदुर्गा, नवरात्री महोत्सवामध्ये नागरिकांच्या सुरक्षाचे दृष्टीने शहरातील अती-संवेदनशील भागात आवश्यकते-नुसार लोखंडी बॅरिकेटींग व पडदे लावणे | १०,००,००० | १०,००० | १५०० | ३१ मार्च २०२७ |
| ३. | विविध योजनेअंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करीता मंडप डेकोरेशन व स्टेज इ. चा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | १०,००,००० | १०,००० | १५०० | ३१ मार्च २०२७ |
| ४. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता शहरातील विविध ठिकाणी फोटो शुटींग व व्हिडीओग्राफी करणे (दुसरी वेळ) | १०,००,००० | १०,००० | १५०० | ३१ मार्च २०२७ |

निविदा प्रसिध्दीचा तपशील

| | | |
|---|---|---|
| निविदा प्रपत्र विक्रीची दिनांक व वेळ | - | दिनांक ३०.०४.२०२६ दुपारी ११.०० वा. ते दिनांक १४.०५.२०२६ |
| लिफाफा बंद निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ | - | दिनांक १५.०५.२०२६ सायं.०५.०० वा.पर्यत |
| निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | - | दिनांक १८.०५.२०२६ सकाळी ११.०० वाजता |

अटी व शर्ती - **१) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संबंधित विभागात पहावयास मिळतील. २) कोणतेही एक किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.**

(शशिकांत मारोती बाबर (मशप्रसे)
मुख्याधिकारी गट-अ
नगर परिषद, अकोट

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ गुरुवार ३० एप्रिल २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## वाशिम जिल्ह्याचा पिक विमा योजनेत समावेश करा आ. सईताई डहाके यांची ठाम मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

वाशिम जिल्ह्याचा राज्य शासनाच्या पिक विमा योजनेत तात्काळ समावेश करण्यात यावा, अशी ठाम व न्याय्य मागणी कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांनी राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



सदर निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, वाशिम जिल्हा हा प्रामुख्याने कृषिप्रधान असून येथील बहुतांश नागरिकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत नैसर्गिक आपत्तींचा वाढता प्रकोप – अवकाळी पाऊस, दुष्काळ, तसेच कीड व रोगांच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पिक विमा योजना ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची संरक्षण कवच ठरते.परंतु, सध्याच्या स्थितीत वाशिम जिल्हा पिक विमा योजनेतून वगळण्यात आल्यामुळे येथील शेतकरी आर्थिक संरक्षणापासून वंचित राहत आहेत. यामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच तीव्र झाल्या असून त्यांच्यावर मोठा अन्याय होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.आमदार डहाके यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की, शासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा व वाशिम जिल्ह्याचा पिक विमा योजनेत समावेश करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा. यासोबतच त्यांनी मागील वर्षीही शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता, ज्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळाली होती.दरम्यान, कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेत शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची आशा व्यक्त होत आहे.

## संभाजीनगर - नागपूर महामार्गावर अपघात ट्रक चालक जागीच ठार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दि. २९ एप्रिल रोजी पहाटे सुमारे दीड वाजताच्या सुमारास संभाजी नगर- नागपूर महामार्गावर शेवती फाट्या जवळ भीषण अपघात झाला. जालना येथून कारंजा कडे येत असलेल्या ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या कडेला पलटी झाला.

या दुर्घटनेत ट्रक चालक ट्रकखाली दबून जागीच ठार



झाला. मिळालेल्या माहिती नुसार, अपघाताची माहिती महाराष्ट्र पोलीस कर्मचारी दीपक ढोबळे यांनी तत्काळ श्री गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांना दिली. त्यानंतर कारंजा येथील ॲम्बुलन्स चालक शुभम खोड हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या सहाय्याने ट्रक खाली अडकलेल्या चालकाला बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी अंती त्यांना मृत घोषित केले.मृत चालकाचे नाव सुनील विष्णू पवार (वय ४८, रा. सोनोशी, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा) असे आहे. घटनास्थळी मदतीसाठी कक्ष सेवक अमर सोनोने तसेच कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते. या प्रकरणाचा पुढील तपास कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.

## स्नेहल इढोळे व सिद्धी खोलगाडे नवोदय विद्यालयासाठी पात्र

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील अडोळी येथील जि.प.प्राथ.केंद्रीय शाळेच्या विद्यार्थ्यांनी कु. स्नेहल मदन इढोळे व कु.सिद्धी गंगाधर खोलगाडे यांची सन २०२६-२७ च्या शैक्षणिक वर्षासाठी वाशीम येथील नवोदय विद्यालयामध्ये निवड झाली.आहे.

कु.स्नेहल इढोळे व कु.सिद्धी खोलगाडे या दोन विद्यार्थ्यांनीची निवड झाल्यामुळे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी नुकत्याच झालेल्या तोंडगाव येथील कार्यक्रमात निवड झालेल्या मुलींचे प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले आहे. कु.स्नेहल इढोळे व कु.सिध्दी





खोलगाडे यांची निवडीमुळे अडोळी जि. प.प्राथ. शाळेचे केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांचे वतीने त्यांचे अभिनंदन होत असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे..

## मनसेच्या आंदोलनाला यश, २०२१ पासून कंपनीकडे थकीत असलेले ८१९ शेतकऱ्यांचे पैसे मिळणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

किनखेडा शेत शिवारात शेतकऱ्यांच्या शेतातून गेलेल्या लाईनचा मोबदला मनेसेच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना मिळणार असून याचा लाभ ८१९ शेतकऱ्यांना मिळणार आहे. सदर पैसे हे कंपनीकडे २०२१ पासून थकीत होते.

याबाबत सविस्तर असे की, वाशिम जिल्ह्यातून पावर ग्रिड ऑफ कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड १२०० के.व्ही. वर्धा टू औरंगाबाद या कंपनीकडे शेतकऱ्यांच्या शेतातून नेलेल्या लाईनचा मोबदला हा गेल्या २०२१ पासून प्रलंबीत होता. यामध्ये जिल्ह्यामध्ये ८१९ कास्तकारांची करोडो रुपयांची रक्कम या कंपनीकडे बाकी होती. यामध्ये किनखेड्याचे ४६ शेतकऱ्यांची रक्कम बाकी असल्याबाबत वारंवार कंपनीकडे निवेदने देण्यात आली. कोणतीही कारवाई न झाल्यामुळे २७ एप्रिल २०२६ रोजी टॉवर चढो आंदोलन छेडण्यात आले होते. मनसेचे जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

## मोहजा रोड ते सावरगाव जीरे वळण रस्त्यावर दिशा दर्शक फलक लावण्याची मागणी!





■ प्रतिनिधी | वाशीम ■

मोहजा रोड ते सावरगाव जीरे दरम्यान वळण रस्त्यावर दिशा दर्शक फलक नसल्याने रात्रीच्या वेळी बाहेरील व्यक्ती व नवीन येणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी मा. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद वाशीम यांना दि. २७ एप्रिल रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

पुढे निवेदनात नमूद केले आहे की मोहजा रोड येथुन दक्षिणेस तीन किलोमीटर अंतरावर सावरगाव जीरे हे गाव असून दरम्यान नागमोडी वळण रस्त्यावर दिशा दर्शक फलक नाहीत त्यामुळे बाहेरील व्यक्ती, रुग्णवाहिका किंवा नवीन येणाऱ्या प्रवाशांना रात्रीच्या वेळी योग्य मार्ग समजत नाही म्हणून सदर रस्ता हा अतिशय सुकर झाला आहे म्हणून या मार्गावर रात्रीच्या वेळी भरधाव वेगाने वाहने चालवतात त्या कारणाने प्रमुख वळणावर दिशा दर्शक फलक नसल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सदर मार्गावरील प्रमुख वळणावर सार्वजनिक हितासाठी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्याची कार्यवाही करावी अशी नम्र विनंती मा. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद वाशीम यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## जिल्ह्यात अवैध दारूविक्रीला उधाण; महिलांचा एल्गार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील ग्रामीण भागात अवैध दारू विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने सामाजिक वातावरण बिघडत असून, तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे झुकत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर वजीरतही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्ष आरतीताई ठोके यांच्या नेतृत्वात पंचाळा, मोहगव्हाण, सुरकंडी, वाई, वारला, जयपूर, सोनगव्हाण, पांगरखेडा, आडोळी, काटा, कोंडाळा, बोराळा, तामसाळा, उकळी, सुकळी गेथील ग्रामपंचायत पदाधिकारी, तसेच शहरातील महिला व नागरिकांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून अवैध दारूविक्री तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,



संबंधित गावांमध्ये मोठ्या प्रमाणात गावठी दारूची निर्मिती व विक्री सुरू असून, काही ठिकाणी बाहेरील अवैध दारूच्या बाटल्यांचीही खुलेआम विक्री होत आहे. या बेकायदेशीर प्रकारामुळे गावातील सामाजिक वातावरण दूषित होत असून, विशेषतः तरुण वर्गात व्यसनाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक संतुलन बिघडत असून, युवकांचे भविष्य धोक्यात येत असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय, अवैध दारू विक्री करणाऱ्या व्यक्तींकडून गावकऱ्यांशी उर्मट वर्तन, शिवीगाळ तसेच भांडणांचे प्रकार वाढले आहेत. परिणामी, महिला व मुलींना सार्वजनिक ठिकाणी वावरताना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. गावातील शांतता व सुव्यवस्थेला यामुळे गंभीर धोका निर्माण झाला असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. महिलांनी या समस्येविरोधात एकजूट दाखवत पुढाकार घेतला असून, 'वङ्कादेही महिला विकास संघ'च्या संस्थापक अध्यक्षा आरती ताई ठोके यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. महिलांनी प्रशासनाकडे स्पष्ट शब्दांत मागणी केली आहे की, संबंधित ठिकाणी तात्काळ छापे टाकून अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी नियमित तपासणी व कडक नियंत्रण यंत्रणा राबवावी. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून या निवेदनाची गंभीर दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा ग्रामस्थ व महिलांनी व्यक्त केली आहे. जर लवकरात लवकर ठोस कारवाई झाली नाही, तर यापुढे आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. ग्रामीण भागातील वाढती अवैध दारूविक्री ही केवळ कायद्याचा भंग नसून सामाजिक स्वास्थ्यासाठीही धोकादायक ठरत असल्याने, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. आता प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मालेगावात 'गो सन्मान आव्हान अभियान'चा प्रचंड प्रतिसाद - शिव चौक ते तहसील कार्यालय भव्य रॅली

■ प्रतिनिधी | मालेगांव ■

महिला, पुरुष व युवकांची मोठी उपस्थिती; गो सन्मान फलक-बॅनरसह घोषणाबाजी करत तहसीलदारांना निवेदन सादर आज मालेगाव येथे 'गो सन्मान आव्हान अभियान' अंतर्गत भव्य जन रॅली पार पडली.



शिव चौक येथील श्री राम मंदिरापासून ते तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या भव्य रॅली मध्ये महिला, पुरुष तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांच्या हातामध्ये विविध गो सम्मान आव्हान अभियान फलक व बॅनर होते, ज्यावर गोसंरक्षण, गोसंवर्धन आणि गोवंशाच्या सन्मानासाठी ठोस कायदा करण्याच्या मागण्या स्पष्टपणे मांडण्यात आल्या. गो सम्मान रॅली दरम्यान 'गोमाता संरक्षण करा', 'गोहत्या बंदी लागू करा' शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आलेल्या या गो सम्मान रॅली मुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तहसील कार्यालयात पोहोचल्या नंतर प्रतिनिधी मंडळाने तहसीलदार साहेबांना निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये केंद्र सरकारने गोसंरक्षणासाठी कठोर आणि एकसंध कायदा लागू करावा, तसेच भारतीय संविधानातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात मालेगावातील सर्व गोसेवक प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, संतवर्ग व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततेत आणि संघटित पद्धतीने पार पडला असून या रॅली मुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात यश आल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली मालेगावातील या भव्य प्रतिसादामुळे 'गो सन्मान आव्हान अभियान'ला आणखी बळ मिळाले असून भविष्यातही अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांना वेग मिळणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## 'ग्लोबल वॉर्मिंगचा वाढता धोका; वृक्षलागवड व संवर्धन हाच उपाय'

### एक पाऊल पर्यावरणासाठी ; आपल्याच जीवनासाठी पर्यावरण रक्षणासाठी लोकसहभाग आणि जनजागृतीची गरज - अभिजीत जोशी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाढते तापमान, बदललेले ऋतुचक्र, अवकाळी पाऊस, गारपीट आणि प्रदूषणाच्या वाढत्या संकटामुळे पर्यावरणाचा झपाट्याने ऱ्हास होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या वाढत्या परिणामांमुळे पृथ्वीसमोर गंभीर संकट निर्माण झाले असून यावर एकमेव उपाय म्हणजे वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन, असे मत राष्ट्रीय हरीत सेना समन्वयक तथा मास्टर ट्रेनर



अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी व्यक्त केले.मानवाच्या अस्तित्वापूर्वी पर्यावरण अस्तित्वात होते, त्यामुळे पर्यावरणाचे जतन करणे ही मानवाची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र, स्वार्थी वृत्तीमुळे मानवाने नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरेक वापर करून पर्यावरणाचा समतोल बिघडविला आहे. परिणामी, तापमानवाढ, ओझोन थराची हानी, जल, वायू व भूमी प्रदूषण, वन्यजीवांचा ऱ्हास आणि नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढली आहे. इतिहासातही पर्यावरण संरक्षणावर भर देण्यात आला होता. वेद, उपनिषदे, याज्ञवल्क्य स्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र तसेच सम्राट अशोक आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातही वृक्षसंवर्धनाला महत्त्व देण्यात आले होते. संत परंपरेतूनही पर्यावरण जतनाची शिकवण दिली गेली आहे.आज वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणामुळे जंगलांचा ऱ्हास होऊन 'सिमेंटची जंगले' वाढली आहेत. त्यामुळे तापमानात मोठी वाढ होत असून भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. या संकटावर मात करण्यासाठी शासनाने केलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी तसेच लोकसहभाग आवश्यक आहे. शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे धडे दिल्यास भावी पिढी पर्यावरण रक्षणात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. समाजाने एकत्र येऊन जनजागृती केल्यास आणि वृक्षलागवड व संवर्धनाला प्राधान्य दिल्यासच पर्यावरणाचा ऱ्हास थांबविता येईल, असेही जोशी यांनी नमूद केले.

## गांजासह दुचाकी जप्त, एक जण अटकेत अकोट शहर पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहर पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी सापळा रचून गांजा विक्री करणाऱ्या एका इसमाला रंगेहात पकडत मोठी कारवाई केली. आरोपीकडून १ किलो ४५७ ग्रॅम गांजा आणि एक मोटरसायकल असा एकूण ८४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २८ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारास अकोट शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाचे प्रभारी पोउपनि निलेश बारहाते यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, बर्फाच्या कारखान्याकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर एक इसम गांजा विक्री करत आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक अमोल माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पंच, व्हिडिओग्राफर व वजन काटा घेऊन घटनास्थळी धाव घेतली.दरम्यान, संशयित इसम मोटरसायकलला थैली लटकवून नागरिकांना गांजा विक्री करताना आढळून आला. पोलिसांनी तत्काळ पंचांसमक्ष छापा टाकत त्याची झडती घेतली असता थैलीतून गांजा आढळून आला. चौकशीत त्याने आपले नाव सुरेंद्र प्रल्हाद बेहतरे (वय ४८, रा. मोचीपुरा, नरसिंग रोड, अकोट) असे सांगितले. पोलिसांनी आरोपी कडून १ किलो ४५७ ग्रॅम गांजा (किंमत २४,७०० रुपये) तसेच हिरो पॅशन कंपनीची मोटरसायकल (किंमत ६०,००० रुपये) असा एकूण ८४,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल माळवे, पोउपनि निलेश बारहाते, पो.हे.कॉ. नरेंद्र जाधव, पोहेका गजानन राठोड, पोहेका गणेश सोळंके, पोहेका सुबोध खंडारे, पोहेका नंदकिशोर कुलट, नापोकॉ विपुल सोळंके, पोकॉ नितेश सोळंके, पोकॉ अश्विन चव्हाण, पोकॉ मोहन दुर्गे व पोकॉ कपिल राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## शहरात नागरिकांच्या तर्फे पाणी वाटप: सर्वत्र कौतुक



■ प्रतिनिधी मालेगांव ■

येथील सोनू बळी व नितीन बळी यांच्या तर्फे शहरातील पाण्याची टंचाई लक्षात घेता त्यांनी वार्ड क्र १५ व १२ मध्ये पाणी वाटप स्वखर्चाने केले जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून त्यांनी आज पासून शहरातील प्रभाग क्रमांक १५ व १२ मध्ये पाणी वाटप सुरू केले आहे त्यांच्या या कार्यामुळे नागरिकाना पाणी मिळत असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.नगरपंचायत ने पुढाकार घेण्याची गरज ... शहरात सर्वत्र आज पाण्याची गरज जाणवत असताना नगरपंचायत नी अजून टँकर वाटप सुरू केले नाही शहरातील प्रत्येक प्रभागात कमीत कमी दोन टँकर दिवस रात्र नगरपंचायत सुरू केल्यास नागरिकांना पाण्याची टंचाई भासणार नाही. नगरपंचायत ने शहरामध्ये पाणी वाटप करण्याची गरज बोलल्या जात आहे .


**Name Change**

I have change My name FROM **Anis Kha Mardan kha** TO **Anis Khan Mardan Khan.**
**Address-**
Indra Nagar, Taj Chowk, Ashok Nagar, Akot Fail, Akola Dist.Akola-444003

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५३ ■ गुरुवार, ३० एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## गावागावात सत्तेचा नवा झेंडा-पोटनिवडणुकीत मतदारांचा कडक कौल; ३ सरपंच, ६ सदस्य विजयी : ढोल-ताशांत जल्लोष

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत मतदारांनी आपला निर्णायक कौल देत गावपातळीवरील सत्तेची नवी समीकरणे ठरवली. २७ ग्रामपंचायतींमध्ये पार पडलेल्या या निवडणूक प्रक्रियेत ३ सरपंच आणि ६ सदस्य विजयी झाले असून गावागावात नव्या नेतृत्वाची नांदी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे ६ ग्रामपंचायत क्षेत्रांतील १२ मतदान केंद्रांवर तब्बल ७८.५४ टक्के मतदान होऊन ग्रामीण भागातील लोकसहभाग अधोरेखित झाला. संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली असली तरी निकालानंतर गावागावात जल्लोषाचा स्फोट झाला.

या निवडणुकीत आधीच १३ सदस्य बिनविरोध निवडून आले होते, तर १९ जागांवर एकही अर्ज न आल्याने स्थानिक राजकारणातील उदासीनताही उघड झाली. मात्र जिथे लढत झाली, तिथे मतदारांनी चुरशीच्या लढतीतून आपले प्रतिनिधी निवडले.

**दहेगावात खुरपडे यांची एकहाती बाजी**

समुद्रपूर तालुक्यातील दहेगाव ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी तिरंगी लढत रंगली. आदित्य खुरपडे यांनी ४०५ मते मिळवत प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली. या विजयाने गावातील राजकीय समीकरणेच बदलली असल्याची चर्चा रंगली आहे.

**नांदोरा (ड)मध्ये गायकवाड यांचा विजय; करंजीत थरारक लढत**

नांदोरा (डफरे) येथे अनुसूचित जाती महिला राखीव सरपंच पदावर नयना मंगेश गायकवाड यांनी विजय संपादन केला.

तर करंजी (काजी) येथे सरपंचपदासाठी अक्षरशः श्वास रोखून धरणारी लढत झाली. हर्षा लोकेश वल्के यांनी ४८१ मते मिळवत केवळ १६ मतांच्या फरकाने लीना सडमाके यांचा पराभव केला. या लढतीने संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले.



**बोरगाव (टुमनी)सह सदस्य पदांवरही झुंज**

आष्टी तालुक्यातील बोरगाव (टुमनी) येथे सूरज मनोहर ढोले यांनी २७७ मते मिळवत विजय मिळवला.

उबदा येथे मयुरी मारोती चौधरी यांनी १२९ मतांनी बाजी मारली, तर वाघेडा येथे सुवर्णा निलेश महाकाळे यांनी १५० मतांनी विजय मिळवून आपली ताकद दाखवून दिली.

**करंजी व नांदोऱ्यात सदस्यांची दमदार एंट्री**

करंजी (काजी) येथे प्रीती विशाल सडमाके यांनी १३७ मते मिळवत विजय मिळवला.

नांदोरा (डफरे) प्रभाग २ मधून जीजा मोहन लोणसावळे आणि वृषाली राहुल डफरे यांनी विजय मिळवत स्थानिक राजकारणात आपली छाप उमटवली.

**१३ सदस्य बिनविरोध; काही ठिकाणी निवडणूकच नाही**

जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये १३ सदस्य बिनविरोध निवडून आले. वर्धा, आर्वी, आष्टी, हिंगणघाट आणि समुद्रपूर तालुक्यांमध्ये काही ठिकाणी थेट निवड झाली. दुसरीकडे १९ जागांवर एकही उमेदवार पुढे न आल्याने निवडणूकच झाली नाही, ही बाब मात्र राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

**गुलाल, ढोल-ताशे आणि विजयी रॅल्या**

निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी समर्थकांसह जल्लोष साजरा केला. गुलाल उधळत, फटाके फोडत आणि ढोल-ताशांच्या गजरात गावातून विजय रॅल्या काढण्यात आल्या. काही ठिकाणी तर रात्री उशिरापर्यंत उत्सवाचे वातावरण होते.

**ग्रामराजकारणात नवे चेहरे; बदलाची चाहूल**

या पोटनिवडणुकीतून अनेक नवोदित चेहरे पुढे आले असून ग्रामीण सत्ताकारणात बदलाची चाहूल लागली आहे. मतदारांनी दिलेला हा कौल केवळ निवडणुकीचा निकाल नसून गावांच्या भविष्यासाठी दिलेला स्पष्ट संदेश असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

## दारात येणार डिजिटल जनगणना:१ मेपासून सेलूत ऐतिहासिक मोहिमेचा श्रीगणेशा

### -'स्वयं-गणने'ची सुवर्णसंधी; नागरिकांनीच भरायची स्वतःची माहिती

**सेलू । जनमाध्यम :** देशाच्या जनगणनेच्या इतिहासात नवे पर्व सुरू होत असून, पहिल्यांदाच डिजिटल पद्धतीने होणारी जनगणना सेलू तालुक्यात १ मेपासून सुरू होणार आहे. घरबसल्या स्वतःची माहिती स्वतः भरा अशी सुवर्णसंधी नागरिकांना उपलब्ध करून देत प्रशासनाने सहभागाचे आवाहन केले आहे.




सेलू तालुक्यात १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वयं-गणनेचा पहिला टप्पा राबविण्यात येणार असून, नागरिकांना अधिकृत पोर्टलवर जाऊन स्वतःची माहिती भरता येणार आहे. कुटुंब प्रमुखाचे नाव आणि १० अंकी मोबाईल क्रमांक वापरून सहज नोंदणी करता येणार असून, ही सुविधा विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे.

माहिती भरल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला एक 'विशेष ओळख क्रमांक (ID)' मिळणार असून, तो सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक आहे. पुढील टप्प्यात जेव्हा प्रगणक घरभेटीस येतील, तेव्हा हा आयडी देऊन माहिती अधिकृतपणे नोंदवली जाईल.

या मोहिमेसाठी सेलू तालुक्यात तब्बल २१३ प्रगणक, ३५ पर्यवेक्षक आणि ३ फील्ड ट्रेनर नियुक्त करण्यात आले असून, संपूर्ण प्रक्रिया अत्याधुनिक ॲप्लिकेशनद्वारे पार पडणार आहे. घरांची स्थिती, पाणी, वीज, स्वच्छता, मालमत्ता अशा विविध बाबींची सखोल माहिती संकलित केली जाणार आहे.

प्रशासनाने नागरिकांना दिलासा देत स्पष्ट केले आहे की, सर्व वैयक्तिक माहिती पूर्णतः गोपनीय आणि सुरक्षित राहणार आहे.

दरम्यान, तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांनी नागरिकांना आवाहन करताना म्हटले आहे, जनगणना हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १५ वर्षांनंतर होत असलेल्या या ऐतिहासिक प्रक्रियेत प्रत्येकाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. १ ते १५ मे दरम्यान स्वयं-गणना करून, पुढील टप्प्यात प्रगणकांना सहकार्य करावे. आता डिजिटल युगात जनगणना घरपोच आली असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घेत सहभाग नोंदवणे हीच काळाची गरज ठरत आहे,

## पावडे चौकात विद्युत डीपीला आग; तातडीच्या कारवाईने परिस्थिती नियंत्रणात

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील पावडे चौक परिसरात बुधवारी सायंकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास विद्युत वितरणाच्या डीपीला आग लागल्याची घटना घडली. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडल्याने काही काळ परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले.



प्राथमिक माहितीनुसार, डीपीमधील तेल गळतीला उष्णतेचा परिणाम होऊन आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. आग लागल्यानंतर धुराचे लोट उसळत असल्याने स्थानिक नागरिकांनी तत्काळ सतर्कता बाळगत संबंधित यंत्रणांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच नगर परिषदेचे अग्निशमन पथक तसेच महावितरणचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सुमारे अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या दरम्यान सुरक्षेच्या दृष्टीने वीजपुरवठा काही काळ खंडित करण्यात आला होता.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र डीपीचे नुकसान झाले आहे. उन्हाळ्यातील वाढत्या तापमानामुळे विद्युत यंत्रणांवर ताण येत असल्याने आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## एप्रिलमध्येच वर्ध्यावर पाणीटंचाईचे सावट | १५ गावांवर जलसंकट

**वर्धा जनमाध्यम :** यंदाच्या एप्रिल महिन्यात जिल्ह्यातील तापमानाने गेल्या तीन दशकांचा उच्चांक मोडला असून तब्बल ४६.५ अंश सेल्सिअसपर्यंत पारा पोहोचला आहे. वाढत्या उष्णतेचा परिणाम जलस्रोतांवरही जाणवत असून वर्धा शहरासह परिसरातील गावांमध्ये पाणीटंचाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महाकाळी येथील धाम प्रकल्प हा वर्धा शहरासह सुमारे १५ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. मात्र, वाढत्या तापमानामुळे जलाशयातील पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत आहे. २९ एप्रिलपर्यंत या प्रकल्पात ४६.७३ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक असल्याची माहिती समोर आली आहे.

हवामान विभागाने मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सध्याची उष्णतेची तीव्रता कायम राहिल्यास मे अखेरीस धाम प्रकल्पातील पाण्याची पातळी आणखी घटण्याची शक्यता आहे. यापूर्वी २०१९ च्या उन्हाळ्यात धाम प्रकल्पातील मृत जलसाठ्याचा वापर करून पाणीपुरवठा करावा लागला होता. त्यामुळे यंदाही तशाच परिस्थितीची भीती व्यक्त होत आहे. वर्धा नगरपालिकेमार्फत शहरातील १४ हजार ६८१ नळजोडण्यांना पाणीपुरवठा केला जातो. तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पिपरी (मेघे)सह १४ गावांतील सुमारे २० हजार नळजोडण्या या प्रकल्पावर अवलंबून आहेत. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन न केल्यास नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते.

दरम्यान, पाटबंधारे विभागाकडून जलसाठ्याची अद्ययावत माहिती नियमितपणे उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे भविष्यातील नियोजनावरही परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. प्रशासनाने वेळेत उपाययोजना करून पाणी व्यवस्थापन काटेकोरपणे करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## धावत्या रेल्वेत अडीच वर्षांचे लेकरू 'एकटेच' - पालकांचा पत्ता नाही

### आरपीएफ-चाईल्ड हेल्पलाईनची धावपळ

**वर्धा । जनमाध्यम :** धावत्या रेल्वे गाडीत अडीच वर्षांचे निष्पाप लेकरू एकटेच प्रवास करत असल्याची धक्कादायक घटना वर्धा येथे उघडकीस आली असून, यामुळे रेल्वे प्रशासन आणि प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. बुधवारी (२९ एप्रिल) घडलेल्या या प्रकाराने सुरक्षा व्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उभा केला आहे.



प्राप्त माहितीनुसार, जबलपूर–अमरावती प्रवासी रेल्वे इटारसी स्थानक सोडल्यानंतर काही प्रवाशांच्या नजरेस एक अडीच वर्षीय बालक पालकाविना फिरताना दिसले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रवाशांनी तत्काळ रेल्वेतील टीसीला माहिती दिली.

कर्तव्यावर असलेल्या टीसीनेही वेळ न दवडता ही बाब रेल्वे सुरक्षा बल (इंइ) अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर धावत्या गाडीतच संबंधित बालकाच्या पालकांचा कसून शोध घेण्यात आला. मात्र, संपूर्ण डब्यात तपासणी करूनही बालकाचे पालक सापडले नाहीत, त्यामुळे अखेर मोठा निर्णय घेत बालकास वर्धा रेल्वे स्थानकावर उतरविण्यात आले.

यानंतर आरपीएफने तत्काळ चाईल्ड हेल्प लाईनला माहिती देत पुढील कार्यवाही सुरू केली. माहिती मिळताच हेल्पलाईनचे अधिकारी तातडीने स्थानकावर दाखल झाले आणि बालकास ताब्यात घेतले. बालकाची सुरक्षितता लक्षात घेता त्यास जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. सध्या या बालकाला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात येणार असून, समितीच्या निर्देशानुसार पुढील प्रक्रिया राबविली जाणार आहे. दरम्यान, धावत्या रेल्वेत एवढे लहान मूल एकटे कसे पालकांची बेपर्वाई की काही गंभीर प्रकार या प्रश्नांनी आता डोके वर काढले असून, संपूर्ण घटनेची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी जोर धरत आहे.

## गाडेगावजवळ आगीची घटना; नागरिकांच्या प्रयत्नांनी मोठा अनर्थ टळला

**गाडेगाव जनमाध्यम :** गाडेगाव-कानगाव मार्गावर गावापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर दुपारी आग लागल्याची घटना घडली. अज्ञात व्यक्तीने रस्त्यावर फेकलेल्या बिडी अथवा सिगारेटमुळे कोरड्या गवताला पेट लागून ही आग भडकली असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आग काही वेळातच पसरली. रस्त्यालगतची झाडे व झुडपे पेटल्याने परिसरात धुराचे लोट पसरले आणि काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच गाडेगाव येथील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठी जीवितहानी टळली असली, तरी रस्त्यालगतची काही झाडे व गवत जळून नुकसान झाले आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोरड्या गवतामुळे आग लागण्याच्या घटना वाढत असल्याने नागरिकांनी जळत्या वस्तू रस्त्यावर न फेकण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा निष्काळजी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही स्थानिकांकडून होत आहे.

## नोंदणी केली पण खरेदी कुठे, शेतकऱ्यांची थट्टा थांबवा

### हरभरा घरात सडतोय; आठ दिवसांत खरेदी न झाल्यास उग्र आंदोलन-बाळा जगताप

**आर्वी । जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या घामाला हमीभावाचा न्याय देण्याचे गाजर दाखवून प्रशासनाने पुन्हा एकदा त्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याचा संतापजनक प्रकार आर्वी तालुक्यात उघड झाला आहे. नाफेड अंतर्गत हरभरा खरेदीची घोषणा करूनही प्रत्यक्षात मात्र हजारो क्विंटल हरभरा शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. या अन्यायाविरोधात काँग्रेसचे नेते तथा प्रहार सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष बाळा जगताप यांनी थेट इशारा देत प्रशासनाला धारेवर धरले आहे, आठ दिवसांत सर्व हरभरा खरेदी करा, अन्यथा रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन छेडू.

तालुक्यातील ११३४ शेतकऱ्यांनी हरभरा विक्रीसाठी नोंदणी केली.

मात्र त्यातील केवळ १९० शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्यात आला आहे. उर्वरित तब्बल ९४३ शेतकऱ्यांचा हरभरा अजूनही घरातच पडून, विक्रीच्या प्रतीक्षेत सडत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हा माल अडकून असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक कंबरड्याला मोठा फटका बसला आहे.

खुल्या बाजारात हरभऱ्याला कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी हमीभावाच्या आशेने नाफेडकडे धाव घेतली होती. यंदा कपाशी, तूर आणि सोयाबीन पिकांनी दगा दिल्याने अनेकांनी रब्बी हंगामात हरभऱ्यावरच शेवटची बाजी लावली. निसर्गाने साथ दिल्यामुळे उत्पादन चांगले आले, पण आता नाफेडच्या संथ आणि बेफिकीर कारभारामुळे शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फिरले आहे.

हरभरा विक्रीतून मिळणाऱ्या पैशावरच पुढील शेतीचा खर्च आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असताना, खरेदीच ठप्प झाल्याने शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. नोंदणी करूनही खरेदी होत नसेल, तर ही उघड शेतकरी फसवणूक आहे, असा संतप्त सूर शेतकरी वर्गातून उमटत आहे. दरम्यान, बाळा जगताप यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत बजावले आहे की, येत्या आठ दिवसांत सर्व नोंदणीकृत हरभऱ्याची खरेदी पूर्ण करण्यात यावी, अन्यथा शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल.

आता प्रशासन जागे होणार की पुन्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार, हा सवाल प्रत्येक शेतकऱ्याच्या डोळ्यात धगधगत आहे.

## धावत्या दुचाकीला आग,माजी सैनिक थोडक्यात बचावले,दुचाकी खाक

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील ज्ञानेश्वर नगर परिसरातील माजी सैनिक ड्यूटीवरुन परत येत असताना, धावत्या दुचाकीला अचानक आग लागल्याची घटना रात्री घडली. सुदैवाने पेढेकर यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ दुचाकी बाजूला घेतली आणि मोठा अनर्थ टळला.

ज्ञानेश्वर नगर म्हसाळा येथील गजानन पेढेकर हे नागपूर येथील एका खासगी कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. ड्युटी आटोपून ते एमएच ३२ ए डब्ल्यू ६४९० या क्रमांकाच्या दुचाकीने वर्ध्याकडे परत येत होते. दरम्यान, प्रवासात असतानाच त्यांच्या दुचाकीतून अचानक धूर निघू लागला. काही क्षणातच वाहनाने पेट घेतल्याने परिस्थिती गंभीर बनली.



प्रसंगावधान राखत त्यांनी तत्काळ वाहन रस्त्याच्या कडेला थांबवून स्वतःचा जीव वाचवला. दरम्यान, आगीने काही वेळातच विक्राळ रूप धारण करत संपूर्ण दुचाकी जळून खाक झाली. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्परतेने मदत करत पेढेकर यांना सुरक्षित स्थळी हलवले. काहींनी आग विझवण्याचा प्रयत्नही केला, मात्र तोपर्यंत वाहन पूर्णतः जळाले होते.या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, दुचाकीला कशामुळे लागली असावी याची माहिती प्राप्त झाली नाहीत.नागपूर मार्गावर या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकारामुळे वाहनांच्या नियमित देखभालीची गरज अधोरेखित झाली असून, अशा घटना टाळण्यासाठी संबंधितांनी आवश्यक दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## वर्धा जिल्ह्यात ६७ रुग्णांना सुमारे ६३.४० लाखांची मदत

### -मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**वर्धा जनमाध्यम :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी 'आधार' ठरत आहे. वर्धा जिल्ह्यात आर्थिक वर्षात ६७ रुग्णांना सुमारे ६३ लाख ४० हजार रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींचे सहकार्य मिळत आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.



**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत वर्धा जिल्ह्यातील ६७ रुग्णांना सुमारे ६३ लाख ४० हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून वर्धा जिल्ह्यातील ६७ पात्र व गरजू रुग्णांना ६३ लाख ४० हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे. ही योजना अनेक कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत आहे. जलद, पारदर्शक आणि संवेदनशील कार्यपद्धतीमुळे पात्र रुग्णांना वेळेत उपचारासाठी आर्थिक सहाय्य मिळत आहे. गरजूंनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.


MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

Proposals are invited on e-tender by this office from registered & experienced Firms/Contractors in the prescribed Tender form for **SUPPLY OF VARIOUS SIZES OF TINNED COPPER FUSE WIRE TO WARDHA CIRCLE** Tender No. **SE/WRD/TECH/2026-27/T-08**

The e-tenders can be downloaded from our website www.mahadiscom.in or http://etender.mahadiscom.in/eatApp after payment of requisite Tender fee ONLINE only. Tenders can be downloaded from **30.04.2026 to 07.05.2026**, The Pre Bid Meeting on dt. 04.05.2026 at 15:00 Hrs. The last date of tender submission is 07.05.2026 at 15.00 Hrs. & Tender will be opened on Dt. 08.05.2026, at 11.00 Hrs. if possible.

Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc., if any shall be available in our website only and will not be published in the News Papers separately.

Contact person: Executive Engineer (Adm) Mobile No.7875761027.

Sd/-
Superintending Engineer,
O&M, Circle, MSEDCL, Wardha.

NZ PRO No. 78/2026
Dt.29.04.2026

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

राज्य सरकारचे 7 मोठे निर्णय:

# दिव्यांगाच्या शिक्षण भरारीला आणखी बळ, बाबासाहेबांच्या नावे शिष्यवृत्ती; हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना

## महाराष्ट्र एआय धोरण 2026 जाहीर

### दहा हजार कोटींची गुंतवणूक, दीड लाख रोजगार संधी

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर वाढविण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र एआय धोरण-२०२६ जाहीर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. इंडिया एआय मिशनच्या धर्तीवर राबविण्यात येणा-या या धोरणाच्या माध्यमातून संशोधन, नवोपक्रम आणि जबाबदार प्रशासन यांना चालना देण्यात येणार आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ७० टक्के नोक-यांचे स्वरूप बदलणार आहे, त्यामुळे या धोरणात वेळेनुसार काळानुरूप बदल करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. २०३१ पर्यंत दहा हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि दीड लाखांहून अधिक रोजगार निर्माण करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहेत. जागतिक पातळीवर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अनेक देशांची स्पर्धा सुरु असताना महाराष्ट्राने 'नैतिक व सर्वसमावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाचे राष्ट्रीय केंद्र' ही आपली ओळख निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी 'महाराष्ट्र एआय मिशन' स्थापन करण्याचा प्रस्ताव या धोरणात मांडण्यात आला आहे. राज्यातील दोन लाख युवक व व्यावसायिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजनाही यात अंतर्भूत आहे. नैतिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात महाराष्ट्राने 'इंडिया एआय मिशन'साठी संदर्भ राज्य म्हणून ओळख मिळवावी हाच या धोरणाचा आत्मा आहे.

**सात स्तंभांवर उभे धोरण-**हे धोरण सात आधारस्तंभांवर उभारण्यात आले आहे. पहिला आणि सर्वात महत्त्वाचा स्तंभ म्हणजे राज्यव्यापी एआय पायाभूत सुविधांचा विकास. यात किमान दोन हजार जीपीयू संगणन क्षमता उपलब्ध करणे आणि 'कम्प्युट ॲज अ सर्व्हिस' या संकल्पनेतून शासकीय विभागांनाही या सुविधा वापरता येतील, अशी यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. पाच नवोन्मेष क्षेत्रांमध्ये एआय शहरेही विकसित केली जाणार आहेत. दुसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे स्थानिक डेटाचा वापर. मराठी भाषेसह प्रादेशिक बोलीभाषा आणि आदिवासी भाषांचे डेटासेट्स तयार करणे आणि 'स्टेट एआय डेटा एक्सचेंज' स्थापन करणे, हे या भागाचे वैशिष्ट्य असेल. केंद्र सरकारच्या 'एआय कोष' व्यासपीठाशी राज्याची यंत्रणा जोडली जाणार आहे. तिस-या स्तंभात 'महाराष्ट्र प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण केंद्र' (एमसीएटी) स्थापन करण्याची योजना आहे. उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्या दुहेरी भागीदारीतून हे केंद्र कार्य करेल.

**स्टार्टअप व लघुउद्योगांसाठी भरीव तरतूद-**लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) एआय क्षेत्रात आणण्यासाठी धोरणात विशेष तरतूद आहे. पाच हजार एमएसएमई ना एआय अंमलबजावणी खर्चावर २० टक्के अनुदान दिले जाणार असून 'महा एआय टूल्स हब' हे केंद्रीय व्यासपीठ स्थापन केले जाणार आहे. स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा समर्पित 'एआय स्टार्टअप व्हेंचर फंड' उभारण्यात येणार असून त्यात शासनाचे २५० कोटी आणि उद्योग क्षेत्राचे २५० कोटी असे योगदान अपेक्षित आहे. राज्यातील किमान एका एआय युनिकार्नच्या उभारणीस पाठबळ देणे हेही धोरणाचे उद्दिष्ट आहे. पाचव्या स्तंभात राज्यभरात १२ एआय इनक्युबेटर्स उभारले जातील. प्रत्येक स्टार्टअपला एक कोटी रुपयांपर्यंत अनुदान मिळणार असून महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना एक कोटी २५ लाखांपर्यंत आणि २५ टक्के अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले जाईल. सहाव्या स्तंभांतर्गत आरोग्य, कृषी, शिक्षण, नगर विकास, मराठी भाषा-संस्कृती आणि वित्त-महसूल या सहा क्षेत्रांत उत्कृष्टता केंद्रे स्थापन केली जातील. सातव्या आणि अंतिम स्तंभात नैतिक एआय वापरासाठी कायमस्वरूपी आराखडा तयार केला जाईल आणि प्रत्येक शासकीय विभागात वार्षिक एआय सज्जता लेखापरीक्षण बंधनकारक केले जाईल. उद्योगांना आकर्षित करण्यासाठी धोरणात भरीव आर्थिक सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. स्थिर भांडवली गुंतवणुकीवर कमाल २० टक्के भांडवली अनुदान, १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी, दहा वर्षांपर्यंत प्रति युनिट दोन रुपये वीज दर अनुदान, देशांतर्गत पेटंटसाठी आठ लाख व आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी दहा लाख रुपयांपर्यंत खर्च परतावा आणि २५ लाखांपर्यंत प्रमाणन खर्च परतावा अशा सवलती यात अंतर्भूत आहेत. आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभागी होणा-या उद्योगांना २५ लाखांपर्यंत भाडे परतावाही दिला जाणार आहे. यामुळे महाराष्ट्राचे एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाउल टाकले जाणार आहे..

### राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय!



## लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्समध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन

### *महाराष्ट्र शासनाकडून डॉक्टरेट करणा-यांसाठी शिष्यवृत्ती*

**मुंबई/प्रतिनिधी :**भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने प्रख्यात अशा लंडन स्कूल ऑफ इकानामिक्स ॲड पालिटिकल सायन्स संस्थेत अध्यासन स्थापनेचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यासनाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉक्टरेटसाठी शिष्यवृत्तीही देण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे, त्यांच्या विचारांवर आधारित सामाजिक न्याय, संविधानिक लोकशाही, आर्थिक समता आणि मानवी हक्कांच्या अभ्यासासाठी जागतिक दर्जाचे संशोधन केंद्र निर्माण करणे, हा अध्यासन स्थापन करण्यामागील उद्देश आहे.अध्यासनात संविधान आणि लोकशाही, सामाजिक समता, आर्थिक लोकशाही आणि पुनर्वितरण धोरणे, श्रमिक हक्क आणि सामाजिक संरक्षण, संघराज्यवाद आणि सार्वजनिक वित्त, समावेशक शासन व्यवस्था आदी विषयांवरील आंतरशाखीय संशोधनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यघटना अध्यन, सामाजिक न्याय आणि सार्वजनिक धोरण विषयांत प्रगत संशोधन करणे, वार्षिक व्याख्यानमाला, परिसंवाद आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे, लोकशाही आणि समावेशक विकास विषयक शैक्षणिक प्रकाशने आणि संशोधनाला चालना देणे, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था संशोधकांमध्ये शैक्षणिक सहकार्य वाढवणे ही अध्यासनाची उद्दिष्ट्ये असणार आहेत.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बौध्दिक वारसा असलेल्या विधि, शासन, आंतरराष्ट्रीय विकास, तत्वज्ञान, अर्थशास्त्र आणि पब्लिक पालिसी या विषयांतील विद्वान प्राध्यापक लंडन स्कूल ऑफ इकानामिक्समध्ये कार्यरत आहेत. पहिल्या दहा वर्षात या अध्यासनासाठी या संस्थेतील विद्यमान प्राध्यापकांतून निवड केली जाईल. त्यानंतर भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर खुल्या निवड प्रक्रियेव्दारे भरती केली जाईल.अध्यासनासाठी तत्वज्ञान, समाजशास्त्र, आंतरराष्ट्रीय विकास, शासन प्रशासन, विधि आणि सामाजिक धोरण असे संभाव्य विभाग असतील. अध्यासन स्थापन करण्यासाठी ३० लाख पौंड ( ३७ कोटी १३ लाख ८२,३०० रुपये) एकरकमी निधी दिला जाणार आहे.लंडन स्कूल ऑफ इकानामिक्स अड पालिटिकल सायन्स, महाराष्ट्र शासन आणि डॉ. . बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या समन्वयाने दहा पीएचडी शिष्यवृत्ती देण्यास मान्यता देण्यात आली. पीएचडीचा कालावधी चार वर्षाचा असेल. पहिली शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून आणि दुसरी शिष्यवृत्ती २०२९-३० मध्ये सुरू करण्यात येणार आहे. शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची छाननी लंडन स्कूल ऑफ इकानामिक्सच्या समितीव्दारे केली जाईल. राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी या योजनेअंतर्गत अर्ज करण्याची इच्छा स्पष्ट नमूद करणे आवश्यक असेल. त्यांचे अर्ज लंडन स्कूल ऑफ इकानाम्क्सिमधील संबंधित विभागांकडून विचारात घेतले जातील. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत अर्ज करणा-या उमेदवारांची आणि त्यांनी निवडलेल्या विभागांची माहिती लंडन स्कूल ऑफ इकानामिक्सला कळविली जाईल. शिष्यवृत्तीसाठीच्या अर्जांची छाननी लंडन स्कूल ऑफ इकानामिक्सच्या समितीव्दारे केली जाईल. पहिल्या दहा शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र शासन, बार्टी आणि लंडन स्कूल इकानामिक्स यांच्यादरम्यान ५०:५० प्रमाणात अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. २०२७-२८ वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यासाठी एक लाख ९१ हजार ३१७ पौंड खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच दोन कोटी ३६ लाख ८३ ९१६ रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी निम्मा म्हणजेच १ कोटी १८ लाख ४१ हजार ९५८ रुपये लंडन स्कूल ऑफ इकानामिक्स कडून निधी देण्यात येणार आहे.

## राज्यात 2047 पर्यंत 300 कोटी वृक्ष लागवड होणार

### *हरित महाराष्ट्र आयोग करणार नियोजन व अंमलबजावणी*



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्याने २०४७ पर्यंत ३०० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट्य ठेवले असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. आयोगाच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री असतील, तर उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष, वन मंत्री, पर्यावरण व हवामान बदल मंत्री, कृषी मंत्री आणि रोजगार हमी योजना मंत्री सहउपाध्यक्ष असतील. राष्ट्रीय वनधोरण १९८८ अनुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित किंवा वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. राज्यात वनाच्छादित आणि वृक्षाच्छादित क्षेत्र अनुक्रमे १६.५३ व ४.७२ टक्के आहे. त्यामुळे एकूण क्षेत्र २१.२५ टक्के होत असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी राज्याने दीर्घ नियोजन केले आहे. राज्याला हे उद्दिष्ट २०४७ पर्यंत साध्य करायचे आहे.

त्यासाठी ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, सनियंत्रण आणि वित्त पुरवठ्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वृक्ष लागवडीसाठी जागेची उपलब्धता आणि लँड बँक निर्मितीवर भर दिला जाईल. सध्या २९ हजार चौरस किलोमीटर जमीन उपलब्ध आहे. ३०० कोटी वृक्ष लागवडीसाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.राज्यातील वनाच्छादित, वृक्षाच्छादित तसेच गवताळ प्रदेशांचा गुणात्मक व परिणामात्मक विस्तार साध्य करणे, हवामान बदलास प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे, जलसंधारण सुधारणे, जमिनीचा पोत सुधारणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीस चालना देणे तसेच स्थानिक नैसर्गिक परिसंस्थांचे जतन क्षेत्रनिहाय पर्यावरणपूरक दृष्टीकोनातून वृक्षलागवड करणे यावर आयोगाच्या माध्यमातून भर दिला जाणार आहे. जिल्हानिहाय लँड बँक विकसित केल्या जाणार आहेत. त्यामध्ये वन विभाग, मनरेगा व अन्य विभागांशी समन्वय साधून जमीन उपलब्ध करून घेतली जाणार आहे. यामुळे सद्या विविध विभागांमार्फत सुरू असलेले वृक्षारोपण कार्यक्रम आणि अभियानाची एकात्मिक पद्धतीने अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे. राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीकरिता महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम. पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी हरित महाराष्ट्र आयोग काम करणार.

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दहावीनंतरच्या शिष्यवृत्तीमध्ये 12 वर्षानंतर भरीव वाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिव्यांग विद्यार्थ्यांना दहावीनंतरच्या शिक्षणासाठी पाठबळ मिळेल अशारितीने शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. १२ वर्षानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये पहिल्यांदाच भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उच्च माध्यमिक परिक्षोत्तर शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना या सुधारित योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना विद्यापीठ/संस्था/शिक्षण मंडळाला भरावे लागणारे शुल्क, प्रवेश फी, ट्युशन फी, नोंदणी फी, खेळ, यूनीयन, लायब्ररी, मॅगझिन, वैद्यकीय तपासणी यासारखे इतर द्यावे लागणारे अनिवार्य शुल्काकरिता रक्कम मंजूर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शिक्षण शुल्काव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे वित्तीय सहाय्य निश्चित करण्यात आले आहे. अर्थसहाय्य दरमहा या प्रमाणे. (कंसात पूर्वीचे दर)



गट १ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी, पदव्युत्तर डिप्लोमासाठी निवासी विद्यार्थ्यास १७०० (१२००) तर अनिवासी विद्यार्थ्यास ९०० (५५०) रु

गट २ अंतर्गत इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी निवासी विद्यार्थ्यास १२०० (८२०) तर अनिवासीसाठी ८५० (५३०) रु .

गट ३ अंतर्गत वरील दोन्ही गटात समाविष्ट नसलेल्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवासी विद्यार्थ्यास १२०० (८२०) तर अनिवासीसाठी ८५० (५३०) रु .

गट ४ अंतर्गत इयत्ता दहावीनंतरच्या पदवीतर डिप्लोमांसाठी निवासी विद्यार्थ्यास ११०० (५७०) तर अनिवासीसाठी ८०० (३००) रु . वित्तीय सहाय्य. अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक भत्ता गट १,२ आणि ३ साठी ३०० (१००) रुपये तर गट चार साठी २२५ (७५)रु .

अभ्यास दौरा खर्चासाठी वार्षिक १५०० (५००) रुपये (प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत) तर प्रकल्प (थेसिस) टंकलेखन व छपाई खर्च तसेच पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणासाठी प्रकल्प (थेसिस) टंकलेखन व छपाई खर्च व पुस्तकासाठीचा भत्ता १८०० (६००) रुपये करण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रकल्प, टंकलेखन, छपाई व पत्रव्यवहार, पुस्तकासाठी म्हणून आता १८०० रुपये (प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत) अभ्यास दौ-यासाठी १५०० रुपये आणि शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती संपूर्ण रक्कम मिळणार आहे. याशिवाय अंध विद्यार्थ्यांना आता वाचक भत्ता म्हणून गट १,२, ३ साठी दरमहा ३०० आणि गट ४ साठी २२५ रुपये दरमहा मिळणार आहेत.

## आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविल्या जाणा-या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचा-यांना १२ व २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतरची दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे आदिवासी विभागाच्या ५५६ अनुदानित आश्रमशाळांतील ७ हजार ५६२ शिक्षकेतर कर्मचा-यांना याचा लाभ होणार आहे.आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या आदिवासी जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी क्षेत्र विकासाचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आहे. या कार्यक्रमातंर्गत आदिवासी क्षेत्राचा शैक्षणिक विकास होण्यासाठी आश्रमशाळा महत्त्वाचा केंद्र बिंदू आहे. त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालविण्यात येत असून शाळांकरीता एकूण ७२४३ शिक्षक व ७५६२ शिक्षकेतर कर्मचारी पदे मंजूर आहेत. सध्या या अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी लागू असलेली सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची शिक्षकेतर कर्मचारी संघटनाची मागणी होती. यात शालेय शिक्षण विभागाने १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचा-यांना१२ व २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतरची २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना एक जानेवारी २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## हरित उर्जेसाठी 12 हजार 3030 कोटींची मॅजेस्टिक योजना

### 2030 पर्यंत अक्षय ऊर्जेचा स्त्रोत 50 टक्क्यांवर पोहचणार

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील हरित उर्जेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढविणे, पारेषण प्रणाली अधिक सक्षम करणे आणि उर्जा साठवण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्र : अक्सलीरेटिंग ग्रीन एनर्जी ॲड स्टोरेज टेक्नालीस इंटिग्रेशन इन कनेक्टेट ग्रीड (एमएजीईएसटीआयसी) या महत्त्वाकांक्षी योजनेस तसेच तिच्या प्राथमिक प्रकल्प अहवालास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील अक्षय ऊर्जेचा वाटा २०३० पर्यंत १७ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचा या योजनेस उद्देश आहे.या योजनेअंतर्गत सुमारे १२ हजार ३०३ कोटी रुपयांच्या खर्चाच्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये नवीन उपकेंद्रे व पारेषण वाहिन्यांची उभारणी, विद्यमान पारेषण यंत्रणेचे बळकटीकरण व आधुनिकीकरण, बॅटरी उर्जा साठवण प्रणाली (बीईएसएस) उभारणी तसेच उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी तांत्रिक सहाय्य अशा विविध घटकांचा समावेश आहे.योजनेचा प्राथमिक प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाकडे पाठविण्यासही मान्यता देण्यात आली आहे.या प्रकल्पासाठी आवश्यक निधीपैकी सुमारे ७० टक्के म्हणजे ८ हजार ६१६ कोटी रुपये जागतिक बँकेकडून कर्ज स्वरूपात उभारण्यात येणार आहे. या कर्जाची परतफेड महावितरण, महापारेषण, महानिर्मिती व एमआरईएल या कंपन्यांकडून करण्यात येणार आहे.उर्वरित ३० टक्के निधी संबंधित वीज कंपन्यांकडून उभारण्यात येणार असून महावितरण कंपनीसाठी शासनाकडून १ हजार ३७७ कोटी रुपये भागभांडवल स्वरूपात २०२६ ते २०३१ या कालावधीत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येईल.या योजनेद्वारे राज्यातील वाढती वीज मागणी अक्षय उर्जेतून पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. २०३० पर्यंत उर्जा मिश्रणात अक्षय उर्जेचा वाटा १७ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच पारेषण जाळे बळकट करून अधिकाधिक अक्षय उर्जा ग्रीडमध्ये समाविष्ट करणे, ग्रीडची विश्वासार्हता वाढविणे आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर त्याची क्षमता वाढविणे अपेक्षित आहे.

योजनेअंतर्गत ४० नवीन उपकेंद्रांची उभारणी, पारेषण क्षमतेत मोठी वाढ, उच्च कार्यक्षमतेचे कंडक्टर बसविणे तसेच १६,००० मेगावॅट-तास क्षमतेची बॅटरी उर्जा साठवण प्रणाली उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. याशिवाय कोयना, पानशेत, वरसगाव आदी ठिकाणी उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी तांत्रिक अभ्यासही करण्यात येणार आहे. ही योजना २०२६ ते २०३१ या कालावधीत राबविण्यात येणार असून तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उर्जा विभागात स्वतंत्र कक्ष व प्रकल्प सनियंत्रण यंत्रणा स्थापन करण्यात येणार आहे. हा निर्णय राज्याच्या हरित उर्जा धोरणाला बळ देणारा ठरणार असून दीर्घकालीन उर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## सहाय्यक फौजदार चेतना पाटील यांचा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केला सत्कार

### 8 वर्षीय बालिकेला तासाभरात शोधून काढले

**मुंबई/प्रतिनिधी :**छत्रपती संभाजीनगर येथून कुटुंबासह मुंबईत पर्यटनासाठी आलेली आठ वर्षीय अनाबिया शेख हरवल्यानंतर आझाद मैदान पोलीस स्टेशनच्या महिला सहाय्यक फौजदार चेतना पाटील आणि त्यांच्या पथकाने अवघ्या एका तासात बालिकेचा शोध घेउन तिला सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात दिल्याबद्दल मंत्रालयात पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. मंत्रालयातील पर्यटन मंत्र्यांच्या दालनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला सहाय्यक फौजदार चेतना पाटील यांना प्रशस्तीप्रत्रक देउन सन्मानित करण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सारख्या अतिविशाल आणि गर्दीच्या रेल्वे स्थानकाच्या परिसरात ही घटना घडली होती. दररोज लाखो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या स्थानकात हरवलेल्या बालिकेचा अल्पावधीत शोध घेणे हे अत्यंत आव्हानात्मक काम होते. अशा परिस्थितीत चेतना पाटील आणि त्यांच्या पथकाने दाखवलेली तत्परता, समन्वय आणि सूक्ष्म तपास कौतुकास्पद ठरला आहे.पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, मुंबईत आलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी दाखविण्यात आलेली तत्परता आणि संवेदनशीलता ही अत्यंत प्रशंसनीय आहे. पर्यटकांचा सुरक्षिततेवरील विश्वास अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारचे कार्य महत्त्वपूर्ण असून चेतना पाटील आणि त्यांच्या पथकाने केलेली कामगिरी पोलीस दलासाठी प्रेरणादायी आहे. पर्यटकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत हरवलेल्या बालिकेचा अल्पावधीत शोध घेउन सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात देणे ही जबाबदारीची उत्कृष्ट जाणीव दर्शवणारी बाब आहे. अशा उल्लेखनीय कार्याचा गौरव व्हावा यासाठी महिला सहाय्यक फौजदार चेतना पाटील यांच्या नावाची गृह राज्यमंत्री यांच्याकडे विशेष प्रशस्ती आणि गौरवासाठी शिफारस करण्यात येणार असल्याचे पर्यटन मंत्री देसाई यांनी सांगितले.

## नवीन बारा डायलिसीस केंद्रांचे 1 मे रोजी होणार लोकार्पण

**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील किडनी विकारग्रस्त रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देणा-या 'महाडायलिसीस' योजनेचा राज्यात महाराष्ट्र दिनी विस्तार करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १ मे रोजी नवीन बारा डायलिसीस केंद्राचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

राज्यातील किडनी विकारग्रस्त नागरिकांना मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाडायलिसीस योजना सध्या विविध शासकीय रुग्णालयांत प्रभावीपणे राबवली जात आहे. या सुविधेमुळे राज्यातील हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.

ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांपर्यंत ही सेवा पोहोचवून ग्रामीण भागातील रुग्णांना घराजवळच निशुल्क उपचार मिळावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेड्स, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा



### किडनी विकारग्रस्तांना दिलासा

उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या राज्यात ९२ महाडायलिसीस केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसिस बेड्स उपलब्ध आहेत.महाराष्ट्र दिनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १२ नवीन केंद्रांचे लोकार्पण होणार असून, त्यामुळे एकूण केंद्रांची संख्या १०४ वर पोहोचणार आहे. या नव्या केंद्रांमध्ये दुर्गम भागातील रुग्णालयांचाही समावेश करण्यात आला आहे. लोकार्पण होणा-या केंद्रांमध्ये मुरगुड (जि. कोल्हापूर), मूल (जि. चंद्रपूर), दारव्हा (जि. यवतमाळ), केज (जि. बीड), इगतपुरी (जि. नाशिक), रावेर (जि. जळगाव), मंगळवेढा (जि. सोलापूर), ढेबेवाडी (जि. सातारा), वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग), कुरखेडा (जि. गडचिरोली), दापोली (जि. रत्नागिरी) आणि बदलापूर (जि. ठाणे) येथील रुग्णालयांचा समावेश आहे. महाडायलिसीस योजना एंड-टू-एंड डिजिटल प्लॅटफार्मवर आधारित असून, http://mahadialysis.in या संकेतस्थळावर तसेच मोबाइल ॲपद्वारे माहिती व सेवा उपलब्ध आहेत. रुग्णांना ऑनलाईन स्लाट बुकिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उपचारासाठी प्रतीक्षा कालावधी कमी झाला आहे.या केंद्रांमध्ये प्रशिक्षित डायलिसीस तंत्रज्ञ, नर्सेस व सहाय्यक कर्मचारी कार्यरत असून, नेफ्रोलाजिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार दिले जात आहेत. स्वच्छता, सुरक्षितता आणि वैद्यकीय मानकांचे काटेकोर पालन केले जात आहे. तसेच रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन आणि आहारतज्ज्ञांचा सल्ला यांसारख्या सेवा रुग्णांना पूर्णतः मोफत दिल्या जातात.

ही योजना केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या संस्थेमार्फत राबवली जात असून, सर्व केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे. महाडायलिसीस योजनेमुळे खासगी उपचारांवरील आर्थिक भार कमी होउन सरकारी रुग्णालयांतच दर्जेदार व मोफत सेवा उपलब्ध झाल्याने राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळत आहे.

## महाराष्ट्र दिनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या क्षमता वाढीअंतर्गत उभारण्यात आलेल्या मिसिंग लिंक प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र दिनी १ मे रोजी पार पडणार आहे. राज्यातील वाहतूक व्यवस्थेला नवे बळ देणा-या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.

या मिसिंग लिंक चे उद्घाटन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी दु. १२:३० वाजता मिसिंग लिंक वरील पूल क्र.१, खोपाली एक्झिटजवळ, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग, जि. रायगड या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



**गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद-**मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकमुळे वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच रस्त्यावरील पूल पायल?न उंची (१८२ मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे.हा मिसिंग लिंक प्रकल्प मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे. राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या प्रकल्पामुळे आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीलाही गती मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## उष्णतेची लाट

विदर्भातील अमरावती, वर्धा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर या शहरांचे उष्णतामान एप्रिल महिन्यात ४५ ते ४६.९ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. तर महिनाभर कमी-अधिक फरकाने सारखेच आहे. दहा-पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत राज्यात ४५ अंश हे उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमान म्हणून नोंदवले जात असे. हवामान खात्याच्या नोंदी पाहिल्यास १९ मे १९१२ रोजी चंद्रपुरात ५०.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले होते. नंतरच्या काळात ४७.९ अंश ही एक नोंद आहे. यंदा ती मोडीत निघणार असे दिसते. जागतिक हवामान बदलांचे संकट दाराशी आले, त्याला दशकभराहून अधिक काळ लोटला आहे. आता दिवसागणिक त्याचे तीव्र चटके जगाच्या कोणत्या ना कोणत्या भागात अनुभवास येत आहेत. हजारो वर्षांपासून सुरू असणारे ऋतूचक्र जागतिक तापमानवाढीने बाधित झाले. ऋतूंची तीव्रता टीपेला पोहोचत आहे. फेब्रुवारी-मार्चनंतर वाढत जाणारे तापमान आणि कडक उन्हाळा असह्य पातळीवर पोहोचला आहे. महाराष्ट्रातील अकोला शहरामध्ये ४६.९ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली असून ते यंदाच्या मोसमातील देशातील सर्वाधिक ठरले. जगातील सर्वाधिक उष्ण शहरांच्या यादीमध्ये अकोल्याचे स्थान वरच्या दिशेने सरकले. महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात 'अँटिसायक्लोनिक' स्थितीमुळे उष्ण हवा जमिनीलगत साचून राहत आहे. निरभ्र आकाशामुळे सौरविकिरण थेट जमिनीपर्यंत पोहोचत असल्याने उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे, असे हवामान विभागाचे म्हणणे आहे. एखाद्या प्रदेशातील तापमान तिथल्या सरासरी कमाल तापमानापेक्षा ४.५ अंश सेल्सिअस ते ६.४ अंश सेल्सिअसने वाढते, तेव्हा त्याला 'उष्णतेची लाट' असे संबोधले जाते. १९७० च्या दशकानंतर अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील पृष्ठभागाच्या तापमानात झालेल्या वाढीमुळे भारतीय उपखंडातील उष्णतेच्या लाटा अधिक प्राणघातक ठरू लागल्या आहेत. १९९८, २००२, २०१५ आणि २०२२ मधील उष्णतेच्या लाटांनी भारताला प्रचंड हादरे दिले. १९९८ मध्ये ओडिशात आलेल्या लाटेने दोन हजारांहून अधिक बळी घेतले. २०१५ मध्ये आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये तापमानाने ४७ अंशांचा टप्पा ओलांडला होता. २०२२ चा उन्हाळा ऐतिहासिक ठरला. कारण, भारताने गेल्या १२२ वर्षांतील सर्वात उष्ण मार्च महिना अनुभवला. या घटनांमागे अल निनोचा प्रभाव, आर्क्टिकमधील बर्फाचे वितळणे आणि स्थानिक पातळीवरील वाढते शहरीकरण (अर्बन हीट आयलंड इफेक्ट) ही प्रमुख कारणे आहेत. हवामान संशोधनात देशातील अग्रगण्य संस्था असणाऱ्या पुण्यातील भारतीय उष्णदेशीय हवामानशास्त्र संस्थेच्या तीन शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनातून भारतातील वाढत्या तापमानाचे गंभीर वास्तव समोर आले आहे. तब्बल ४० वर्षांतील दैनंदिन नोंदींचे विश्लेषण करून शास्त्रज्ञांनी मांडलेल्या निष्कर्षांनुसार १९८० च्या तुलनेत २०२० पर्यंत उष्णतेच्या लाटांची वारंवारिता आणि तीव्रता लक्षणीय वाढली आहे. केवळ दिवसाचे कमाल तापमानच नाही, तर रात्रीचे किमान तापमानदेखील वाढत चालले आहे. पूर्वी केवळ उत्तर भारतात मर्यादित असणारी उष्णतेची लाट आता दक्षिण भारत आणि किनारपट्टीच्या भागांतही वेगाने पसरत आहे. हा भविष्यातील संकटाची पूर्वसूचना देणारा इशारा आहे.वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणारे 'हीट आयलंड' आणि जागतिक तापमानवाढीचा स्थानिक हवामानावर होणारा परिणाम याबाबत आगामी काळात शेती, सार्वजनिक आरोग्य आणि ऊर्जा व्यवस्थापन या क्षेत्रांतील सरकारी धोरणे ठरवताना पुनर्विचार करण्याची गरज आहे. तापमानवाढीच्या झळा व्यापक असून गोरगरीब, कष्टकऱ्यांना विशेषतः ग्रामीण भागाला याचा फटका सर्वाधिक बसतो. शेतमजूर, हमाल, फेरीवाले यांना सूर्याच्या तप्त किरणांनी होणारी होरपळ अपरिहार्यपणे सहन करत गुजराण करावी लागते. 'अल निनो' सक्रिय झाल्यामुळे येणाऱ्या एक-दीड महिन्यात आणखी उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागू शकतो. झपाट्याने वाढत चाललेले प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान २.५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाल्यास त्याचे रूपांतर 'सुपर अल निनो'मध्ये होऊ शकते. तसे झाल्यास ती शतकातील भीषण नैसर्गिक आपत्ती ठरेल. १८७७-७८ मध्ये आलेला अल निनो हा मानवी इतिहासातील सर्वांत भीषण हवामान बदलांपैकी एक मानला जातो. या काळात प्रशांत महासागराचे तापमान असामान्यपणे वाढल्याने भारत, चीन, ब्राझील आणि आफ्रिकेत भीषण दुष्काळ पडून जगभरात सुमारे ३ ते ५ कोटी लोकांचा म्हणजे सुमारे ४ टक्के नागरिकांचा मृत्यू झाला होता.आता काही हवामानशास्त्रज्ञ २०२६ ते २०२७ हा काळ आधुनिक इतिहासातील सर्वांत उष्ण काळ ठरू शकतो, असे भाकित करत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, महासागरातील क्षारांचे वाढते प्रमाण 'अल निनो'ला अधिक शक्तिशाली बनवण्यासाठी पूरक ठरत आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते, २०३० पर्यंत उष्णतेमुळे कामाचे तास कमी झाल्याने भारताला जीडीपीच्या २.५ ते ४.५ टक्के हिस्सा गमवावा लागू शकतो. अतिउष्णतेमुळे बांधकाम क्षेत्र, वाहतूक आणि किरकोळ विक्री या क्षेत्रांतील कामगारांच्या कार्यक्षमतेत घट होते. त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. अतिउष्णता आणि जलटंचाईमुळे कोरडवाहू पिकांसह अन्य शेतपिकांची हानी होऊन शेतकरी भरडला जातो. दाणा भरण्याच्या काळात तापमान वाढल्यास रब्बी हंगामातील गव्हाचे उत्पादन १० ते १५ टक्क्यांनी घटते.यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो आणि महागाई वाढते. चलनवाढीमुळे क्रयशक्ती घटून उद्योगधंद्यांमध्ये मंदीसदृश स्थिती निर्माण होते. त्यामुळे तापमानवाढीचा विचार व्यापक अंगाने करणे गरजेचे आहे. मान्सूनचे आगमन झाले की, जलनियोजनाच्या चर्चा आणि प्रयत्न मागे पडतात; पण अल निनोची टांगती तलवार कायमची हटवायची असेल, तर जलसंधारण, जलवितरण, पाणी वापर, सिंचन व्यवस्था, पीक पद्धती, नागरी जलव्यवस्थापन, भूजल व्यवस्थापन या सर्वांबाबत काटेकोर धोरण आखून त्याची गतिमान व पारदर्शक अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, मागेल त्याला शेततळे यांसारख्या योजनांच्या माध्यमातून याबाबत सक्रिय पुढाकार घेतलेला आहे; पण येऊ घातलेल्या संकटाचा आकार महाकाय आणि बिकट आहे. त्याचा सामना शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, उद्योजक आणि नागरिक या सर्वच घटकांनी सामूहिकरीत्या करायला हवा.

# ... शेती धोरणात 'ती' कोठेच नाही

**आज शेतीचे प्रश्न अतिशय क्लिष्ट बनले आहेत. संधी मिळताच शेती सोडायची असते. परंतु शेतीमध्ये ठामपणे उभी असणारी आणि आपल्या संघर्षातून सर्वांगीण विकासाची वाट मोकळी करणारी अनेक कुटुंबे आजही संपूर्ण महाराष्ट्रात आढळतील. त्यामध्ये पुन्हा परस्पर संबंध असा, की जे कुटुंब शेतीमध्ये ठामपणे उभे आहे, त्या कुटुंबातील महिलांचे योगदान खूप मोठे आहे. त्यामुळे महिलांच्या कष्टाचा विचार पुन्हा नव्याने करणे आवश्यक झाले आहे.**



जगभरातील महिलांना आपल्या न्याय हक्कासाठी मोठा संघर्ष करावा लागला. भारतासारख्या देशांमध्ये तो संघर्ष तुलनेने खूपच मोठा होता, कारण इथली पुरुषसत्ताक, जातीय आणि वर्णवर्चस्ववादी व्यवस्था! महिलांच्या न्याय हक्कासाठी अनेक चळवळी भारतामध्ये झाल्या, त्यापैकी अनेक चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्राने केले. विशेषता स्त्री शिक्षणाबाबत महाराष्ट्राचे काम अतुलनीय आहे. ग्रामीण विकासासाठी म्हणून अस्तित्वात असणाऱ्या पंचायत राज व्यवस्थेमध्ये सरपंच ते जिल्हा परिषद अशा सर्व ठिकाणी आज महिलांचे प्रमाण ५० टक्के आहेत. त्याचप्रमाणे समाजातील सर्व क्षेत्रात आणि महत्त्वाच्या ठिकाणी आज महिला आपल्या कामाचा ठसा उमटवत आहेत. नोकरी करणाऱ्या स्त्रिया ते घरकाम करणाऱ्या स्त्रियांपर्यंत न्याय हक्कासाठी लढणाऱ्या अनेक संस्था आहेत, त्यांचे काम सुद्धा कौतुकास्पद आहे.

हे सर्व जरी असले तरी ही शेतकरी आणि शेतमजूर महिला किंवा ग्रामीण महिला म्हणून चळवळीने फार जोर धरला नाही. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने मोठी शेतकरी चळवळ उभी केली, परंतु खास शेतकरी महिलांची चळवळ महाराष्ट्रात उभी राहिलेली दिसत नाही. याचा प्रतिवाद असा केला जातो, की अनेक चळवळींमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग होता आणि असतो. महिलांनी आंदोलन उभे केले. या ठिकाणी आपण हे लक्षात घेतले पाहिजे, की ज्याप्रमाणे शेतकरी चळवळ म्हटले, की समग्र शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न ऐरणीवर येत असतील असे मानणे चुकीचे ठरते. कारण शेतकऱ्यांचे केवळ कोरडवाहू आणि बागायती असे वर्गीकरण करून विचार केला असता प्रश्नांचे स्वरूप अगदी वेगळे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण होत आहे म्हणून शेतकरी तितुका एक असे मानणे चुकीचे ठरते. त्याचा मोठा फटका पाण्यासारख्या संसाधनाने वंचित असणाऱ्या शेतकऱ्यांना बसलेला दिसतो. अगदी त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचे हित जोपासणे म्हणजे आपोआपच महिला शेतकऱ्यांचे हित त्यात सामावलेले आहेच असे मानणे किंवा शेतकरी आंदोलनामध्ये महिला सहभागी आहेत म्हणजे ते आंदोलन शेतकरी महिलांसाठीच उभे आहे, असा समज करून घेणे ही काही अंशी फसवणूक ठरते.

### शेतीची मालकी

शेतीचा शोध महिलांनी लावला अशी जगभरातील तज्ज्ञांची मान्यता आहे. शेतीचा शोध लागला आणि त्यातून जमिनीची मालकी प्रस्थापित झाली, पुढे त्यामुळे लग्न ही व्यवस्था आकाराला आली. हा सर्व इतिहास समजून घेतला, की आपल्याला एक गोष्ट प्रकषनि लक्षात येते ती म्हणजे जमिनीवरची मालकी प्रस्थापित होण्यासाठी महिलांना अजूनही वाट पाहावी लागत आहे. त्याचा एक साधा पुरवा म्हणजे महाराष्ट्रामध्ये खातेदार महिलांची संख्या आजही २० टक्यांपेक्षा कमी आहे. ज्या कुटुंबाची जमीन धारणा जास्त आहे त्या कुटुंबातील महिलांच्या नावे शेती आहे. हा परस्पर संबंध लक्षात घेतला, की जमिनीची मालकी हा विषय अजूनही दुर्लक्षित असा आहे. आणि राजकीय सामाजिक परिस्थितीमध्ये तो विषय ऐरणीवर घेणे कोणत्याही राजकीय पक्षाला शक्य असेल का?हा सुद्धा मोठा प्रश्नच आहे.

शेतकरी मेळावा, शेतकऱ्यांबरोबरील बैठका आणि गटचर्चा अशा कोणत्याही कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग नगण्य असतो. शेती शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्य यामध्ये मोक्याच्या ठिकाणी आजही महिला फार कमी आहेत. याचा अर्थ शेती व्यवस्थेमध्ये महिलांचे काही योगदान नाही किंवा काही भूमिका नाही, असा अजिबात नाही किंवा संबंधित सर्व, कोणीही अजिबात ते नाकारणार सुद्धा नाहीत. ज्याप्रमाणे गृहिणी म्हणून कुटुंबाच्या पालन पोषणामध्ये महिलेचे योगदान असते ते कोण नाकारत नाही आणि मान्यसुद्धा करत नाही (अगदी ती गृहिणी महिला सुद्धा म्हणते, की मी काही करत नाही, घरीच असते) अगदी त्याचप्रमाणे शेतकरी महिलांच्या बाबतीत सुद्धा होत असते/आहे.

### आधाराची गरज

शेतीमध्ये 'ती' आहे परंतु 'ती' कुठेच नाही, अशी अवस्था शेती क्षेत्रातील महिलांची आहे. धोरणकर्ते ते राज्यकर्ते असे मानून चालत आहेत, की 'लाडकी बहीण' म्हटले, की त्यात शेतकरी बहीणसुद्धा आलीच आणि महिला सर्व ठिकाणी आहेत म्हणजे सर्व महिलांचे सर्व प्रश्न मिटतीलच. या ठिकाणी खरा पेच आहे.तो समजून घेतल्याशिवाय सर्व बहिणी सारख्या की काही बहिणींना जास्त आधाराची गरज आहे हे लक्षात येणार नाही.समजून घेण्यास सोपे ठरावे म्हणून आपण एक उदाहरण घेऊयात. महाराष्ट्र राज्याने महिलांना एस.टी. प्रवासात पन्नास टक्के सवलत दिली आहे. त्या सवलतीचा फायदा सर्व महिलांना होतो अगदी प्राध्यापक ते गृहिणी! चांगले आहे हे! काही तक्रार नाही. परंतु आपण सकाळी ग्रामीण भागात प्रवास करत असू तर आपल्याला एक चित्र हमखास दिसते. सहा आसनी रिक्षात दहा शेतमजूर महिला प्रवास करत आहेत. सकाळी लवकर उठून घरातील जेवण तयार करण्यापासून सर्व कामे करून त्या आठ वाजता शेतकामासाठी निघाल्या आहेत. न्याहारी करण्यासाठी वेळ मिळाला नसल्याने दाटीवाटीच्या प्रवासात त्या न्याहारी उरकत आहेत. हे एक चित्र आपल्याला वेगळा विचार झाला पाहिजे असे संबंधितांना बजावण्यासाठी किंवा केवळ लाडकी म्हटले, की झाले असे होत नाही, हे लक्षात येण्यासाठी पुरेसे आहे.

### महिलांचे योगदान

आज शेतीचे प्रश्न अतिशय क्लिष्ट बनले आहेत. त्या क्षेत्राची अतिशय नकारात्मक चर्चा सुरू असते. संधी मिळताच शेती सोडायची असते. दुसऱ्या बाजूला संख्या कमी आहे. परंतु शेतीमध्ये ठामपणे उभी असणारी आणि आपल्या संघर्षातून सर्वांगीण विकासाची वाट मोकळी करणारी अनेक कुटुंबे आजही संपूर्ण महाराष्ट्रात आढळतील. त्यामध्ये पुन्हा परस्पर संबंध असा, की जे कुटुंब शेतीमध्ये ठामपणे उभे आहे, त्या कुटुंबातील महिलांचे योगदान खूप मोठे आहे.

सरकारी आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ८४ लाख पशुपालक आहेत. दुग्ध व्यवसायामध्ये महिलांचे मोठे योगदान आहे. प्रांजळपणे अनेक शेतकरी कबूल करतात, की जनावरांचे काहीच काम महिलांनी नाही करायचे ठरविले, तर पुढच्याच आठवड्यात निम्मी जनावरे विक्रीला जातील. पहाटे चार ते रात्री १० अशी महिला राबत असते आणि विशेष म्हणजे घरच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत. हे सत्य आहे. हे प्रमाण मानून आपल्या धोरणकर्त्यांनी कोणत्या योजना तयार केल्या का?

### एकात्मिक शेतीमध्ये योगदान

हवामान बदल हे मोठे संकट आहे. त्याचा मोठा फटका शेती व्यवस्थेला बसला आहे. तज्ज्ञ असे मानतात, की जोखीम कमी करणारी पीक पद्धतीची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात त्यासाठी मोठा प्रकल्प सुरू आहे. त्यावर ५ ते १० हजार कोटी खर्च होत आहेत, परंतु अशी शेती पद्धती आपल्याकडे पूर्वीपासून सुरू आहे. त्याला आधुनिक शेती विज्ञानात एकात्मिक शेती पद्धती म्हटले जाते. ज्यात उत्पन्नासाठी चार दोन शेळ्या, एखादी गाय-म्हैस, दहा पंधरा कोंबड्या, दहा पाच गुंठे भाजीपाला, पाच दहा आंबा-चिंचसारखी झाडे आहेत. अशा सर्व घटकांतून उत्पादन-उत्पन्न मिळविले जाते. जोखीम कमी करणारी ही व्यवस्था असणारी कुटुंबे फार कमी वेळा कर्जबाजारी होतात आणि अशी कुटुंबे जवळपास सर्व गावात असतात. दोन-तीन पिढ्यांपासून त्यांची अशीच शेती पद्धती सुरू असते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्वाच्या केंद्र स्थानी योगदान असते ते त्या घरातील महिलांचे! आणि विशेष म्हणजे हे सर्वांना मान्य आहे. परंतु त्याची दखल घेऊन अशा पद्धतीने काम करणाऱ्या महिलांच्यासाठी म्हणून काही विशेष धोरण योजना आपल्याकडे आहे असे अजिबात नाही किंवा हवामान बदल या संकटात अशी कुटुंबे कशा पद्धतीने ठाम उभी असतात, असा अभ्याससुद्धा आपल्याकडे केला जात नाही.

पती निधन किंवा कोणत्याही कारणाने शेतीचे सर्व निर्णय घेण्याची जबाबदारी त्या घरातील महिलेवर आल्यानंतर त्या महिलेची शेती पद्धती अभ्यासण्यासारखी असते. ती जमीन विकत नाही, ती कर्जबाजारी होत नाही, ती शेती सोडून शहरात जात नाही किंवा उत्पन्न चांगले मिळाले, की ती धाब्यावर जात नाही की गाडी घेत नाही किंवा निवडणुकीत खर्चही करत नाही. याचा एक अर्थ असा हमखास घेता येतो तो म्हणजे शेतीच्या अनुषंगाने निर्णय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महिलांचे शेती पद्धतीचे मॉडेल हे वेगळे ठरते. बऱ्याच वेळा ते किफायतशीर सुद्धा ठरत असेल,

### शेतमजुरांचे प्रश्न

ज्याप्रमाणे शेतकरी महिला दुर्लक्षित आहेत, त्याचप्रमाणे शेतमजूर महिला सुद्धा तितक्याच दुर्लक्षित. शेती घरी आहे म्हणून आपण शेतकरी महिला म्हणतो. खऱ्या अर्थाने त्यासुद्धा घरच्या शेतीतील शेतमजूर महिलाच आहेत, ज्यांना पगार दिला जात नाही. म्हणजे मालकीही नाही आणि वेतनही नाही, काम मात्र किमान १४ तास. उदाहरण म्हणून आपण टोमॅटो पिकाचे घेतले तर रोपवाटिकेपासून ते काढणीपर्यंत एक एकर क्षेत्रावर किमान १२० महिला मजूर दिवस काम करतात. सर्व कामे मोठ्या कष्टाची! टोमॅटोचे भाव पडल्याची चर्चा होते लाल चिखल म्हणून, परंतु किती महिलांचे कष्ट वाया गेले अशी चर्चा होत नाही, उलट मजुरीवरील खर्च मोठा झाला, अशी तक्रार ऐकू येते. आयुष्यातील ३० वर्षे मजुरी केली, कमरेत वाकून काम केले, गुडघ्यावर पाठीवर ताण येईल अशी कामे केल्यामुळे वृद्धापकाळी खूप त्रास होतो. ही मजूर महिला जास्त लाडकी असली पाहिजे, असा विचार आपल्याकडे होतो का?

महाराष्ट्र राज्याने शिक्षण, रोजगार, शेती विकास अशा क्षेत्रात देशाला दिशा देणारे काम केले आहे. हे सर्व इतिहास ठरावा, अशी आजची परिस्थिती. तरीसुद्धा महाराष्ट्राने शेती क्षेत्रातील महिलांसाठी म्हणून विशेष महिला धोरण तयार केले पाहिजे. ही आशा कायम ठेवूयात आणि त्या दिवसाची वाट पाहूयात!

**डॉ. सतीश कारंडे**
मो.८८०५२९२०१०

## गुजरातमध्ये भाजपाचा झंझावात

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदानापूर्वीच गुजरातमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी भारतीय जनता पक्षाला ऐतिहासिक यश दिले आहे. या निवडणुकीत भाजपाने दणदणीत विजय मिळवला असून काँग्रेस आणि आम आदमी पक्षाला (आप) मोठा धक्का बसला आहे. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही स्तरांवरील निवडणुकांमध्ये भाजपाने जोरदार मुसंडी मारली आहे.राज्यातील सर्व १५ महानगरपालिकांवर कमळ फुलले असून, विरोधकांना मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे. विशेषतः अहमदाबाद महानगरपालिकेत भाजपाने १९२ पैकी १५८ जागा जिंकून या सर्वात मोठ्या शहरावरील आपले वर्चस्व अधिक मजबूत केले आहे. हा विजय शहरी मतदारांनी सत्ताधारी पक्षाला दिलेला निर्णायक जनादेश मानला जात आहे. सुरत महानगरपालिकेतही भाजपाने १२७ पैकी ११५ जागा जिंकून विक्रमी कामगिरी केली आहे. गेल्या निवडणुकीत प्रभावी ठरलेल्या आम आदमी पक्षाला केवळ चार जागांवर समाधान मानावे लागले, तर काँग्रेसने पाच वर्षांनंतर एका जागेसह आपले खाते उघडले आहे.

आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना गेल्या निवडणुकीत सुरतमध्ये जे यश मिळाले होते, ते या निवडणुकीत ओसरल्याचे दिसत असून त्यांना एका आकड्यावरच समाधान मानावे लागले. दुसरीकडे काँग्रेसची स्थिती तर दिवसेंदिवस खालावत चालली आहे.आज काँग्रेससह सर्वच विरोधी पक्ष विकासात्मक राजकारण सोडून केवळ नकारात्मक राजकारण करताना दिसत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर सातत्याने निराधार टीका करणे किंवा बेछूट आरोप करणे, एवढ्यापुरताच विरोधकांचा अजेंडा मर्यादित राहिला आहे. देशातील सुज्ञ नागरिकांनी विरोधी पक्षांची ही नकारात्मकता वारंवार नाकारली आहे; मात्र विरोधी पक्ष यातून कोणताही धडा घेण्यास तयार नाहीत. याच कारणामुळे त्यांना सातत्याने पराभवाचा सामना करावा लागत आहे, असे या निकालांवरून स्पष्ट होत आहे.

**अविनाश देशपांडे**

## धरणातील गाळ काढणे आवश्यक

पिंपरी - चिंचवड येथील पवना धरणासंबंधी बातमी वाचली. या धरणातून ८५ हजार क्युबिक मीटर गाळ नुकताच काढण्यात आला. विशेष म्हणजे शासनाचा कोणताही निधी न घेता केवळ लोकसहभागातून गाळ काढला जात आहे या गाळ काढण्याच्या प्रक्रियेमुळे धरणातील पाणी साठविण्याची क्षमता वाढली आहे. गेल्या नऊ वर्षात ८५ हजार क्युबिक मीटर गाळ काढला आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागले नाही. पावसाळा सुरु होईपर्यंत गाळ काढण्याचे काम चालू राहणार आहे. महाराष्ट्रात सुद्धा अनेक धरणे आहेत. अनेक धरणे गाळानी भरलेली आहेत. त्यामुळे त्यांची पाणीपुरवठा क्षमता कमी कमी होत चालली आहे. सध्या महाराष्ट्राला पाण्याची टंचाई आहे. शिवाय यंदा अल निनोचे सावट असल्याने पाऊस उशिरा किंवा कमी अपेक्षित आहे. अशा वेळी पाण्याची साठवण क्षमता महत्वाची ठरेल. शासनाने अशा सर्व धरणातील गाळ काढण्याचे नियोजन त्वरित करणे आवश्यक आहे हा गाळ शेतकऱ्यांना द्यावा म्हणजे त्यांच्या जमिनी सुद्धा सुधारतील.

**शांताराम वाघ**

## विदर्भ एक्सप्रेस कामठीवरून वळवावी

१२१०५/१२१०६ गोंदिया मुंबई गोंदिया विदर्भ एक्सप्रेस २ मे २०२६ पासून गोंदिया स्टेशनऐवजी अजनी स्टेशनवरून सुटेल. नागपूर स्टेशनवर प्लॅटफॉर्मची दुरुस्ती सुरू आहे, त्यामुळे विदर्भ एक्सप्रेस एक महिन्यासाठी अजनी स्टेशनवरून सुटेल. आम्ही रेल्वे विभागाला विनंती करतो की, विदर्भ एक्सप्रेस गोंदिया स्टेशनवरून सुटावी आणि नागपूरला थांबू नये. त्याऐवजी, ती थेट कामठी स्टेशनवरून अजनी स्टेशनकडे वळवण्यात यावी.रेल्वे विभाग याकडे लक्ष देईल.

**राजेश पी. कारिया**

## शॉर्टकट जीवनाला आळा बसणार?

आजच्या झगमगाटाच्या दुनियेत प्रत्येक व्यक्तीला चैनविलासी, आरामदायी, कमी श्रमात आणि कमी वेळेत अधिक नफा मिळावा म्हणून अनेक बड्या हस्थी देखिल फसव्या योजनेत गुंतवणूक करुन आयुष्य बरबाद केल्याच्या ताज्या घटना आहेत. सुशिक्षित लोक जर फसत असतील तर अशिक्षितांचे काय? कोणत्याही गोष्टींचा सारासार विचार न करता आपण कष्टाने मिळवलेली पुंजी यामध्ये लावायची आणि शेवटी व्याजासाठी मुद्दलेला मुखायचे सद्याचे युग हे स्पर्धात्मक आणि चंगळवादी आहे. त्यामुळे अनेकजण शॉर्टकट जिवन जगण्यात धन्यता मानत आहेत. त्यामुळे आशा घटना वाढत असल्याचे दिसून येते.अनेक मोठ्या कंपन्यांचे न्यायालयीन खटले प्रलंबित आहेत मात्र याचे प्रमुख उजळ माथ्याने समाजामध्ये वावरत आहेत. यांच्या मुसक्या वेळीच आवळल्या पाहिजेत तसेच जनतेनेही विवेकबुद्धीने अभ्यास करुन योग्य माहिती घेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे नाहीतर व्याजासाठी मुद्दलेला मुखला अशी अवस्था व्हायला नको.

राजू जाधव

## उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !

मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स मागतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येतो.काही थंड पेयांमधील रसायनांच्या अतिवापरामुळे मुलांच्या हाडांतील खनिजांचे प्रमाण कमी होऊन हाडे कमकुवत होतात.त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत,लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे.

**मोक्षदा घाणेकर**

# रामदासांबाबत अक्कलेचे तारे तोडू नका..



**स**मर्थ रामदासांची बदनामी होण्यात वैदिक मंडळी जास्त कारणीभूत आहेत. त्यांच्या नसत्या उद्योगांमुळे रामदासांचे सत्य स्वरूप झाकोळले जाऊन ते वादांस व निंदेस कारणीभूत झाले आहेत.

उदा. आपण शिवाजी महाराजांचे गुरु आहोत याबाबत ते स्वत: लेखक-कवी असतांनाही अवाक्षर काढलेले नाही. समर्थांची मुख्य रचना असलेल्या दासबोधात शिवाजी महाराजांचे एकदाही नाव येत नाही.

उलट त्यांच्या एका प्रसिद्ध पत्रात (ते नेमके कधीचे याबाबत वाद असले तरी) 'तुमच्या देशी वास्तव्य केले पण वर्तमान नाही घेतले, क्षमा केली पाहिजे' असे स्पष्ट विधान असूनही रामदासांना गुरु ठरवण्याचा अनैतिहासिक प्रयत्न केला गेला.

स्वत: रामदास यांनी शिवाजी महाराज आपले शिष्य आहेत असे कोठेही उल्लेखले नसता आणि शिवाजी महाराजांच्या तथाकथित पत्रात गोसावी असे संदिग्ध उल्लेख असताना ही अश्लाघ्य सुरुवात कोठून झाली हे पाहिले पाहिजे.

ही सुरुवात केली ती रामदासांनी नाही तर त्यांच्या शिष्यांनी. समर्थप्रताप हा ग्रंथ समर्थांचे पट्टशिष्य गिरधरस्वामी यांनी लिहिला आहे. यात शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या भेटीचे आणि त्यांच्यातील आध्यात्मिक संबंधांचे सविस्तर वर्णन येते.

पण हे वर्णन कल्पोपकल्पित आहे हे वाचतानाच लक्षात येते. पण रामदासी वाङ्मयात (आणि संप्रदायात) हा ग्रंथ शिव-समर्थ भेटीचा एक महत्त्वाचा आधार मानला जातो.

पण हा ग्रंथ शिवाजी महाराज आणि रामदासांच्या मृत्युनंतर लिहिला गेलेला आहे. हा ग्रंथ रामदासी पंथाची प्रतिष्ठा वाढावी यासाठी लिहिला गेलेला आहे. हा ग्रंथ रामदासांनी समाधी घेतल्यावर (१६८१ नंतर) सुमारे अर्धशतकाने, म्हणजेच १७ व्या शतकाच्या अखेरीस किंवा १८ व्या शतकाच्या सुरुवातीला (अंदाजे १६८१ ते १७३० च्या दरम्यान) हा ग्रंथ लिहिला, असे मानले जाते.

आत्माराम यांनी लिहिलेल्या दासविश्रामधाम या ग्रंथातही रामदासांच्या कथित चमत्कारकथा आणि त्यांचे शिवाजी महाराजांशी असलेले संबंध याबाबत दंतकथांनी ओतप्रोत असे लेखन आलेले आहे.

हनुमंतस्वामी यांनी लिहिलेल्या 'रामदासी बखर''किंवा समर्थांची बखरमध्ये शिवाजी महाराज आणि रामदास स्वामींच्या भेटीचे अनेक चमत्कारिक आणि श्रद्धापूर्ण प्रसंग वर्णिलेले आहेत. विशेषतः 'चाफळची सनद'आणि सज्जनगड येथील वास्तव्याबाबतच्या कथा यात सापडतात.

पण चाफळची सनद शंकास्पद आहे असे अनेक इतिहासकारांचे म्हणणे आहे. ज्येष्ठ इतिहासकार गजानन भास्कर मेहेंदळे यांनीही यावर आक्षेप घेतले आहेत. त्यांचे मुख्य मुद्दे असे की शिवकालीन पत्रांमध्ये तारीख आणि वार सुरुवातीला असतो, मात्र या पत्रात तो शेवटी आहे तसेच पत्रातील काही शब्दांची रचना शिवाजी महाराजांच्या इतर अस्सल पत्रांतील शैलीशी मिळतीजुळती नाही. शिवाय पत्रावरील मोर्तब (शिक्का) अस्सल मोर्तबाशी पूर्णपणे जुळत नाही, असा अनेक इतिहासकारांकडून दावा केला जातो.

रामदासांनी स्वत: कोठेही आपण शिवाजी महाराजांचे गुरु आहोत असे विधान केलेले नाही. त्यांच्या समर्थ पंचायतनातील शिष्यांनी मात्र रामदासी मठ सुखरूप चालू राहावेत या हेतूने रामदास-शिवाजी गुरु-शिष्यपणाच्या अनैतिहासिक कथांना जन्म दिला आणि त्याचा व्यापक प्रचार केला. आजच्या समाजावर या कथांचा प्रभाव आहे आणि त्यामागचे हेतू जगजाहीर आहेत.

पण यात या सा-या शिष्यांच्या आणि वैदिकतेचे पाईक असलेल्या लोकांनी हे गुरु-शिष्य संबंध दाखवण्याच्या नादात, शिवाजी महाराजांना गौण करण्याच्या नादात, समर्थ रामदासांना अकारण निंदेचे धनी बनवले. त्यामुळे त्यांचे वास्तव कर्तुत्व लोकांसमोर जाऊ शकले नाही.

खरे तर 'दासबोध' हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून तो एक 'प्रपंच आणि परमार्थ' यांचा मेळ घालणारा व्यावहारिक मार्गदर्शक ग्रंथ आहे. समर्थ रामदास स्वामींनी या ग्रंथात मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श केला आहे. अगदी शाई आणि लेखणी कशी बनवावी याचेही मार्गदर्शन त्यात आहे.'आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थविवेका' असा त्यांचा संदेश आहे. ते सन्यासी असूनही असा संदेश देतात याबाबतही त्यांच्यावर टीका होते पण विष घेऊ नये हे उपदेश विष न घेतलेलेच देऊ शकतात हे केवळ निंदा करण्याच्या नादात टीकाकार समजावून घेत नाहीत.रामदास हे शिवकालीन मराठीतले आद्य निसर्गकवी आहेत हे त्यांची

**'गिरीचे मस्तकी गंगा ।**
**तेथुनि चालली बळे ।**
**धबाबा लोटती धारा ।**
**धबाबा तोय आदळे ।। १ ।।**
**गर्जता मेघ तो सिंधू । ध्वनी कल्लोळ उठिला ।**
**कड्याशी आदळे धारा ।**
**वात आवर्त होतसे ।। २ ।।**

ही कविता वाचली तरी लक्षात येईल पण हे क्रेडीट रामदासांना द्यायची बुद्धी 'शिवाजी महाराजांचे गुरु' ठरवण्यात मग्न वैदिकांना झाली नाही हे मराठीचे दुर्दैव होय.

दुसरे असे की रामदासांनी मुसलमानी अष्टकेही लिहिली.ही अष्टके त्यांच्या वाङ्मयातील एक महत्त्वाचे पण कमी परिचयाचे अंग आहे. शिवकालात जसा तुकाराम महाराजांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचा आवाज उठवला अगदी तसाच रामदासांनीही उठवला.

ते म्हणतात, दुन्या काहि धंदा सबों छोड देना। दुन्या दो दिनोंकि दुन्याहि न होना।अछि है राह पिर पैगोंबरोकि। कहे रामदासो ।।

अर्थ:-जगातील इतर सगळे कामं(इच्छा-आकांक्षा) सोडून, दोन दिवसांच्या(क्षणभंगुर) जगाची आशा सोडून, जीवनाच्या उद्धारासाठी पैगंबराच्या मार्गाने गेले पाहिजे, तोच मार्ग चांगला आहे..

आणि, घट घट साहि यारे आज्यब अल्लमियाँ रे। ये हिदु मुसलमान दोन्हो चलावे।।

अर्थ:- मनुष्यप्राण्याच्या आत अल्लामियाँ च राहतो, अल्ला च हिंदू आणि मुसलमान दोघांनाही चालवतो (पोसतो)

दखनी हिंदीत केलेल्या रचना भारतातील धार्मिक एकात्मतेचा संदेश देणार्या त्यांच्या या रचनांकडे अक्षम्य दुर्लक्ष केले गेले. हे दुर्लक्ष रामदासांना काहीही करून शिवाजी महाराजांचे गुरु ठरवण्याच्या प्रयत्नांतून या भाकड वैदिकवाद्यांकडून झाले आणि खरे रामदास यात झाकोळले गेले, एवढेच नाही तर अकारण निंदेचे धनी ठरले.

मध्ययुगातील श्रेष्ठ निसर्गकवी, लौकिक जीवनाचे दर्शन घडवणारा महान विचारक, मानवतेतील एकता पाहणारा एक द्रष्टा आणि ज्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास व्हायला हवा असा चतुरस्त्र लेखक एका अट्टाहासापोटी निंदेचा धनी बनला हे मराठी भाषा आणि मराठी लोकांचे दुर्दैव आहे. हा स्वत: रामदासांवरील अन्याय आहे. आणि तो केलाय त्यांच्याच शिष्यांनी आणि काहीही झाले तरी आम्हीच श्रेष्ठ असा उन्माद करणाऱ्या वैदिकांनी.

आजकाल रामदासी बैठका होतात असे कानावर आहे. यातूनही रामदासांचा अपमानच केला जातो आहे असे दिसते. रामदासांच्या नावावर काहीहे खपवायचे उद्योग आता तरी थांबले पाहिजेत आणि त्यांची नव्याने तटस्थ चिकित्सा गेली पाहिजे.

बागेश्वरबाबासारखे भोंदू लोक रामदासांवर बोलायचीही लायकी नसताना अक्कलेचे तारे तोडतात तेव्हा शरमेने मान खाली झुकते. रामदासांना शिवाजी महाराजांचे गुरु मानावे याला कसलाही आधार नाही.आपल्या काळातील हिंदू-मुस्लीम या सत्पुरुषांना छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक देणग्या दिल्यात तशा रामदासांनाही दिल्या असतील.

या सर्व शक्यता लक्षात घेऊनही शिवाजी महाराजांचे कर्तुत्व एका गोसाव्यामुळे (मी हा शब्द शिवाजी महाराजांच्या रामदासांन्रा लिहिलेल्या कथित पत्रात गोसावी हा शब्दच आलेला असल्याने करत आहे.) घडले असे मानण्यास कोणताही सबळ आधार नाही. उलट रामदासांचे खरे कर्तुत्व आणि महत्व समजून घेण्यासाठी ज्या अंगाने अभ्यास व्हायला हवा तो मात्र केला गेला नाही हा रामदासावरील अन्यायच नव्हे काय?

**-संजय सोनवणी**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले.



तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली.त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला.परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

## जगद्गुरु राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.....

**म**हाराष्ट्रात संताची फार मोठी परंपरा आहे.या संतांनी, सुधारकांनी भारतीय संस्कृतीला वैभव, आगळे-वेगळे रुप व स्थान प्राप्त करुन दिले. १९ व्या शतकात जन्माला आलेले अलौकिक व्यक्तीमत्वाचे एक संत व समाज सुधारक म्हणजे तुकडोजी महाराज हे होतं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणजे, वैश्विक मानवतेची आणि राष्ट्रीय उत्थानाची सतेच भावना हृदयात सदैव धारण केलेले महामानव होय.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जीवनगाथा ही समरांगनावर तेजहीन झालेल्या योद्धांना पुन्हा तेजवंत करायला सहाय्यक ठरेल अशी क्षात्रप्रेरणेची तथा जनतेला ब्रह्मानिष्ठ मानवतेच्या जाणिवांचा निर्मळ जीवनबोध देणारी वीरगाथा आहे. हिमालयाच्या उंचीलाही लाजवेल अशी समग्र जीवनाची तत्वनिष्ठ, देशनिष्ठ आणि मानवतानिष्ठ पैलुंची उंची त्यांच्या जीवनाला लाभलेली आहे.'माझ्या प्रिय भारताला का हो धरला अबोला? स्फुर्ती द्या तरुणांशी ऐसी ! उद्धरु मायभु कैसी ! जातो धर्म लयाला'; अशा गितातून जनजागृतीबरोबर राष्ट्रधर्म जागविण्याचे काम त्यांनी केले.याच काळातच गांधीजी आणि राष्ट्रसंताची वर्ध्याला भेट झाली, एक महिना राष्ट्रसंत गांधीजीजवळ राहीले. तिथुन परत आल्यानंतर खादी वापरायला त्यांनी सुरुवात केली. स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वसमाज, स्वावलंबन, स्वातंत्र्य याचे शिक्षण ते भाविकांना देत होते. त्यांच्या खंजिरी भजनांनी अनेक जण स्वातंत्र्याचे पाईक झाले.

'हे सारे गावचे धन!असो काया, वाचा, बुद्धी प्राण ।। ऐसे असे जयाचे धोरण । तो नास्तिकही प्रिय आम्हा ।। तो तत्वत: नास्तिकही नो हे । जो सर्वांसी सुखविताहे ।। तो देव देव जरी न गाये ! तरी देवसेवाची त्या घडे'; असे प्रखर विचार तुकडोजी महाराजांनी ईश्वरासंबंधी मांडले असुन एकुणच त्यांचे तत्वज्ञान नास्तिकतेमध्ये नक्कीच गणले जाणार नाही. त्यांना ईश्वरसत्ता मान्य असली, तरीही देवभोळेपणा, अंधश्रद्धा यांच्या ते तीव्र विरोधात होते. 'तुकड्या म्हणे', 'तुकड्या कहे' अशी त्यांनी मराठी आणि हिंदी भाषांमध्ये स्व-साहित्य निर्मीती केली. त्यांचे ग्रामगीता, अनुभवसागर भजनावली, सेवास्वधर्म, राष्ट्रीय भजनावली, लहरकी बरखा इत्यादी साहीत्य समाजहितासाठी सदैव महत्त्वाचे आहे.

**डॉ. विजय बाबर, वर्धा**
मो. ९४२३११८८०६

# रिती होत चालली मने आणि माणसे!

**आ**जकाल आपले जीवन धर्माधिष्टीत,नीती मूल्याधिष्टित राहिले नाही त्यामुळे आता कोणाच्याच जवळ नैतिक बळ राहिलेले दिसत नाही.त्यामुळे सर्वांचेच जीवन अस्थिर,अविवेकी आणि स्व अर्थी झाले आहे.रोज सकाळी नवा प्रश्न घेऊन तांबड फुटते.दिवसभर त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी धडपड सुरु असते.दिवसभरात तो प्रश्न सुटतो न सुटतो तोच रात्री नवा प्रश्न आऽ वासून तयार असतो.प्रश्नांची सोडवणूक करतांना आयुष्य केंव्हा निघून जाते हे आपले आपल्यालाच कळतही नाही.

आयुष्याच्या अडचणी सोडविण्याच्या नादात स्वतःकडे लक्ष द्यायलाही वेळ मिळत नाही आपल्याला.बी.ए.हूये, नोकर बने,पेन्शन ली और मर गये!हेच आपले जीवन झाले.काव्य,शास्त्र,विनोद, विरंगुळा या बाबींना स्थानच नाही.भजन,पूजन,संगीत,साधना यांचा तर दूर दूर संबंध नाही आपला.एखादे गणेश किंवा दुर्गामंडळ,सामाजिक संस्था, संघटना यात सहभाग घ्यायचा नाही,फार नाही पण एखाददुसरा मित्रही नसतो इतके आपण एकाकी झालो.समाजातील प्रत्येक बाबींत 'मला काय त्याचे?'किंवा 'माझा काय फायदा?' 'माझा काय संबंध?' हीच भूमिका आपली.सतत 'मी आणि माझे' हा विचार पोखरून टाकतो आपल्याला.

आपल्यातील बहुतेकांना मरणाची भीती ( fear of death ) वाटते.कसे होईल? आणि काय होईल?या कायम निवासी भितीमुळे सर्वांनाच रक्तदाब किंवा मधुमेह आहेच.जरासे संकट किंवा अडचण आली की शरीर घामघाम,चित्त अस्थिर,मन विचलित,पोटात गोळा आणि हातपायात थरथरी.अगतिक होतो आपण त्यामुळे चिडचिड होऊन घरातील वातावरण खराब होते.

नेहमीच नाही पण कधी कधी नाईलाजाने पोलीस स्टेशन,न्यायालय यांना सामोरे जावेही लागते माणसाला. किती घाबरतो आपण पोलिसांना सामोरे जायला.स्वतःचे नुकसान झाले तरी चालेल,आपला गुन्हा नसेल तरी अन्याय निमुटपणे सहन करतो आपण पण नको झंजट! याबाबी देखिल अंगवळणी पडल्या आहेत. हे केवळ व्यक्तिगत विचार करण्याचे लक्षण आहे.

यंदा कोण निवडून आले पाहिजे? किंवा कोण निवडून येईल? असा प्रश्न जर कोणी पत्रकाराने सहज रस्त्यावर विचारला तर या साध्या आणि सोप्या प्रश्नाचे उत्तर द्यायला घाबरतात माणसे.रस्त्यात अपघातात तडफडणाऱ्या माणसाला पुढील ताप नको म्हणून मरू देणारेच अधिक आहेत. त्याला कारणही असते म्हणा! त्यांच्या स्वतःच्याच छोट्या छोट्या प्रश्नांनी ते इतके हैराण होतात की इतर प्रश्न त्यांना पर्वताएव्हढे वाटतात.

कुणाच्या मयताला, बारसे तेरशाला, लग्न समारंभालाही न जाणारी संवेदनाशून्य माणसे भरपूर आहेत. मुकी होत आहेत माणसे.जराही मनाविरुद्ध झाले की आक्रस्ताळेपणा आणि मनाप्रमाणे झाले की हुरळून जाणे दोन्हीही घातक आहे.मनाचे हे संतुलन सांभाळता न येणाराचे हे प्रमाण वाढते आहे.सतत विचारात राहणे हा ही रोगच म्हणावा लागेल.

खरे सांगू!सततचे विचार एकट्यात गर्दी करतात आणि गर्दीत एकटे पाडतात. अशी माणसे दिसतात आपल्याला नेहमी की जे आपल्याच तालात असतात.म्हणजे ना संसार निटनेटका ना परमार्थ विवेक!फक्त ऐहिक सुखाच्या मृगजळामागे धावता धावता देह रिता होतोय आपला.देव,देश,धर्म यासाठी माणसे बोथट होत चालली.

'हम दो हमारे दो' म्हणजे आम्ही दोघे आणि आमची दोघे या व्यतिरिक्त इतरांना स्थानच नाही जीवनात. मायबाप,स्नेहिजन आपोआप गेलेत घराबाहेर हा एकाकी राहण्याचा विचार जीवनाचा भाग बनला. आयुष्यात एकदाही रक्तदान न केलेली माणसेच आहेत सर्वत्र जीवन म्हटले की चढउतार येणारच.संकटांना सामोरे जायचे असेल तर मन,मस्तिष्क आणि मनगट मजबूत हवे.त्यासाठी स्वतः व्यायाम,ध्यान,प्राणायाम करणे अत्यावश्यक आहे.स्वतःचा विचार झाल्यावर काही सामाजिक कार्यात सहभाग,मित्रमंडळी असणे आवश्यक आहे. गप्पाटप्पा मुळे मन मोकळे होते,मेंदू ताजा होतो आणि शरिरातील उर्जा वाढते.

दररोज काही मिनिटे आपल्या इष्टदेवतेसमोर बसा,एखादा मंत्र,स्तोत्र नित्यनेमाने म्हणा.तुळशीला पाणी,गाईला नैवेद्य,कुत्र्याला भाकरी एखादे वेळेस करुन तर पहा.मंदिरात किंवा बाजारहाट साठी सपत्नीक जाऊन तर पहा मग ऐश्वर्याचा विवेक,आहेत त्यात समाधानी वृत्ती,आंथरून पाहून पाय पसरणे, इतरांची सुखे पाहुन अस्वस्थ न होणे शक्य होईल.असे केल्याने व्यष्टी चा समष्टी होतो. अहं चा वयं होतो. मनाचा विकास होतो,हृदय विस्तारित होते. बुद्धी ,शक्ती आणि पराक्रम वाढीस लागतो.कुठलेही संकट येवू द्या हिमतीने सामोरे जाण्याचे कौशल्य येते.

शरीर सशक्त तर मन सशक्त. मन सशक्त तर जीवन सशक्त.

जीवनाचे हे युध्द आपल्याला लढावेच लागेल.

**तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चयः !**

विद्यावाचस्पती
**प्रा.दिलीप जोशी,**
वाशिम. मो.९८२२२६२७३५

# १४ गावांत कृत्रिम पाणी टंचाई; उष्णतेच्या लाटेत नागरिक हैराण

## पाइपलाइन गळती, छेडछाड आणि अनियमित पुरवठ्यामुळे समस्या तीव्र

**वर्धा/जनमाध्यम**



जिल्ह्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर वर्धा परिसरातील १४ गावांमध्ये कृत्रिम पाणी टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. आधीच उष्णतेच्या तीव्रतेने नागरिक त्रस्त असताना, पाणी पुरवठ्यातील अनियमितता आणि पाइपलाइन गळतीमुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाविषयी नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पिपरी (मेघे), कारला, सिंदी (मेघे), बोरगाव (मेघे), उमरी (मेघे), साटोडा, आलोडी, दत्तपूर, वायगाव निपाणी, नालवाडी, वरूड, म्हसाळा आणि सालोड हिरापूर या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाणी पुरवठा विस्कळीत आहे. खोदकामा दरम्यान मुख्य जलवाहिनी तुटल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला असून, अनेक ठिकाणी नळ कोरडे पडले आहेत.जिल्ह्याचे तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअस दरम्यान नोंदविले जात असून, या कडाक्याच्या उन्हात पाणीटंचाईमुळे नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे. महिलांना व लहान मुलांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असून, दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत सुमारे २० हजार नळजोडण्या असूनही, तांत्रिक अडचणींमुळे पुरवठा सुरळीत होत नसल्याचे दिसून येते. पाइपलाइन गळती, देखभालीचा अभाव आणि रोटेशनमधील अनियमितता ही या समस्येची प्रमुख कारणे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### एअर वॉल्व्हमध्ये छेडछाड; प्रशासनासमोर नवे आव्हान

मजिप्राच्या सूत्रांनुसार, संबंधित योजनेतील पाइपलाइनवर सुमारे १७ एअर वॉल्व्ह आहेत. काही ठिकाणी अज्ञातांकडून या वॉल्व्हमध्ये छेडछाड करून आतील रबर काढून टाकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पाणी पुरवठा विस्कळीत होतो. या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था उभारणे कठीण असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.आर्वी मार्गावरील प्रिया पॅलेस परिसरात झालेली पाइपलाइन गळती दुरुस्त करण्यात आली असून, सध्या रोटेशननुसार पाणी पुरवठा सुरू असल्याची माहिती उपअभियंता दीपक धोटे यांनी दिली. पुढील दोन दिवसांत सर्व गावांमध्ये नियमित पाणी पुरवठा सुरळीत होईल, असा दावा त्यांनी केला. स्थिती सुधारण्याची अपेक्षा-उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तात्पुरत्या उपाययोजनांपेक्षा कायमस्वरूपी नियोजनावर भर देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### नागरिकांच्या प्रतिक्रिया

वारंवार उद्भवणाऱ्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई असह्य ठरते.

**निरज खराबे,** साटोडा

दोन दिवसाआड पाणी पुरवठ्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र ते पाळले जात नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

**आशिष बकाने,** पिपरी (मेघे)

नियमित पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. गळती आणि अनियमिततेवर तातडीने तोडगा काढावा.

**विपीन कठाणे, नालवाडी**

# महागाईमुळे घरकुलांचे स्वप्न अधांतरी

**वडनेर/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील गोरगरीब कुटुंबांसाठी हक्काचे घर उभारण्याचे स्वप्न दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. बांधकाम साहित्याच्या वाढत्या दरामुळे शासनाच्या विविध घरकुल योजनांअंतर्गत मिळणारे अनुदान अपुरे पडत असून अनेक लाभार्थ्यांची घरे अर्धवट अवस्थेत थांबलेली दिसून येत आहेत. परिणामी, घरकुल अनुदानात वाढ करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी व इंदिरा आवास योजना अशा विविध योजनांद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घरबांधणीसाठी मदत केली जाते. प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत सुमारे दोन लाखांचे अनुदान दिले जाते. यामध्ये काही रक्कम थेट खात्यात, तर काही निधी रोजगार हमी योजनेंतर्गत उपलब्ध करून दिला जातो. रमाई योजनेतही दीड लाख रुपयांपर्यंत अनुदान

### अनुदान वाढीची मागणी तीव्र

मिळते. मात्र, सध्याच्या महागाईच्या पार्श्वभूमीवर ही रक्कम अपुरी ठरत असल्याचे वास्तव समोर आले आहे.बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. विटांचे दर हजारामागे ७ ते ८ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. लोखंडाचे दर ५८०० ते ६००० रुपये प्रतिटनाच्या आसपास आहेत. वाळूचे दर ४ ते ५ हजार रुपये ग्रास इतके वाढले असून सिमेंटच्या पोत्याची किंमत साडेतीनशे रुपयांवर गेली आहे. याशिवाय मजुरीचे दरही वाढले आहेत. त्यामुळे एकूण खर्च दुपटीहून अधिक वाढल्याने सर्वसामान्यांना घरबांधणी करणे कठीण झाले आहे.तालुक्यात वाळू लिलाव रखडल्यामुळे अधिकृतरीत्या वाळू उपलब्ध होत नसल्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेकांना तस्करांकडून जास्त दराने वाळू खरेदी करावी लागत आहे. मुरुमसारख्या इतर साहित्यांच्याही उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. परिणामी, बांधकाम खर्च वाढून घरकुलांचे काम मंदावले आहे.ग्रामीण भागात अनेक कुटुंबांची जुनी घरे जीर्ण अवस्थेत असून ती कधीही कोसळण्याच्या स्थितीत आहेत. अशा परिस्थितीत शासनाच्या योजनांमुळे नवीन घर उभारण्याची आशा निर्माण झाली असली, तरी वाढत्या महागाईमुळे ही आशा धूसर होत आहे. अनेकांनी घरबांधणीचे काम अर्धवट सोडल्याचे चित्र सध्या दिसत आहे. या पार्श्वभूमीवर घरकुल अनुदानात वाढ करण्याबरोबरच बांधकाम साहित्य स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील घरकुल योजनेचा उद्देश साध्य करण्यासाठी ही गरज अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### विनयभंग करून महिलेला जीवे मारण्याची धमकी

**वर्धा -** शहरातील रामनगर जैन मंदिर परिसरात एका महिलेचा विनयभंग करून तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रितीक पाल (रा. कंजर मोहल्ला), लालू सोनी (रा. भामटीपुरा) व तुषार यादव उर्फ चुचू (रा. भामटीपुरा) अशी आरोपींची नावे आहेत. तक्रारीनुसार, संबंधितांनी पीडित महिलेच्या पतीने घेतलेल्या एमडी व व्याजाच्या पैशाची मागणी केली. पैशांच्या वादातून वाद वाढत गेला. दरम्यान, आरोपींनी महिलेचा विनयभंग करत अश्लील शिवीगाळ केली व तिला जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तक्रारीच्या आधारे गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### अमली पदार्थ सेवन करताना दोघांना अटक

**आर्वी-** शहरातील गोकुलधाम ले-आऊट परिसरात अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या दोघांना पोलिसांनी कारवाई करून अटक केली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार घटनास्थळी धाव घेतली असता तुषार तळवेकर (वय २०, रा. शिवाजी वॉर्ड) व मोहम्मद जमशेद मोहम्मद आहाद (वय २०, रा. नेताजी वॉर्ड) हे चिलमद्वारे गांजा सेवन करताना आढळले. पोलिसांनी तत्काळ दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. संबंधितांविरुद्ध आर्वी पोलिस ठाण्यात अमली पदार्थ कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युवकांमध्ये वाढत्या व्यसनाधीनतेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अशा कारवायांना वेग दिला असून नागरिकांनीही संशयास्पद हालचालींबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### टाकी पडून महिलेचा मृत्य

**वर्धा -** महाकाळ परिसरात घरावरील पाण्याच्या टाकीची पाहणी करताना पाय घसरून पडल्याने ६२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. वनिता किनकर असे मृत महिलेचे नाव आहे. त्या टाकीत पाणी येत आहे का हे पाहण्यासाठी घरावर चढल्या होत्या. दरम्यान, त्यांचा तोल जाऊन त्या खाली कोसळल्या. घटनेनंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. सावंगी पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून अपघाती मृत्यू म्हणून प्रकरणाचा तपास सुरू आहे. नागरिकांनी अशा कामांवेळी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# परदेशात शिक्षणाकरीता शिष्यवृत्तीसाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळालेल्या महाराष्ट्रातील अनुसुचित जाती, नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १५ मे पर्यंत ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेचा लाभ घेऊ इच्छुणारा विद्यार्थी अनुसुचित जाती, नवबौध्द घटकातील महाराष्ट्रातील रहिवासी असावा. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्ष व पीएचडीसाठी ४० वर्ष कमाल वयोमर्यादा असेल. विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ४० लाखापेक्षा जास्त नसावे. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतिक क्रमवारीत २०० च्या आत असावी. तथापी २०० मधील साऊथ वेल्स व आस्ट्रेलिया हे विद्यापिठ योजनेतून वगळण्यात आले आहे. डीजी लॉकरद्वारे कुटूंबातील व्यक्तीची आधारकार्ड व पॅनकार्ड तपासणीसाठी सहमती आवश्यक आहे.परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीपासून लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी, अभ्यासक्रमासाठी नजीकच्या मार्गानी इकॉनॉमी क्लास परतीच्या प्रवासासह विमान प्रवास भाडे, निवार्ह भत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा यावरील विद्यार्थ्याने प्रत्यक्ष केलेला खर्च विहित केलेल्या वित्तीय मर्यादेत अदा करण्यात येईल. सर्वसाधारण पदव्युत्तर पदवीसाठी २ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल त्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती देय राहील.विद्यार्थ्यांस वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी युएसडी १५४०० तर युकेसाठी जीबीपी ९९०० इतक्या रक्कमेच्या मर्यादेत निवार्ह भत्ता विद्यार्थ्यांच्या परदेशातील वैयक्तिक बँक खात्यात जमा केला जाईल. विद्यार्थ्याला आवश्यक ती क्रमीक पुस्तके, वह्या व स्टेशनरी, प्रबंध अहवाल तयार करणे, टायपिंग व बायडिंग, स्थानिक भेटी व इतर अभ्यास सहली प्रवास खर्च, प्रबंधनासाठी आवश्यक खर्च, इतर प्रासंगिक खर्च इत्यादी करीता युएसए व इतर देशासाठी १५०० युएस डॉलर आणि युकेसाठी ११०० जीबीपी आकस्मिक खर्च म्हणुन प्रत्येक वर्षी देण्यात येतील.

योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी १५ मे सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावे. त्याची प्रत समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड पुणे येथे सादर करावी. अर्जाचा नमुना व अधिक माहिती www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे, असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

# हूक टाकून वीज चोरी; गुन्हा दाखल

**वर्धा-** महादेवपुरा परिसरात लघुदाब विद्युत वाहिनीवर थेट हूक टाकून वीज चोरी केल्याप्रकरणी राजेश परतेकी यांच्यावर शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणाच्या शहर उपविभागांतर्गत तपास पथकाने शोधमोहीम राबविताना हा प्रकार उघडकीस आणला. संबंधित घरात अधिकृत वीजजोडणी नसल्याचे आढळले. मात्र, घराबाहेरील लाईनवरून थेट वीज घेत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी संबंधितावर वीज चोरीचा ठपका ठेवत १३ हजार ६७० रुपयांची रक्कम व २ हजारांचा दंड आकारण्यात आला होता. मात्र, संबंधिताने ही रक्कम न भरल्याने अखेर महावितरणने फौजदारी कारवाईचा मार्ग अवलंबला. शहर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला असून अशा प्रकारांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

### तरुणाची आत्महत्या

वर्धा - करंजी भोगे येथे एका २८ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आकाश नेहारे असे मृताचे नाव आहे. घरात कोणीही नसताना त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून विविध अंगांनी तपास सुरू आहे.

## पुस्तकांच्या सहवासात बालमनांची उधळण

# जागतिक पुस्तक दिनी वाचक मेळावा रंगला

**वर्धा/जनमाध्यम**




मोबाईलच्या पडद्यापलीकडील जग पुन्हा एकदा पुस्तकांच्या पानांतून उलगडत असल्याचे हृद्य चित्र वर्ध्यात पाहायला मिळाले. जागतिक पुस्तक दिनानिमित्त आयोजित बालवाचक मेळावा विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात जल्लोषात संपन्न झाला. दररोज किमान पाच पाने वाचणार या निर्धाराने बालकांनी वाचनाची गोड शपथ घेत वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाचे उद्घाटन उत्कृष्ट कुमार वाचक शौर्य बावनकर यांच्या हस्ते झाले, तर सानवी डोंगरे हिने अध्यक्षस्थान भूषवले. भारताचे संविधान व 'ग्रामगीता' या ग्रंथांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. साने गुरुजींचे खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे हे गीत बालवाचकांनी एकसुरात सादर करत वातावरणात संस्कारांची उब पसरवली.

प्रास्ताविकात प्रा. सचिन सावरकर यांनी पुस्तक दोस्ती मनामनात, वाचन संस्कृती घराघरात हा मंत्र देत वाचनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहन केले. कथाकथन, परिसंवाद व काव्यवाचन अशा विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला व अभिव्यक्तीला वाव दिला. पालकांनीही अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत मुलांना वाचनाकडे वळविण्याचे महत्त्व मांडले.या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले. वाचनसंस्कृतीच्या पुनर्जागरणाची आशादायी चाहूल या उपक्रमातून उमटली.

# चारधामात संतवाणीचा मंगल नाद

## मयूर महाराजांच्या सन्मानाने भक्तिमय क्षण उजळले

**वर्धा/जनमाध्यम**



हिमालयाच्या कुशीत सुरू असलेल्या पवित्र चारधाम यात्रेदरम्यान संतवाणीचा पवित्र नाद घुमला आणि भक्तिभावाने वातावरण भारावून गेले. हभप मयूर महाराज दरणे यांचा चारधाम यात्रा समितीचे उपाध्यक्ष श्री राणा यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्याने उपस्थित भाविकांच्या मनात अध्यात्मिक ऊर्जेचा नवा दीप प्रज्वलित झाला.

या प्रसंगी महाराजांनी सामाजिक व राष्ट्रीय विषयांवर प्रभावी मार्गदर्शन करत बरकोट येथील जनतेशी थेट संवाद साधला. त्यांच्या ओजस्वी वाणीने समाजातील ऐक्य, संस्कार व राष्ट्रप्रेमाचा संदेश दिला. धर्म म्हणजे केवळ विधी नव्हे, तर समाजघडणीची शक्ती आहे, असा आशय त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला.कार्यक्रमाला तुळजाई सामाजिक संघटना, रामनगर (वर्धा) चे अध्यक्ष सुरेश दातिर यांच्यासह रविंद्र टप्पे, हेमंत नरहशेट्टीवार, खुशाल गुंडतवार, अखिलेश गव्हाने, अनिल कापसे, अनिल लाबांडे, अनिल गावंडे, अमित मुनोत, निखिल चितोडे, प्रमोद गुंडतवार आदी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.भक्ती, संस्कार आणि समाजजागृतीचा संगम घडवणारा हा सोहळा उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहील, असा ठसा उमटवून गेला.

# पशुसंवर्धन विषयक सेवा व मार्गदर्शनासाठी १९६२ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित

**वर्षभरात ४,०९,९९२ कॉल्स, ३.७८ लाख तक्रारींचे नावरण**
**दुर्गम भागातील ३४९७९ पशुपालकांना लाभ**
**गोल्डन अवर मधून ६४७५९ पशुधनाला जीवदान**

**वर्धा/जनमाध्यम**

पशुपालकांना पशुसंवर्धन विषय सेवा व मार्गदर्शन मिळावे यासाठी पशुसंवर्धन विभागाच्यावतीने पशुपालकांसाठी १९६२ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. या हेल्पलाईन क्रमांकाचा लाभ पशुपालकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अद्ययावत तंत्रज्ञानआणि १९६२ मोबाईल वेटरनरी क्लीनीक यांच्या समन्वयामुळे पशुपालकांना मोठा आधार मिळाला आहे.

या सुविधेमुळे केवळ उपचारांमधील वेळच वाचला नाही, तर दुर्गत भागातील हजारो पशुधनास वेळेत गोल्डन अवर, मध्ये उपचार मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. तसेच पशुपालकांना आपल्या दारापर्यंत पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्या आहेत, जे ग्रामीण समृध्दीसाठी अंत्यंत महत्वाचे पाउल ठरले आहे. पुर्वी किरकोळ आजारासाठीही पशुधनाला दवाखान्यात नेणे जिकिरीचे व महागडे ठरत असे, परंतु आता तज्ञ पशुवैद्यक स्वतः शेतक-यांच्या बाधांवर पोहचत आहेत. यामुळे केवळ आजार बरे होत नाही, तर वेळेवर मिळालेल्या मार्गदर्शनामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेही सुलभ झाले आहे. परिणामी, दुगधव्यसाय केवळ उपजीविकेचे साधन न राहता एक शाश्वत व फायदेशीर व्यवसाय म्हणून आकारास येत आहे. शेतक-यांमधून या सेवाबाबत समाधानाची प्रतीक्रीया व्यक्त होत आहे. तरी पशुपालकांनी १९६२ कॉल सेंटरच्या माध्यमातुन पशुसंवर्धन विषयक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे, असे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्त यांनी कळविले आहे.

## पुस्तकाबाहेरचा इतिहास शोधा!

# स्थळभेटी व संशोधनातूनच खरी नवनिर्मिती-डॉ.नरेश खोडे

**वर्धा/जनमाध्यम**



इतिहासाचा अभ्यास केवळ पुस्तकांच्या पानांत अडकवून न ठेवता किल्ले, स्मारके, प्राचीन मंदिरे आणि पर्यटनस्थळांना प्रत्यक्ष भेट देत सखोल संशोधन केल्यासच इतिहासाची खरी नवनिर्मिती घडू शकते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक डॉ. नरेश खोडे यांनी केले. इतिहास विभागात आयोजित निरोप समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रवींद्र बेले होते, तर व्यासपीठावर डॉ. नरेश कवाडे आणि सावरी गिरडकर उपस्थित होते.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, कॅमेरे आणि इंटरनेटमुळे माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी प्रत्यक्ष स्थळभेटीचा अनुभव वेगळाच असतो. किल्ल्यांची रचना, मंदिरांची स्थापत्यशैली, स्मारकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि त्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक जीवन हे प्रत्यक्ष पाहणीमुळे अधिक प्रभावीपणे समजते, असे खोडे यांनी स्पष्ट केले. पर्यटनस्थळांकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने न पाहता अभ्यासपूर्ण दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.स्थानिक परंपरा, लोककथा, जुने दस्तऐवज आणि उपलब्ध पुरावे यांचा अभ्यास केल्यास इतिहासातील अनेक अज्ञात पैलू उलगडतात. विद्यार्थ्यांनी संशोधक वृत्ती जोपासल्यास नवीन संशोधनाला चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. रवींद्र बेले यांनी इतिहास विभागाच्या संशोधन उपक्रमांचे कौतुक करत, ऐतिहासिक स्थळांवरील संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा वाढते आणि वारसा जतन करण्याची जाणीव दृढ होते, असे सांगितले.

कार्यक्रमात डॉ. नरेश कवाडे यांनी प्रास्ताविकातून अतिथींचा परिचय करून दिला. यावेळी इतिहास विभागातर्फे डॉ. नरेश खोडे आणि डॉ. रवींद्र बेले यांचा सन्मान करण्यात आला. सावरी गिरडकर यांनी विभागाची परंपरा आणि स्वतःचे अनुभव मांडले, तर रोहिणी पेटकर, संस्कृती टिपले आणि विशाल डाखोळे यांनी मनोगत व्यक्त केले.प्रा. चंद्रकांत राडे, डॉ. संजीवनी पाटील, प्रा. सुवर्णा कांबळे, प्रा. ज्योत्सना कोडापे, प्रा. योगिता मानमोडे आणि प्रा. रूपल अंबाडकर यांचा विद्यार्थ्यांनी भेटवस्तू देऊन गौरव केला. एम.ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांनी एम.ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांना स्नेहपूर्वक निरोप दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणाली डफडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रणाली सव्वालाखे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनश्री पाटील, श्रद्धा मडावी, अनिकेत कळणे आणि स्वराज भगत यांनी विशेष परिश्रम घेतले. इतिहास मंडळाचे पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एप्रिल ते जुन महिन्याचे शिधावाटप परिमान जाहिर

**वर्धा/जनमाध्यम**

माहे एप्रिल ते जुन महिन्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमितचे अंत्योदय अन्न योजनेंतर्गत तसेच प्राधान्य कुटूंब योजनेंतर्गत अन्नधान्याचे एकत्रित तीन महिन्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. त्यानुसार एप्रिल ते जुन या तीन महिन्याकरीता शिधावाटप परिमान जाहिर करण्यात आले आहे.नियमित प्राधान्य गट योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती ३ किलो गहू व २ किलो तांदूळ, नियमित अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका धारकांना प्रति शिधापत्रिका २२ किलो गहू व १३ किलो तांदुळ मोफत दिले जाणार आहे. साखर फक्त अंत्योदय योजना प्रति शिधापत्रिका १ किलो प्रमाणे किंवा साठा उपलब्धतेनुसार २० रुपये दराने वाटप करण्यात येईल, असे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कळविले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १५३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मेळघाटमध्ये पाणीटंचाईची दाहकता
# हातपंप जीर्ण, विहिरींची दुरुस्ती आवश्यक
## -कामीदा येथे युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी दिली भेट

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** मेळघाटच्या दुर्गम भागातील पाणीटंचाईने यंदा उग्र रूप धारण केले असून, भूगर्भातील पाणी पातळी खालावल्याने चिखलदरा तालुक्यातील कामीदा सारख्या अनेक गावांत हातपंप कोरडे पडले आहेत. या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्हा युवा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी मेळघाटच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करून बोअरवेल खोदकामाचे नियम शिथिल करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. सध्या अस्तित्वात असलेली २०० फुटांची मर्यादा वाढवून ती किमान ४०० ते ५०० फूट करण्यात यावी, तरच आदिवासी बांधवांची तहान भागवणे शक्य होईल, असा




इशारा युवा काँग्रेसच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला आहे.

आज कामीदा (ता.चिखलदरा) येथे राहुल येवले यांनी भेट दिली असता हातपम्प मध्ये पाण्याची पातळी खोल गेल्यामुळे हाथपंपाला पाणी येत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे येथे पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याची माहीती आदिवासी बाँधवानी दिली. 'मेळघाटमध्ये मोठ्या प्रमाणावर सध्या पाणीटंचाई सुरू असून प्रशासनाच्या नियमानुसार प्रत्येक बोरवेल आणि हातपंपाची जीर्ण अवस्था असलेल्या विहिरीची दुरुस्ती करण्यात यावी. संबंधित प्रशासनाने चिखलदारा तालुक्यातील परिस्थितीनुसार यावर त्वरित कार्यवाही करावी.'

### बोअरवेलच्या खोलीची अट शिथिल करा-

शासकीय नियमांनुसार मेळघाटमध्ये बोरवेल आणि हातपंपांची खोली २०० फुटापर्यंत मर्यादित ठेवण्याचा नियम आहे. परंतु, मेळघाटच्या दुर्गम डोंगराळ भागातील भौगोलिक परिस्थिती आणि वाढती पाणीटंचाई लक्षात घेता, हा नियम शिथिल करण्यात यावा. नवीन बोरवेलसाठी किमान ४०० ते ५०० फुटांपर्यंत खोली वाढवून मिळावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी शासनाकडे केली आहे.' धारणी आणि चिखलदारा तालुक्यातील दुर्गम भागात सध्या पाणीटंचाईच्या निवारणासाठी जी कामे सुरू आहेत, ती अत्यंत दर्जेदार असावीत आणि त्यांचे योग्य नियोजन करण्यात यावे. कामात पारदर्शकता आणि गुणवत्ता राखून प्रशासनाने ही टंचाई दूर करावी, अशी मागणी अमरावती जिल्हा युवा काँग्रेसच्याच्या वतीने करण्यात आली आहे.'

# तृष्णेपासून मुक्तीसाठी अष्टांगिक मार्गाचा अवलंब कराः भदन्त ग्यानरक्षित महाथेरो
## -पंचशीलनगरात बौद्ध धम्म परिषद

**अमरावती/प्रतिनिधीः-** मानवी जीवनातील दुःखाचे प्रमुख कारण तृष्णा म्हणजेच अतोनात इच्छा, आसक्ती आणि लोभ आहे. मनुष्य जितका इच्छांच्या मागे धावतो, तितकाच तो दुःखाच्या गर्तेत अडकत जातो, काम तृष्णा, भव तृष्णा आणि विभव तृष्णा असे तीन प्रकार आहेत. इंद्रियसुखांची लालसा, सतत काहीतरी मिळवण्याची धडपड आणि नको असलेल्या गोष्टींचा तिरस्कार या सर्व गोष्टी मनात अस्थिरता निर्माण करून दुःख वाढवतात, त्यामुळे तृष्णेपासून मुक्त होण्यासाठी अष्टांगिक मार्गाचा अवलंब करावा असे आवाहन भदन्त ग्यानरक्षित महाथेरो यांनी केले.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व तथागत गौतम बुद्ध जयंतीच्या निमित्ताने महाबोधी महिला बहुउद्देशीय संस्था व महाबोधी बुद्ध विहार, पंचशिल नगर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.२७) रोजी पंचशिल नगर येथील महात्मा फुले सभागृहाजवळील प्रांगणात एक दिवसीय बौद्ध धम्म परिषद हजारो बौद्ध उपासक उपासकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडली. धम्म



परिषदेच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद येथील भदन्त ग्यानरक्षित महाथेरो ऑनलाइन उपस्थित होते.तर अखिल भारतीय भिक्खू संघाचे मार्गदर्शक भदन्त बुद्धघोष महाथेरो यांनी उद्घाटन केले. प्रमुख अतिथी म्हणून भदन्त निर्मलपुत्त आनंद महाथेरो, भदन्त चंद्रमणी थेरो, भदन्त सुभद्र थेरो, भदन्त आर्य सारीपुत्त थेरो, आर्याजी प्रजापती, आर्याजी धम्मदिपा महाथेरी, आर्याजी धम्मचारिणी महाथेरी, आर्याजी कुंडलकेशा सामनेरी, आर्याजी संघशिला सामनेरी, भिक्खु सिलवंसलंकारा यांच्यासह भिक्खू संघ धम्मपिठावर उपस्थित होता. विशेष अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार, नगरसेवक मंगेश मनोहरे उपस्थित होते.

भदन्त ग्यानरक्षित महाथेरो आपल्या धम्मदेशने पुढे म्हणाले की, उपासक-उपासिकांनी सम्यक दृष्टि, सम्यक विचार, सम्यक आचरण आणि सम्यक स्मृती यांचा अंगीकार केल्यास जीवनात शांती आणि समाधान प्राप्त होते. दुःखाचे मूळ कारण तृष्णा असल्याचे प्रतिपादन ग्यानरक्षित महाथेरो यांनी आपल्या धम्म धम्मदेशनेतून सांगितले.

धम्म परिषदेचे प्रास्ताविक संचालन पत्रकार नयन मोंढे यांनी तर आभार संस्थेचे अध्यक्ष संजीवनी मनोहरे यांनी मानले.

# महाराष्ट्र राज्य ५१ वी सबज्युनियर बास्केटबॉल निवड चाचणी आज

**अमरावती/प्रतिनिधीः-** सातारा येथे दि. ०३ ते ०८ मे २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनच्या वतीने ५१ वि सबजूनियर मुले व मुली अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. सचिव गोविंद मुथूकुमार महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना यांच्या मार्गदर्शनानुसार अंतिम निवड चाचणी दिनांक ३० एप्रिल २०२६ ला आयोजित करण्यात आली आहे.



सदर स्पर्धेसाठी अमरावती जिल्हा बास्केटबॉल असोशियन व अमरावती जिल्हा हौशी बास्केटबॉल संघटने तर्फे निवड चाचणी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या बास्केटबॉल कोर्ट वर आयोजित करण्यात आल्या आहे . ज्या खेळाडूंचा जन्म ०१/०१ / २०१३ नंतर झालेला आहे अशा सर्व मुलं व मुलींनी या निवड चाचणी मध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा व येताना सोबत जन्मतारखेचा दाखला व आधार कार्ड घेऊन यावे असे आवाहन खेळाडूंना केले. खेळाडूंनी सदर निवड चाचणी ला दिनांक ३० एप्रिल २०२६ ला दुपारी ६ वाजता हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या बास्केटबॉल कोर्ट ला हजर राहावे,असे आवाहन करण्यता आले.

# दिव्यांगांना तालुकास्तरावरच मिळणार दिव्यांग प्रमाणपत्र

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील दिव्यांगांच्या सोयीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता दिव्यांगांना प्रमाणपत्रासाठी जिल्हा मुख्यालयात येण्याची गरज भासणार नाही. ही सुविधा लवकरच तालुकास्तरावर उपलब्ध करून दिली जाणार आहे.

उपजिल्हा रुग्णालय अचलपूर, धारणी, मोर्शी, दर्यापूर आणि ग्रामीण रुग्णालय चांदूर बाजार, तिवसा येथे कायमस्वरूपी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव 'आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे' यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

या प्रस्तावाला मंजुरी मिळताच संबंधित केंद्रांना 'युडीआयडी' पोर्टलचे लॉगिन आयडी व पासवर्ड दिले जातील. त्यानंतर तालुकास्तरावरच प्रमाणपत्र वाटप सुरू होईल.

जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत सन २०२२ ते २०२५ या कालावधीत आयोजित शिबिरांद्वारे एकूण २ हजार ४७३ दिव्यांग प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील दिव्यांगांना अमरावती शहरात येण्या-जाण्याचा होणारा त्रास आणि खर्च वाचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.


## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/८००७३४२३३५

## Walk in Interview

**Shri Shivaji Education Society, Amrvati's Kasturba English School & Junior College, to Shyam Nagar,Amravati**

Interested and only eligible candidate may walk in interview on 3 rd May 2026 at 10.00 am for the follwoing post

| Sr. no. | Name of the post | Name of the post | Minimum Required Qulification |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary Teacher | 06 | Montessori trained and experienced candidate will be preferred |
| 2 | 1) M.sc (Maths)<br>2) M.sc (Science)<br>3) M.A.(English)<br>4) M.A.(Marathi)<br>5) M.A.(Social Science)<br>6) M.A.(Economics)<br>7) M.Com<br>8)Sanskrit/Hindi | 05<br>05<br>04<br>04<br>05<br>01<br>01<br>04 | D.Ed./B.Ed./M.Ed will be preferred. |
| 3 | Computer Teacher | 02 | PG/Graduate in Computer Science, M.C.A.,B.E.Computer /I.T. |
| 4 | Music Teacher | 02 | Music Diploma/M.A.Music |
| 5 | physcial Teacher | 02 | Graduate/B.ped/M.Ped |
| 6 | Art/Drawing Teacher | 02 | ATD/BFA/MFA |
| 7 | Clerk | 03 | B.com,M,com MSCIT/Tally |

Note-1) Candidate may apply for the above post in prescribed form in their own hand writting & testimonials.2)Preferece will be given to the experienced candidates with their professional qualification.3) Fluency in English is Compulsory.

President,
School Committee
Kasturba English School &
Jr.College, Amravati

Principal
Kasturba English School &
Jr.College, Amravati

Secretry,
Shri Shivaji Education Society,
Amravati


**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.५७८/२०२६
**श्रीमती विमलबाई अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२४.०४.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. विमलबाई गोपाळराव शेंबे, वय ८० वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.कंपासपुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
२. वंदना रवी धांडे, वय ५२ वर्षे, व्यवसाय - शेती रा.वार्ड नं.५, पथ्रोट ता.जि.अमरावती
३. प्रदीप गोपाळराव शेंबे, वय ५१ वर्षे, व्यवसाय - रा.कंपासपुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
४. रंजना राजेंद्र खोकले, वय ५४ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.शासकीय वसाहत, व्हीटीसी, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती
५. संदीप गोपाळराव शेंबे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - रा.हनुमान मंदिराजवळ, जुनी वस्ती, कंपासपुरा, बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गोपाळराव महादेवराव शेंबे** यांचे दिनांक **२६.११.२००७** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार विमलबाई अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विमलबाई अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने **श्री.श्रीराम नानाजी इंगोले** रा.गणपती नगर, अमरावती यांच्याकडून त्यांच्या एकमेव मालकी व ताब्यातील निम्न वर्णनांकित मालमत्ता जी त्यांनी दि.१७.०८.१९९५ रोजी दस्त अ.क्र.२१८९, दु.नि.अमरावती शहर - २ येथे नोंदविलेल्या खरेदीखतान्वये मालकी हक्काने घेतली. तसेच चूक दुरुस्ती लेख दि.१३.०३.२०२५ रोजी दस्त अ.क्र.१४५७ दु.नि.अमरावती शहर २ नोंदविलेल्या प्रमाणे सदरहू मालमत्ता विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मालमत्तेचे वर्णन** - मौजे-जेवड, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे क्र.३७ मधील गणपती नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लेआऊटमधील प्लॉट नं.३६ चा उत्तर भाग याची साईज नकाशाप्रमाणे असून एकुण क्षेत्रफळ १९८७.५० चौ.फुट आहे. यापैकी उत्तर-दक्षिण वाटणीचा पुर्वेकडील भाग याचा प्लॉट नं.३६-अ असून याचे एकुण क्षेत्रफळ ८४५ चौ.फुट (७८.५३ चौ.मी.) आहे. यावर मंजूर बांधकाम ४४० चौ.फुट आहे. याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

पुर्वेस - प्लॉट नं.३७
पश्चिमेस - प्लॉट नं.३६-बी
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - याच प्लॉटचा उर्वरित भाग

वरील मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोझा, वारसा हक्क, ताबा, कर्ज, कचेरी वाद, भानगड, बक्षीस, जप्ती अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा हक्क किंवा अधिकार असल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी अथवा समक्ष भेटावे. तसे न केल्यास माझे पक्षकार ठरल्याप्रमाो खरेदीखत लेख करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही व कोणताही उजर चालणार नाही.

अमरावती
**दिनांक १८.०३.२०२५**

(ॲड.प्रद्युम्न प.भिरंगी)
हरिओम कॉलनी, साईनगर,
अमरावती
मो.९३२५२६२२१९

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१२७/२०२६ ने.ता.१७.०६.२०२६

**अर्जदार :**
१. राजेंद्र बापुराव मुंडवाईक, रा.फुबगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. नामदेव बापुराव मुंडवाईक, रा.जांब रोड, दांडेकर लेआऊट, वडगांव, ता.जि.यवतमाळ
३. छबुताई शंकर शिंगाने, रा.राजुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. मंदाबाई मधुकरराव अजमिरे, रा.कोठा फत्तेपूर, ता.जि.यवतमाळ
५. सुनंदा गोविंद गुल्हाने, रा.विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **जनाबाई बापुराव मुंडवाईक** यांचा मृत्यू दि.**०९.१०.२००५** रोजी विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले असुन अ.नं.३ ते ५ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**
सक्सेशन क्र.१७६/२०२६ ने.ता.०८.०५.२०२६

**अर्जदार :** १. स्वप्नील रमेशपंत साऊरकर, वय ४० वर्षे, धंदा - बिझनेस रा.हनुमान मंदिर, गांधी चौक,करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** The Regional Officers, Employee Provident Fund Organization Office at - 15B, Reghnas Archid, Civil Line, Akola-444001

**इंडियन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **रमेश जगन्नाथराव साऊरकर** यांचा मृत्यू दिनांक **१९.०२.२०२५** रोजी झाला. तसेच मृतकाची पत्नी **मीरा रमेश साऊरकर** हिचा दि.**१६.११.२०२१** रोजी रा.गरजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. **रमेश जगन्नाथराव साऊरकर** यांचे नांवे भारतीय स्टेट बँक शाखा अचलपूर येथे खाते नं.११३७३८२०५३० हे असून त्यामध्ये दि.२६.०२.२०२६ पर्यंत रुपये १,१८,३००/- (एकुण एक लाख अठरा हजार तीनशे रु.फक्त) इतकी रक्कम जमा आहे.

अर्जदारांना सदर रक्कम मिळण्याकरीता तसेच इतर कार्यालयीन कामाकरीता वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.(सक्सेशन) नं.१७६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६९२/२०२६
**श्री.ताहेर अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०६.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Taher Fakhrudin Ainawala, Age 57 Yrs. Occu.: Business R/o Talabpura, Nagpuri Gate, Amravati.
2. Shabana Shabbirhussain Amravatiwala, Age 63 Yrs. Occu.: Household R/o A-603, Pearl Building, Sanghvi Complex, Naya Nagar, Near Ganga Complex, Mira-Bhayander, Mira Road, Thane,(Maharashtra)
3. Fatema Shamsher Arielwala, Age 61 Yrs. Occu.: Household R/o 302, A & B, B-18, Fortune Heights CHSL Shanti Vidya Nagari, Near G.C.C.Club, Hatkesh, Mira-Bhayander Mira Road, Thane (Maharashtra)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **फखरुद्दीन ईनायत हुसेन आईनावाला** हे **दिनांक २५.०३.२०१५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे व मयत सकीना फखरुद्दीन आईनावाला ही दिनांक २९.०८.२०२४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **ताहेर अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ताहेर अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक / /**२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८१३/२०२६
**ज्योती -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Jyoti Omprakash Dara @ Jyoti Rajkumar Taneja Age 45 Yrs. Occu.: Household R/o Chatri Talao Road, Line 3, Near Shani Mandir, Dastur Nagar,Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramlal Kundanmal Dara हे **दिनांक १५.११.१९८७** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे व मयत Omprakash Ramlal Data ही दिनांक **३१.०१.२०११** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. व मयत Rajkumari Omprakash Data ही बऱ्याच वर्षापुर्वी अमरावती येथे मयत झाली. अर्जदार Jyoti Omprakash Dara @ Jyoti Rajkumar Taneja यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Jyoti Omprakash Dara @ Jyoti Rajkumar Taneja वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८१२/२०२६
**शालिनी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shalini Wd/o Wamanrao Khandekar, Age 76 Yrs. Occu.: Household R/o Behind Tapar Hostel, Narhari Nagar, Amravati.
2. Savita Rameshwar Londhe, Age 59 Yrs. Occu.: Household R/o Amravati Road Meher Nagar, Daryapur, Tq.Daryapur,Dist.Amt.
3. Yogita Ashok Katole, Age 50 Yrs. Occu.: Household R/o At Shivaji Nagar Banosa, Daryapur, Tq.Daryapur, Dist.Amravati.
4. Sangita Rajesh Karhe, Age 55 Yrs. Occu.: Household R/o 9-B, Ring Road, Brooke Bond Colony, Jalgaon,Tq.Dist.Jalgaon
5. Manjusha Rajesh Khandekar, Age 47 Yrs. Occu.: Household
6. Shantanu Rajesh Khandekar, Age 20 Yrs. Occu.: Student R/o Behind Tapar Hostel, Narhari Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वामनराव सदाशिवराव खांडेकर** हे **दिनांक १९.०८.२०२४** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **शालिनी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शालिनी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.१७५/२०२६ ने.ता.०८.०५.२०२६

**अर्जदार :**
१. मंगेश महादेवराव खडसे, वय ३२ धंदा - खाजगी नोकरी
२. शुभम महादेवराव खडसे, वय २८ धंदा - खाजगी नोकरी
३. अक्षय महादेवराव खडसे, वय ३१ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
४. महादेवराव फकीराजी खडसे, वय ६२ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
सर्व रा.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक मंगला महादेव खडसे** यांचा मृत्यू दिनांक **०५.०५.२०१३** रोजी चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१७५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**.डी.बी.गुल्हाने**
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७९२/२०२६
**श्री.संतोष अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१६.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Santosh Mahadeo Kalode, Age 43 Yrs. Occu.: Labour
2. Amol Mahadeorao Kalode, Age 36 Yrs. Occu.: Labour Both R/o Donad, Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रयाग महादेवराव काळोदे** हे दिनांक 02.02.2026 रोजी **दोनद, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संतोष अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संतोष अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७९७/२०२६
**श्रीमती आफरीन अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Aafreen Bano Shaikh Azharuddin, Age 31 Yrs. Occu.: Housewife
2. Areeba Tamkeen Shaikh Azharuddin, Age 09 Yrs. Occu.: Education
3. Filza Aayat Shaikh Azharuddin, Age 05 Yrs. Occu.: Education All R/o Kamunja, Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेख अजरुद्दीन शेख रज्जाक** हे **दिनांक १९.०६.२०२३** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **आफरीन अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आफरीन अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

संक्षिप्त



## यावली शहीदच्या स्मशान भूमीत निनादली ग्रामगीतेतील रामधून

**यावली शहीद**-येथे वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मस्थान स्मृती मंदिर आयोजित ग्राम जयंती महोत्सवात विविध सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक कार्यक्रम साजरे होत आहे.कार्यक्रम म्हणजे जन्मस्थान ते मोक्षधाम बाग रामधून कार्यक्रम वैशाख महिन्याच्या सुंदर पहाटे (ता.२८) जन्मस्थान ते स्मशानभूमी अशी जय गुरुदेव जयघोषाने रामधुन व स्मशानभूमी येथे सर्व धर्मपंथांच्या देवी-देवतांच्या मूर्तीचे पूजन तथा गत वर्षातील गतातम्यांना सामुदायिक श्रद्धांजली कार्यक्रम साजरा करण्यात आला. स्मशानभूमीतील या रामधून कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प. सुनील महाराज लांजुळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जन्मस्थान स्मृती मंदिर अध्यक्ष रामचंद्र कांडलकर, ह.भ.प.दिनकर चोरे, ग्रामसेवक ललित बैलमारे, यावली शहीद सरपंच शीला खवले,देवरा ग्रा.प.सरपंच गजानन देशमुख, सुधाकर पाचघरे,मुलचंद राठी, अरुण देशमुख, जितेंद्र यावलीकर, विनोद धर्माळे, बाबुराव धोटे सुधाकर कांडलकर, गोठेकर दादा आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल तडस यांनी केले. संचालन कल्याणी चांदूरे यांनी तर आभार जन्मस्थान स्मृती मंदिर सचिव सुनील देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला,जयकृष्ण धर्माळे, सचिन सोनोने,अतुल यावले,अरविंद देशमुख,अरुण तडस,काशिनाथ जवणे,गंगाधर श्रीखंडे, मनोज चौधरी, अनंत हागोने, किशोर पाचघरे,सह गुरुदेव सेवा मंडळाच्या तरुणाईचे मोलाचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने आभालवृद्ध,महिला,भक्तगण ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी मोक्षधाम बाग देखरेख समिती सदस्य आदी उपस्थित होते.



## रसायनशास्त्र विभागात केमिकल क्लबचा समारोप व विद्यार्थ्यांना निरोप

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात केमिकल क्लबचा समारोप व भाग-२ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्य.प. सदस्य डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, अधिसभा सदस्य डॉ. जागृती बारब्दे, डॉ. जयंत वडतकर, केमिकल क्लब समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, प्रा.ए.एस. वानखडे, प्रा. आर.डी. सातपुते उपस्थित होते. डॉ. सुजाता काळे मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी. तर अध्यक्षीय भाषणातून डॉ. संदीप वाघुळे यांनी परीक्षा, संशोधन, उद्योग क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धांची माहिती देत विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य व्यवस्थापन, शिस्त, प्रामाणिकपणा आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करीत आपल्या विद्यापीठाचा नावलौकीक करावा, असे आवाहन केले.स्पर्धेत विजेता ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विभागाचे नांव उज्ज्वल करणा-या विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविकातून डॉ. मनिषा कोडापे यांनी कार्यक्रमाविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन रेणुका काळे, तर आभार कोमल भालतडक हिने मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता श्रीराम सातव, कल्पना बैस, नरेंद्र व्यवहारे आदिंनी परिश्रम घेतले.

## सोमेश्वर महाराज वडतकर यांचे निधन



**कुऱ्हा**-श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील वयोवृद्ध जेष्ठ नागरिक तथा परिसरातील विधीवत पुजा करणारे सोमेश्वर महाराज वडतकर यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी दि. २८ एप्रिल ला २०२६ सकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, स्नुषा, नातू, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. सोमेश्वर महाराज यांच्या अंत्य विधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक गावकरी उपास्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# आज जिल्हा वकील संघाची निवडणूक

## उद्‌या मतमोजणी : उन्हाच्या तडाख्यातून बचावाकरिता मतदारांची विशेष सोय

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा वकील संघाची निवडणूक ३० एप्रिल रोजी होणार असून १५०० पेक्षा जास्त वकील आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना कडाक्याच्या उन्हापासून वाचवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या असून मतदानाची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी रामनाथ कलंत्री यांनी केले आहे. जिल्हा वकील संघाच्या कार्यकारिणी निवडणुकीसाठी न्यायालयाच्या तळघ-रातील वाहनतळावर १५ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. उन्हाचा प्रशासनाने कुलर आणि थंड ताकाची पारा चढल्याने वकिलांची गैरसोय होऊ नये म्हणून निवडणूक कटा सोय केली आहे. निवडणूक अधिकारी रामनाथ कलंत्री आणि या सहाय्यक निवडणूक अधिकारी शोएब खान यांनी या सर्व नियोजनाची जबाबदारी स्वीकारली. असून मदतीसाठी २५ तरुण वकिलांची नियुक्ती करण्यात आली की आहे. अध्यक्षपदासाठी प्रशांत बाकडे देशमुख, अनिल विश्वकर्मा आणि धनराज साधवानी यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. सचिवपदासाठी गिरीश धर्माळे आणि सचिन पांढरकर यांच्यात काट्याची टक्कर रंगणार आहे. उपाध्यक्षपदासाठी आर. एस. भोयर, नरेंद्र गजभिये, डॉ. धनंजय तोटे आणि नुरानी हे रिंगणात उतरले आहेत. महिला अध्यक्षपदासाठी भावना ठाकरे खांडरे, भूमिका वंजारे आणि प्राजक्ता रुडकर या नशिब अजमावत आहेत. कार्यकारिणी सदस्य पदासाठी ७ आणि महिला प्रतिनिधी पदासाठी ४ उमेदवार आपले नशिब आजमावत आहेत. मतदानानंतर मतपेट्या सीलबंद करून सुरक्षित ठेवल्या जातील आणि १ मे रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. सुरुवातीला कार्यकारिणी सदस्यांची मते मोजली जातील आणि त्यानंतर उपाध्यक्ष, सचिव आणि अध्यक्ष पदासाठीच्या मतांची मोजणी केली जाईल. निवडणूक अधिकारी रामनाथ कलंत्री यांनी सर्व २३ उमे-पार दवारांची बैठक घेऊन शांततापूर्ण वातावरणात निवडणूक पाडण्याचे आवाहन केले आहे.



### लोकशाहीचा नवा उत्सव

३० एप्रिलच्या निवडणुकीत उमेदवारांचे भवितव्य मतदारांच्या हाती असेल. कडक उन्हाच्या काळातही वकिलांचा मोठा सहभाग लोकशाही बळकट करणारा आहे. केवळ पद मिळवणे नव्हे, तर बार असोसिएशनच्या विकासासाठी प्रत्येक वकिलाचे मत महत्त्वाचे आहे. शांततापूर्ण आणि पारदर्शक निवडणु-कीतून सक्षम नेतृत्वाची निवड होईल, अशी आशा संपूर्ण वकील वर्गाकडून व्यक्त होत आहे.

## या.द.व. देशमुख महाविद्यालयात मूल्य संवर्धन शिबीर उत्साहात

**तिवसा/वार्ताहर**

या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा येथे 'व्यक्तिमत्व विकास व मूल्य संवर्धन शिबीर २०२६' चे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत रा. देशमुख यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये योगासन, व्यक्तिमत्व विकास, वक्तृत्व कौशल्य, खेळ, चित्रकला, गायन, व्यावसायिक कौशल्य, मराठी व इंग्रजी व्याकरण, इंडोअर गेम्स तसेच संवाद कौशल्य या विषयांचा समावेश आहे.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक प्रा. योगेश देशमुख यांनी केले. व्यक्तिमत्व हे केवळ बाह्य रूपावर आधारित नसून ते विचार, वागणूक आणि मूल्यांवर ठरत असते. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अशा मूल्यांचे संवर्धन घडवून आणले जाते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा उद्घाटक प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात बुद्धिमत्ता आणि ज्ञानाला योग्य संस्कारांची जोड मिळाल्याशिवाय व्यक्ती खऱ्या अर्थाने सुसंस्कारित व सुशिक्षित बनू शकत नाही. आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसून प्रामाणिकपणा, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे सांगितले.तसेच प्रा. डॉ. रवींद्र पाटील यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिका गौरी गणोरकर यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला प्राध्यापक डॉस्वाती वैद्य, प्रा. डॉ. भुईभार, प्रा.खुशबू कुथे, प्रा.पूजा भोयर, प्रा. राजकुमार तिडके, प्रा. भरत गोंजारे, प्रा. डॉ. साकेत देशमुख, प्रा.डॉ. सारिपुत्र भालेकर तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. दीप्ती गौरखेडे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन प्रा.वृषाली जगताप यांनी व्यक्त केले.

# चिखलदरा येथे १६ मे रोजी राष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धा

**अमरावती/क्रा.प्र.**

शारीरिक शिक्षण व योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालया तर्फे ओपन नॅशनल योगासन स्पर्धा २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १६ मे २०२६ रोजी चिखलदरा येथील योग केंद्र, अपर प्लॅटू येथे पार पडणार आहे.



ही स्पर्धा योगासना फिजिक फेडरेशन ऑफ इंडिया आणि बृहन्महाराष्ट्र योग परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने होत असून महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन व महाराष्ट्र क्रीडा परिषद यांची मान्यता लाभली आहे. देशभरातील नामांकित योगपटू या स्पर्धेत सहभागी होणार असून पारंपरिक योगासनांवर विशेष भर दिला जाणार आहे.स्पर्धेअंतर्गत प्रत्येक स्पर्धकाला ३ अनिवार्य आणि २ ऐच्छिक योगासने सादर करावी लागतील. अनिवार्य आसनांसाठी ४५ सेकंद तर ऐच्छिक आसनांसाठी ३० सेकंदांचा होल्डिंग कालावधी निश्चित करण्यात आला आहे. स्पर्धा पुरुष व महिला गटात विविध वयोगटांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये ८ ते १५, १५ ते २२, २२ ते ३०, ३० ते ४०, ४० ते ५५ आणि ५५ वर्षांवरील गटांचा समावेश आहे. स्पर्धेसाठी नोंदणी https://forms.gle/xib4qbi4H4rkUWbbA या लिंकद्वारे करावी लागणार असून नोंदणी शुल्क २०० ठेवण्यात आले आहे. नोंदणीची अंतिम तारीख ३० एप्रिल २०२६ असून वय निश्चितीची तारीखही ३० एप्रिल आहे. स्पर्धकांनी १६ मे रोजी सकाळी ९ वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धक व पालकांसाठी भोजन व निवासाची सुविधा शुल्कासह उपलब्ध करून दिली जाणार आहे. या स्पर्धेकरिता इच्छुक स्पर्धकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ व योग विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शाळा हस्तांतरण ठप्प

## अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन राज्यपाल यांच्या सन २००५ च्या आदेशानुसार महाराष्ट्रातील महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद आणि नव्यानेच निर्माण झालेल्या नगर पंचायत क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांसह मालमत्ता व अधिकारी-कर्मचारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करण्याचा अध्यादेश काढण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक ठिकाणी या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे वास्तव समोर येत आहे. कर्तव्यदक्षतेचा अभाव आणि प्रशासनातील उदासीनता यामुळे अनेक जिल्हा परिषदांनी आपल्या शाळांचे हस्तांतरण केलेले नाही. याहून गंभीर बाब





म्हणजे महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद आणि नगर पंचायत यांनीही या शाळा व मालमत्ता आपल्या ताब्यात घेण्यासाठी शासनाकडे कोणताही पाठपुरावा केलेला दिसत नाही. परिणामी, प्रशासनातील जबाबदारीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.दरम्यान, सन २०१० मध्ये उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका याचिकेवरील सुनावणीदरम्यान या शाळा व मालमत्ता हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले होते. तरीदेखील, स्थानिक स्वराज्य संस्थांनी याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही.१० एप्रिल २०१५ रोजी राज्यात काही नगर पंचायती अस्तित्वात आल्या. त्यानुसार संबंधित नगर पंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा व मालमत्ता हस्तांतरित करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित होते. मात्र, तब्बल १२ वर्षांचा कालावधी उलटूनही या संदर्भात कोणतीही हालचाल झालेली नाही, हे विशेष उल्लेखनीय आहे.

## 'मिशन लक्षवेध' अंतर्गत कुस्ती खेळाडूंची फेर निवड चाचणी

# इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज ३० एप्रिलपर्यंत सादर करावेत

**अमरावती/का.प्र.**

ऑलिम्पिक स्तरावरील क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'मिशन लक्षवेध' ही महत्त्वकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अमरावती जिल्हा स्तरावर 'क्रीडा प्रतिभा विकास केंद्र' स्थापन करण्यात आले असून, कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी २० खेळाडूंची निवड करण्यासाठी येत्या ६ मे २०२६ रोजी फेर निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या चाचणीत जिल्ह्यातील पात्र खेळाडूंना सुवर्णसंधी मिळणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिली आहे.

ही निवड चाचणी ६ मे रोजी सकाळी ८ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे पार पडणार आहे. या खेळाचे आयोजक राहुल निवडंगे (७७७४००१५७९) आहेत. यापूर्वी ९ एप्रिल रोजी चाचणी घेण्यात आली होती, मात्र आता पात्र खेळाडूंसाठी पुन्हा एकदा फेर चाचणीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी २१ वर्षांखालील (३१ डिसेंबर २०२६ रोजी वय ग्राह्य) मुले व मुली पात्र असून, खेळाडू महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. तसेच, संबंधित खेळाडूने गेल्या दोन वर्षांत राज्यस्तरावरील शालेय किंवा अधिकृत क्रीडा संघटनेच्या स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा किंवा पदक प्राप्त केलेले असावे. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आपला जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, अधिकृत डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र, आधारकार्ड, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, पालकांचे संमतीपत्र आणि पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या २० खेळाडूंना शासनाच्या वतीने प्रगत प्रशिक्षण दिले जाईल. ही प्रक्रिया अनिवासी स्वरूपाची असली तरी खेळाडूंचा पूरक आहार, गणवेश, क्रीडा साहित्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा प्रवास खर्च, वैद्यकीय उपचार आणि विम्याचा संपूर्ण खर्च मिशन लक्षवेध योजनेअंतर्गत केला जाणार आहे. इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज ३० एप्रिल २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या निवड चाचणीचे आयोजन क्रीडा कार्यकारी अधिकारी श्रीमती ममता कोळमकर (९८२३७०४३४७) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून, जिल्ह्यातील जास्तीत-जास्त कुस्तीगीरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्यापीठ व महाविद्यालय कर्मचाऱ्यांचा एल्गार!

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठीय व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती' ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. २७ एप्रिल २०२६ रोजी जळगाव येथे झालेल्या महत्त्वपूर्ण सभेत आंदोलनाची पुढील दिशा आणि धोरण निश्चित करण्यात आले असून, मागण्या मान्य न झाल्यास ४ जून २०२६ पासून राज्यभरातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या सभेच्या अध्यक्षस्थानी संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष अजय देशमुख होते. मंचावर प्रमुख उपस्थित म्हणून मिलिंद भोसले, रावसाहेब त्रिभुवन, दिनेश दखणे,संदीप हिवरकर,सतीश वाघमारे तसेच जळगाव विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे सचिवा अरूण सपकाळे उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष अजय देशमुख यांनी प्रलंबित बाबींसंदर्भात शासनस्तरावर सध्याच्या स्थिती सविस्तर विवेचन कर्मचाऱ्यांसमोर मांडले. सभेतील चर्चेनंतर, आंदोलनासंदर्भातील पुढील सर्व दिशा-निर्देश ठरविण्याचे पूर्ण अधिकार सयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना सोपवण्यात आले आहेत. या निर्णयामुळे आता राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.


## उष्णतेच्या लाटेपासून कामगारांच्या संरक्षणासाठी प्रशासनाचे निर्देश

# कामाच्या वेळेत बदल करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

सध्या देशासह राज्यात उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेच्या लाटेमुळे कामगार व मजूर वर्गाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः बांधकाम, औद्योगिक आणि खाण क्षेत्रातील कामगारांना उष्णतेमुळे आरोग्याच्या मोठ्या जोखमीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर कामगारांचे आरोग्य व सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अमरावतीचे सहायक कामगार आयुक्त अ.सु. पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नियोक्ते, उद्योग आणि बांधकाम कंपन्यांना तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार कामगारांच्या कामाच्या वेळेत आवश्यकतेनुसार बदल करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, दुपारच्या कडक उन्हाच्या काळात जड किंवा कठीण कामे टाळून ती दिवसाच्या थंड वेळेत नियोजित करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

कामाच्या ठिकाणी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची मुबलक उपलब्धता करून देणे तसेच कामगारांना सावली व विश्रांतीची सोय उपलब्ध करून देणे आता बंधनकारक असणार आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रत्येक आस्थापना स्तरावर आईस पॅक, प्राथमिक उपचार साहित्य आणि उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक साधने सज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आरोग्य विभागाशी समन्वय साधून कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे आणि कारखाने व खाण क्षेत्रात कामाचा वेग मर्यादित ठेवण्याबाबतही सूचित करण्यात आले आहे. अत्यंत उष्णतेच्या काळात विश्रांतीच्या वेळेत लवचिकता आणणे, आवश्यक असल्यास दोन कामगारांची टीम नेमणे आणि कामाच्या ठिकाणाजवळच विश्रांतीगृहांची सोय करण्यावर भर देण्यात आला आहे.



कामगारांना थंड पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स उपलब्ध करून देण्यासोबतच, उष्णतेचे धोके व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांबाबत कामगारांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी कामगार नाका व सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स लावून जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि नियमित निरीक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात यावी. सर्व नियोक्त्यांनी याकडे वैयक्तिक लक्ष देऊन कामगारांची सुरक्षा सुनिश्चित करावी, असे आवाहन कामगार विभागामार्फत करण्यात आले आहे.

## ग्रामपंचायतीतील कारभारावरून पुन्हा एकदा वाद

# प्रशासक महिला सरपंच यांच्या निर्णयामुळे गावात तीव्र नाराजीचे वातावरण

**ब्राह्मणवाडा थडी**

येथील ग्रामपंचायत नेहमीच काही ना काही कारणाने चर्चेत असते. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयावर लावण्यात आलेल्या सूचना फलकामुळे गावात मोठी चर्चा रंगली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायत सदस्यांनी मासिक सभेत इंटरनेट (नेट) बिल भरण्यासंदर्भात दोन महिन्यांच्या बिलाच्या भरण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता. मात्र, प्रशासक सरपंच यांनी या ठरावाला मंजुरी न दिल्याने संबंधित बिल भरले गेले नाही. परिणामी, ग्रामपंचायत कार्यालयाचे इंटरनेट कनेक्शन बंद झाले आहे.या घटनेनंतर संतप्त सदस्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर एक सूचना फलक लावून नागरिकांना परिस्थितीची माहिती दिली. फलकावर नमूद करण्यात आले आहे की, मंजूर ठराव असूनही प्रशासक सरपंचांनी बिल न भरल्यामुळे ग्रामपंचायतीची सर्व ऑनलाइन कामे तसेच इतर खर्चाची कामे ठप्प झाली आहेत.या प्रकारामुळे ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले असून नागरिकांना विविध सेवांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावातील नागरिकांनी या गैरसोयीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली असून संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन प्रश्न सोडवावा, अशी मागणी केली जात आहे.सदर प्रकरणामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पुढील काळात काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सोलर नोंदणीसाठी लाचखोरी

# महावितरणचा अधिकारी व ऑपरेटर जाळ्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोलर व्यवसायाच्या नोंदणी प्रक्रियेसाठी लाच मागितल्याप्रकरणी महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यासह कंत्राटी कॉम्प्युटर ऑपरेटरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून अटक केली. २८ एप्रिल रोजी झालेल्या या कारवाईमुळे महावितरण कार्यालयातील गैरप्रकार पुन्हा एकदा समोर आले आहेत.

या प्रकरणातील आरोपी उपकार्यकारी अभियंता बाळासाहेब डिंगाबर खंडारे (वय ४८, रा. टेलिकॉम कॉलनी) आणि कॉम्प्युटर



ऑपरेटर शामकुमार पांडुरंग इझाटे (वय ४२, रा. स्वावलंबीनगर) यांच्याविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराने 'भारत ग्रीन एनर्जी' या नावाने सोलर रूफटॉप विक्री व पुरवठा नोंदणीसाठी मार्च महिन्यात अर्ज केला होता. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही काम रखडत असल्याने त्यांनी कार्यालयात संपर्क साधला. यावेळी ऑपरेटर इझाटे याने सुरुवातीला २० हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर ही रक्कम १५ हजारांवर आणण्यात आली.

लाच देण्यास नकार देत तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार केली. पडताळणीत लाच मागणीची खात्री झाल्यानंतर ☞(पान २ वर)

# तरुणीला शरीर सुखाची मागणी करत धमकावले

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलीस भरतीची तयारी करत असलेल्या एका २३ वर्षीय तरुणीसोबत



असलेल्या ओळखीचा फायदा घेत आरोपीने तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. तरुणीने त्याचा प्रस्ताव नाकारला तर आरोपीने तिला 'तुझे कोण्या दुसऱ्या सोबत लग्न नाही होऊ देणार' अशी धमकी देत शरीर सुखाची मागणी केली आणि तिच्याशी अश्लील चाळे करण्याचे प्रयत्न केले. या प्रकरणात पीडित तरुणीच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी आरोपी सागर अनिल पांडे (वय २७, केडिया नगर) याच्याविरुद्ध कलम ७४,७५,७८,१२६,३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार पीडित तरुणी पोलीस भरतीची तयारी करत आहे. प्रॅक्टिस ☞(पान २ वर)

# माधुरी ठाकरे, स्वाती कुलकर्णी, ईस्माईल कासम लालुवाले, किशोर जाधव झोन सभापतीपदी



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या पाचही झोन निहाय सभापतीची निवडणुक आज बुधवार दिनांक २९ एप्रिल,२०२६ रोजी सकाळी ११ वाजता स्व.सुदामकाका देशमुख सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती.

उत्तर झोन क्रमांक १ चे सभापतीपदी माधुरी सुहास ठाकरे, मध्य झोन क्रमांक २ चे सभापतीपदी स्वाती चंद्रशेखर कुलकर्णी, पुर्व झोन क्रमांक ३ चे सभापतीपदी ईस्माईल कासम लालुवाले, दक्षिण झोन क्रमांक ४ चे सभापतीपदी किशोर चंद्रशेखर ☞(पान २ वर)

### एमआयएमचा सभापती नाही

मनपा क्रमांक ५ भाजीबाजार मधून एमआयएमच्या आशिया अंजूम वहीद खान यांचे नाव झोन सभापतीसाठी मंजूर झाले होते, पण त्यांनी नामांकन भरण्यामध्ये उशीर केला. यामुळे एमआयएमचा सभापती नाही झाला. उशीर झाल्यामुळे एमआयएम सदस्यांनी नामांकन उचलले नाही. दरम्यान विद्यमान सभापतीचा कार्यकाळ हा एक वर्षाचा राहणार आहे.

# विदर्भात उष्णतेची लाट; ट्रान्सफॉर्मरलाही फुटला घाम

## महावितरणची धडपड, पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या सुरक्षेसाठी कुलर

**अमरावती/प्रतिनिधीः-**

पश्चिम विदर्भात उष्णतेची लाट पसरली असून तापमानाने ४७° अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. या तीव्र उष्णतेचा परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होऊ नये आणि ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा मिळावा यासाठी महावितरणाने महत्त्वपूर्ण उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याअंतर्गत उपकेंद्रांतील पॉवर ट्रान्सफॉर्मर थंड ठेवण्यासाठी विशेष कुलर बसविण्यात येत आहेत.

महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्रांमध्ये सामान्यतः एक किंवा दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यरत असतात. या ट्रान्सफॉर्मरची क्षमता साधारणतः ५ किंवा १० एमव्हीए इतकी असल्याने एका ट्रान्सफॉर्मरद्वारे हजारो वीज ग्राहकांना वीज पुरवठा केला जातो. या उपकरणांच्या कार्यक्षमतेसाठी



ट्रान्सफॉर्मरमध्ये असलेले ऑइल अत्यंत महत्त्वाचे असते. हे ऑइल उष्णता नियंत्रणासाठी आणि इन्सुलेशनसाठी वापरले जाते.

मात्र, तापमानात लक्षणीय वाढ झाल्यास हे ऑइल अतिउष्ण होऊन त्याचे गुणधर्म बदलू शकतात, ज्यामुळे ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड किंवा ओव्हरहिट होण्याचा, बिघाड होण्याचा किंवा अगदी आग लागण्याचाही धोका निर्माण होतो. या ☞(पान २ वर)

# विज प्रश्नावरून नगरसेवकांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

### दर्यापूर शहरात अनियमित विजपुरवठा

## अभियंत्यांच्या कार्यालयासमोर लावले बेशरमचे झाड

**खल्लार/प्रतिनिधीः-**

दर्यापूर शहरात सुरू असलेल्या अनियमित विजपुरवठ्याच्या समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. वारंवार होणाऱ्या विज खंडिततेमुळे विशेषतः उष्णतेच्या दिवसांत लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या



पार्श्वभूमीवर दर्यापूर नगरपालिकेतील नगरसेवकांनी थेट विद्युत वितरण कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला.

नगरसेवकांनी अभियंत्यांच्या कार्यालयासमोर निषेध म्हणून बेशरमचे झाड लावून प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित विभाग नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेत नसून संपर्क साधण्यासही अडचणी येत असल्याचा आरोप यावेळी ☞(पान २ वर)

# भीषण अपघात; विवाहितेचा मृत्यू, पती-दीर जखमी

## लोणटेक मार्गावरील चांदुरी चौफुलीवर घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** लोणटेक मार्गावरील चांदुरी चौफुलीवर मंगळवारी (दि.२८) रात्री घडलेल्या भीषण अपघातात एका तरुण विवाहितेचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिचा पती आणि दीर गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत महिलेचे नाव समीक्षा नितीन मोरे (वय १९, रा. चांदुरी) असे असून, जखमींमध्ये नितीन अनिल मोरे (वय २२) व त्यांचा भाऊ नीलेश यांचा समावेश आहे. तिघेही दुचाकीवरून अकोली रेल्वे स्थानकावरून आपल्या गावी परतत असताना



हा अपघात घडला. दरम्यान, चांदुरी चौफुलीवर पोहोचताच अज्ञात भरधाव चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की समीक्षा मोरे यांच्या अंगावरून ☞(पान २ वर)

# न्यायासाठी प्रवीण सावळे करणार आत्मदहन

## समाज कल्याण विभागात राशन घोटाळ्याचा आरोप

**अमरावती/प्रतिनिधीः-**

समाज कल्याण विभागाचे वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनाचा कंत्राट शासनाने स्मार्ट सर्विस प्रा. लिमिटेड पुणे या कंपनीला दिला होता. जिल्ह्यातील समाज कल्याण मुलांचे व मुलींचे भोजनाचे कंत्राटाकरीता लागणारे धान्य भाजीपाला व इत्यादी सहयोग नागरिक सेवा सहकारी संस्थेच्या वतीने करण्यात येत होते. या संस्थेला पुण्याच्या कंपनीने ४ लाख १६ हजार ९०९ रुपयांनी फसविले आहे.



या प्रकरणात न्याय मिळण्याच्या मागणीसाठी संस्थेचे प्रवीण सुरेशराव सावळे यांनी उद्या १ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन ☞(पान २ वर)

# तिवसा येथे आ.गायकवाड आणि धीरेंद्र शास्त्री यांचा जाहीर निषेध



## तालुका काँग्रेस कमिटीचा आक्रमक पवित्रा

**तिवसा/प्रतिनिधीः-** 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाबाबत आमदार संजय गायकवाड यांनी केलेले वादग्रस्त विधान आणि बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेले अवमानकारक वक्तव्य, या दोन्ही घटनांचा तिवसा तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. या निषेधार्थ आज तालुका मुख्यालयासमोर भव्य आंदोलन करण्यात आले.यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'आमदार संजय गायकवाड यांचा धिक्कार असो' आणि 'महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्यांचा निषेध असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

आमदार गायकवाड यांनी ऐतिहासिक संदर्भांचा विपर्यास करून शिवरायांच्या प्रतिमेला धक्का पोहचवण्याचे काम केले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदार विधान करण्याऐवजी ☞(पान २ वर)

# सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्या ७६ जणांवर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील विविध चौकांमध्ये, हातगाड्यांवर आणि रस्त्यांच्या कडेला दारू पिऊन असभ्य वर्तन करणाऱ्यांविरुद्ध अमरावती शहर पोलिसांनी बुधवारी (दि.२९) विशेष मोहीम राबवली. पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या या कारवाईत शहरातील विविध भागांतून ७६ तळीरामांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्तांच्या विशेष



पथकाने आणि गुन्हे शाखेने शहरातील गजबजलेल्या भागात ही धडक कारवाई केली. कठोरा नाका, किशोर कॉलनी, दस्तुर नगर, शेगाव नाका इंजिनिअरिंग कॉलेज ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेला विधानसभा अंदाज समितीची भेट

## मुलभूत सुविधांसह विविध विषयांवर चर्चा

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद कार्यालयात बुधवार दिनांक २९ रोजी विधानसभा अंदाज समितीच्या पथकाने भेट दिली असून शहरातील मुलभूत सुविधा व विविध विषयांवर मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या सोबत चर्चा केली.

यावेळी नगरपरिषद अधिकारीसह नगराध्यक्ष अविनाश गायगोले, उपाध्यक्ष प्रियंका मालठाणे सह इतर विभागांचे



सभापती उपस्थित होते.

मुख्याधिकारी विजय लोहकरे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी विधानसभा अंदाज समितीचे सदस्य किशोर पाटील, कृष्णा खोपडे,मनीषा चौधरी यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.

मुख्याधिकारी☞(पान २

# जिल्हा स्त्री रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदभरतीला तांत्रिक स्थगिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (MSACS), मुंबई अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथील आयसीटीसी (ICTC) केंद्रातील रिक्त 'प्रयोगशाळा तंत्रज्ञ' (Lab Technician) पद भरती प्रक्रियेला तांत्रिक कारणास्तव पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी एका पत्रकाव्दारे कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य एड्स



नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेशानुसार, काही अपरिहार्य तांत्रिक कारणांमुळे ही रिक्त पदे भरण्यास स्थगिती देण्यात आली असून भरती प्रक्रिया तात्काळ थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार ही कार्यवाही होत आहे. यापूर्वी या☞(पान २ वर)

# वरुड येथे आज कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे गुरूवार, दि. ३० एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरूड जि. अमरावती येथे हा मेळावा होणार आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. मेळाव्यात योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.मेळाव्यामध्ये सहभागी☞(पान २ वर)

# घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-**

घरफोडी करणाऱ्या कुख्यात आरोपीला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. आशिष उर्फ जंगली साबसिंग सागर (वय १९, विलास नगर, संविधान चौक) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याच्या कडून १ लाख २२ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या घरफोडी प्रकरणाचा समांतर तपास करीत असताना



गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे आज बुधवार २९ एप्रिल रोजी आरोपी आशिष उर्फ जंगली साबसिंग सागर (१९, विलासनगर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरी गेलेले नगदी व सोन्याच्या लगड असा ऐकून १ लाख २२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ☞(पान २ वर)

